
■ स्पर्धा परीक्षा ■ व्यवसाय शिक्षण ■ करिअर मार्गदर्शन ■ बँकिंग

फेब्रुवारी २०१७ / पाने ६० / किंमत ₹१०

# लोकराज्य

Highlighted By eMPSCkatta Telegram Channel



## करिअरच्या संधी...

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी),पुणे

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)

मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे ४११००१





## " राजकीय लोकशाहीला सामाजिक लोकशाहीचा आधार असल्यावाचून ती कधीही टिकु शकणार नाही "

– डॉ. बाबासाहेब आंबेडकर

### बार्टी च्या विविध शाखांतर्गत राबवले जाणारे अभिनव उपक्रम

**१.प्रशिक्षण**
* RTI, Atrocity, युवा नेतृत्व व विविध विषयांवर प्रशिक्षणे

**२.संशोधन**
* विविध जाती वर्गाचे संशोधन

**३.प्रकाशन व प्रसिध्दी**
* मौलिक ग्रंथाचे विविध समाज घटकांना वितरण उदा. शाळा, महाविदयालये, शासकीय वसतिगृहे, वाचनालये, ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, शासकीय अधिकारी, विविध प्रशिक्षणाचे प्रशिक्षणार्थी इ.

**४.विदयार्थी करिता उपक्रम**
* M. Phill व Ph.D. करीता फेलोशिप कार्यक्रम UPSC आणि IBPS स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन
* JEE, NEET (पदवीपूर्व) व GRE/ TOEFL, GATE, CAT, Custom Broker (पदव्युत्तर), Custom Officer, Income Tax Officer या परीक्षांच्या तयारीसाठी प्रशिक्षण

**५. Mentoring the Merit**
* अनुसूचित जातीचे ८ ते १५ वयोगटातील विद्यार्थ्यांकरिता सहाय्य

**६. कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम**
* १५ ते ४५ वयोगटातील युवक व युवती करिता कौशल्य विकास प्रशिक्षण व जॉब प्लेसमेंट

**७. विशेष प्रकल्प**
* असंघटीत अकुशल महिलांसाठी प्रशिक्षण

**८. विशेष उपक्रम**
* समतादूतां व्दारे समाज प्रबोधन
* सांस्कृतिक कार्यक्रमांचे माध्यमातून समताधिष्ठीत समाज निर्माण करण्याकरीता समाज प्रबोधन

**९. जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी**
* जात पडताळणी दस्त ऐवजाचे स्कॅनिग व डिजिटायझेशन.
* लवकरच ऑनलाइन जात वैधता प्रमाणपत्र अर्जदारास उपलब्ध करून देणार

**१०. महाड**
* भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक, महाड व पुणे येथे डॉ. बाबासाहेबांच्या विचारांवरील व साहित्यावरील अदयावत ग्रंथालय, दृकश्राव्य कार्यक्रम, आंतरराष्ट्रीय प्रशिक्षण, म्युझियम नव्याने सुरु.

## आम्ही समताधिष्ठीत व न्यायावर आधारीत समाज बांधणीस वचनबध्द आहोत.


राजेश फत्तेसिंग ढाबरे, भारासे
महासंचालक, बार्टी

अधिक माहितीसाठी संपर्क– जनसंपर्क अधिकारी– ०२०–२६३४३६००/२६३३३३३०

Website: http://barti.maharashtra.gov.in

www.barti.in | /BARTIConnect | /BARTIConnect

## ६ अशा सेवा अशा संधी



आपणास भारतीय प्रशासनिक सेवेसोबतच भारतीय पोलीस सेवा, भारतीय विदेश सेवा, भारतीय वन सेवा, भारतीय महसूल सेवा याबद्दल माहिती असते. मात्र याशिवाय अनेक अशा सेवा आहेत की, त्यांची माहिती सर्वसाधारणत: नसते. या सेवासुद्धा महत्त्वाच्या असतात.

## १६ तुम्ही जिंकणारच...



संघ लोकसेवा आयोगाच्या मुलकी सेवा परीक्षेकरिता दरवर्षी अंदाजे सहा लाख उमेदवार बसतात. तथापि तयारी न करताच ७० टक्के विद्यार्थी परीक्षेला बसलेले असतात. त्यामुळे केवळ संख्येचा विचार करून या परीक्षेबद्दल भीती बाळगण्याचे कोणतेही कारण नाही.

## १८ मार्गदर्शन आणि प्रशिक्षण



देशातील सर्वात महत्त्वाच्या आणि आव्हान मानल्या जाणाऱ्या नागरी सेवा परीक्षेमध्ये मराठी टक्का वर्षागणिक वाढू लागला आहे. या स्पर्धा परीक्षांची तयारी करून घेण्यासाठी अलीकडच्या काळात विविध पातळ्यांवर प्रयत्न होत आहेत. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेच्या तयारीसाठी प्रशिक्षण देणाऱ्या संस्था राज्यात कार्यरत असून शासनासह स्थानिक स्वराज्य संस्था, विद्यापीठे यांच्या अखत्यारित या प्रशिक्षण संस्था व केंद्रे सुरू आहेत.


| | |
|---|---|
| अशा सेवा, अशा संधी! | ६ |
| तयारी नागरी सेवा परीक्षेची | १५ |
| तुम्ही जिंकणारच... | १६ |
| मार्गदर्शन आणि प्रशिक्षण | १८ |
| नागरी सेवा : टप्पा मुलाखतीचा | २२ |
| राज्यसेवा | २४ |
| यशाची प्रेरणा | २६ |
| करिअर कसे निवडावे? | ३० |
| डिजिटल मार्केटिंग : नवे क्षेत्र | ३२ |
| बँकर व्हा... | ३४ |
| फिटनेस गुरू... | ३७ |
| व्यवसाय शिक्षण: रोजगाराची हमी | ३८ |
| आत्मविश्वास महत्त्वाचा... | ४५ |
| सेवा आणि समाधान | ४६ |
| व्हा 'माध्यम'कार | ४८ |
| फाइन आर्ट : फाइन करिअर | ५० |
| कृषी कौशल्य | ५२ |
| माध्यमं संवादाची : जनतेच्या विश्वासाची | ५४ |
| वैश्विक मराठी | ५५ |


## २२ नागरी सेवा : टप्पा मुलाखतीचा



लोकसेवा आयोगाने जाणीवपूर्वक मुलाखतीच्या टप्प्यास व्यक्तिमत्त्व चाचणी असे संबोधले आहे. २७५ गुणांसाठी असलेला हा टप्पा अनेक अर्थाने महत्त्वाचा ठरतो. कित्येकदा अंतिम यादीतील स्थान मुलाखतीत मिळालेल्या गुणांवरच निर्धारित होते.

## ३० करिअर कसे निवडावे?



करिअर निवडताना आपली बुद्धिमत्ता नेमकी कोणत्या प्रकारची आहे याची चाचपणी करून करिअरच्या घोडदौडीत उतरायला हवे. तरच आपला टिकाव लागू शकतो. अन्यथा अपयश पदरी पडण्याची शक्यता अधिक असते.

## ३२ डिजिटल मार्केटिंग : नवे क्षेत्र



जगात प्रत्येक क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर दिवसागणिक वाढत चालला आहे. माणसाच्या दैनंदिन आयुष्याचा बहुतांशी भाग डिजिटल तंत्रज्ञानाने व्यापून टाकला आहे. २०२० पर्यंत संपूर्ण जग डिजिटल होईल, यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरु आहेत. हे होत असतानाच डिजिटल मार्केटिंगच्या पर्यायाने सोशल मीडियाच्या क्षेत्रातदेखील रोजगाराच्या लाखो संधी उपलब्ध होत आहेत.

## ३४ बँकर व्हा...




बँकेमधील नोकरीला आज प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे.

## ३८ व्यवसाय शिक्षण: रोजगाराची हमी



राज्यातील शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेंतर्गत व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रम पूर्ण करून औद्योगिक क्षेत्रात मोठ्या संख्येने उपलब्ध असणारे रोजगार मिळण्याची संधी आहे.

## ५० फाइन आर्ट : फाइन करिअर



फाइन आर्ट अर्थात ललितकला क्षेत्रात कौशल्य असलेल्यांना यशाची सर्व शिखरे पार पाडता येतात. ललितकला प्रकारातील बहुविध अभ्यासक्रम हे व्यक्तीला स्वावलंबी बनवणारे आहेत.

वर्ष ६८ वे | अंक ८ | फेब्रुवारी २०१७

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,**
**महाराष्ट्र शासन**

# लोकराज्य

## संपादन

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- संपादक मंडळ — अजय अंबेकर, देवेंद्र भुजबळ, शिवाजी मानकर
- संपादक — सुरेश वांदिले
- उपसंपादक — गजानन पाटील, राजाराम देवकर

## प्रशासन

- प्रशासन अधिकारी — मीनल जोगळेकर
- वितरण अधिकारी — प्रवीण टाके, अश्विनी पुजारी
- साहाय्य — भारती वाघ

## मांडणी

- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रण — प्री मीडिया सर्व्हिसेस प्रा. लि. महापे, नवी मुंबई.

## पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
Email : lokrajya.dgipr@maharashtra.gov.in

## वितरण आणि वर्गणीदार

वर्गणीदार व तक्रार निवारण - ०२२-२२०२१५३०
Email : lokvitaran.dgipr@maharashtra.gov.in

**ई - लोकराज्य** http://dgipr.maharashtra.gov.in

## सप्रेम नमस्कार

'लोकराज्य' हे एक असे मासिक आहे. ज्यातून महाराष्ट्राच्या कान्याकोपऱ्यातील आर्थिक, राजकीय, भौगोलिक, सांस्कृतिक घडामोडी व त्याचबरोबर सखोल, परिपूर्ण माहिती मिळते. स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांना ही मासिकं नक्कीच उपयुक्त ठरतायत म्हणूनच धन्यवाद.

**- प्रज्ञा गवरी, पिंपळे गुरव, पुणे**

लोकराज्यचा प्रत्येक अंक मी नियमित वाचते. अंकातील गडकिल्ल्यांची माहिती मला विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी उपयुक्त ठरते. यातील लेख हे तरुणांसाठी भावी आयुष्यात वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवण्यास तसेच प्रेरणादायी आहेत. 'महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास' या लेखातून वाचकांना वाचायला मिळतात.

**- विनया काटकर, बुध, ता.खटाव, सातारा**

डिसेंबर १६ च्या नागपूर अधिवेशन विशेषांकामुळे विधिमंडळाचे कामकाज कसे चालते याची माहिती मिळाली. नागपूर अधिवेशनचा इतिहास काळाला. या अंकामुळे विधिमंडळ कळले.

**- बाबासाहेब पांडेकर, बारलोणी, सोलापूर**

लोकराज्यचा डिसेंबरचा अंक ज्ञानात भर घालणारा आहे. या अंकातून अधिवेशन विषयक व संसदीय कामकाजाबाबतच्या माहितीचा अनमोल खजिना सर्वांपर्यंत पोहोचला.

**- प्रणयसिंह काळे, माढा, सोलापूर**

नागपूर अधिवेशन विशेषांकातील दुर्मीळ माहितीने ज्ञानात भर पडली.

**- नितीन दुर्बुडे, तेलंगखडी, अचलपूर**

'लोकराज्य' सदैव विविध विषय घेऊन वाचकांच्या भेटीला येते.

**- डॉ. अनंत चौधरी, कोतवाली वॉर्ड, चंद्रपूर**




## ईमेलद्वारे

जानेवारी २०१७ चा लोकराज्यचा अंक वाचल्यानंतर महाराष्ट्र भ्रमणाचा मोह नक्कीच होतो. हा अंक महाराष्ट्रातील विविध पर्यटनस्थळी जाण्यासाठी मार्गदर्शक ठरेल, यात शंका नाही.

**- रामा कुलभैय्या, अहमदनगर**

संसदीय कार्यप्रणालीची आणि ऐतिहासिक परंपरा लाभलेल्या महाराष्ट्राच्या विधिमंडळाची बहुमूल्य व चिरंतन स्मरणात राहील अशी माहिती देणारा डिसेंबर २०१६ चा लोकराज्याचा अंक वाचकांसाठी 'ज्ञानसूर्य' आहे.

**- तुषार निकम, जळगाव**

### वार्षिक वर्गणी

वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, बॅरेक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई-४०००२१
या पत्त्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वठणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. आपला संपूर्ण निवासी पत्ता सुवाच्य अक्षरात पीनकोडसह असावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा.
(प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००)

**लोकराज्यची वर्गणी ऑनलाइन भरण्यासाठी**
http://dgipr.maharashtra.gov.in

* या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.

फॉलो करा...www.twitter.com/MahaDGIPR
लाइक करा...www.facebook.com/dgipr
लाइक करा...YouTube/MaharashtraDGIPR

### प्रतिक्रियांचे स्वागत

लोकराज्य अंकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य वाढवण्यासाठी आपल्या प्रतिक्रिया आम्हाला हव्या आहेत.
पत्ता : संपादक, लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२

# प्रगतीच्या पाऊलवाटा

नेमका कोणता विषय घ्यावा किंवा कोणते करिअर निवडावे हा प्रश्न १० वी व १२ वीतील प्रत्येक विद्यार्थ्याला व त्याच्या पालकाला पडत असतो. आजच्या काळात करिअर करण्यासाठी विविधांगी क्षेत्रे उपलब्ध झाली आहेत, असे असूनही या क्षेत्रातील संधी कशी उपलब्ध करून घ्यायची, याबद्दल बरीच अनभिज्ञता दिसते. सर्वसाधारणत: पालकांचा कल हा अभियांत्रिकी आणि वैद्यकीय शाखेकडेच अधिक असतो. त्यामुळे ते आपल्या मुलांना त्याची इच्छा, आवड किंवा अभ्यासातील गती लक्षात न घेता त्याला वैद्यकीय किंवा अभियांत्रिकी शाखेचे शिक्षण घेण्यास बाध्य करतात. इच्छेविरुद्ध शिक्षण घेणाऱ्या या मुलाला संबंधित शाखेमध्ये प्रावीण्य मिळवता येत नाही. त्याचे ज्ञानार्जन अर्धवटच राहते. संबंधित विषयातील पदवी मिळाली तरी प्रत्यक्ष कार्य करण्यास तो सक्षम नसल्याचे दिसून येते. त्यामुळे पालकांनी आपल्या मुलाचा नेमका कल लक्षात घेऊन त्याची आवड, गती व रस असलेल्या विषयामध्ये शिक्षण घेण्यासाठी त्याला प्रेरित केले पाहिजे.

केंद्रीय नागरी सेवा वा राज्य सेवा परीक्षांविषयी बऱ्यापैकी जाणीवजागृती असली तरी नागरी सेवा परीक्षा म्हणजे कलेक्टर किंवा आय.ए.एसची परीक्षा समजली जाते. मात्र नागरी सेवा परीक्षेद्वारे आय.ए.एस. या पदाशिवाय इतर अनेक पदे भरली जातात. या सर्व पदांचे महत्त्व, कार्यपद्धती याबाबतचा विस्तृत लेख हे या अंकाचे वैशिष्ट्य आहे.

आजच्या स्पर्धात्मक काळात प्रत्येक क्षेत्रातील तज्ज्ञांची गरज असते. त्यामुळे अमुक एखादे क्षेत्र वा विषय उच्च श्रेणीचा व दुसरा विषय वा क्षेत्र कमी श्रेणीचा समजण्याची गल्लत करू नये. कोणत्याही विषयात परिपूर्ण ज्ञान मिळवणे, त्या विषयाच्या संकल्पना स्वयंस्पष्टरीत्या समजून घेणे आणि या विषयाच्या अभ्यासातून मिळालेल्या ज्ञानाचा प्रभावीरीत्या वापर करता येणे, या बाबी सध्या करिअर घडवण्यासाठी महत्त्वाच्या ठरतात. परीक्षेतील गुण, शिक्षणसंस्थेचा दर्जा या बाबी जितक्या महत्त्वाच्या असतात, तितकेच तुम्ही किती कौशल्य प्राप्त केले आहे हेही महत्त्वाचे ठरते. जे विद्यार्थी या संदर्भात मागे पडतात, त्यांना करिअर घडवणे कठीण जाते. या सर्व बाबी लक्षात घेऊन आम्ही फेब्रुवारी २०१७ च्या विशेषांकात विविध अभ्यासक्रम, स्पर्धा परीक्षा आणि करिअर याविषयीची माहिती समाविष्ट केली आहे.


या अंकात करिअर कसे निवडावे, बँकेतील संधी, व्यावसायिक अभ्यासक्रम, कृषी क्षेत्रातील कौशल्याधारित अभ्यासक्रम, ललितकला, विविध माध्यमे यामधील करिअर संधी याविषयी विस्तृत माहिती देण्यात आली आहे. हा अंक पालक व विद्यार्थ्यांसाठी करिअरचा रोडमॅप निर्धारित करण्यासाठी उपयुक्त ठरेल, अशी खात्री आहे.

शुभेच्छांसह.

ब्रिजेश सिंह
(मुख्य संपादक)

प्रेरणा

# अशा सेवा अशा संधी



संघ लोकसेवा आयोगामार्फत दरवर्षी नागरी सेवेसाठी अखिल भारतीय स्तरावर स्पर्धा परीक्षा घेतली जाते. ही परीक्षा म्हणजेच आयएएसची परीक्षा अशी बऱ्याच जणांची धारणा असते. मात्र वस्तुत: नागरी सेवांमधील आयएएस (भारतीय प्रशासनिक सेवा) ही एक सेवा आहे. याबरोबरच इतर अनेक महत्त्वाची 'अ' आणि 'ब' श्रेणीतील पदे या परीक्षेद्वारे भरली जातात. मात्र त्यांची माहिती सर्वसाधारणत: नसते. या सेवासुद्धा भारतीय प्रशासनिक सेवेइतपत महत्त्वाच्या असतात. या सेवांमध्ये संबंधित उमेदवारांना प्रगती साध्य करण्याची संधी मिळत असते. आयएएसशिवाय आयपीएस, आयआरएस, आयआरटीएस, आयडीईएएस, आयटीएस अशी अनेक पदेही भरली जातात. या पदांची व त्यांच्या जबाबदाऱ्यांची विस्तृत माहिती या लेखात देण्यात आली आहे.

आय.ए.एस. पदाला लोकप्रिय नाव कलेक्टर असे आहे. तो संपूर्ण जिल्ह्याचा पालक असतो व त्याचे कार्यालय चोवीस तास चालू असते.

**जबाबदाऱ्या**

क्षेत्रीय स्तरावर, आयएएस अधिकारी हा कायदा-सुव्यवस्थेची स्थिती, सामान्य प्रशासन आणि विकासात्मक कार्याची देखरेख करीत असतो. कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत अगदी जिल्हा पोलिस अधीक्षक (एसपी) त्याच्या मार्गदर्शनाखाली काम करतो.

नैसर्गिक आपत्तीचे व्यवस्थापन, शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी, लोकसभा, विधानसभा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे प्रशासन अशी बहुविध जबाबदारी त्याच्यावर असते.

भारत सरकारांतर्गत (म्हणजे विविध केंद्रीय मंत्रालयांतर्गत) आयएएस अधिकारी हा विविध धोरणांच्या आखणीत आणि त्याच्या अंमलबजावणी संदर्भात परिनिरीक्षणाचे काम करीत असतो.

काही सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम आणि कंपन्यामध्ये त्यांची प्रमुख पदावर नेमणूक होत असते. पूर्वी असे काही उपक्रम तोट्यातून फायद्यात काहींनी आणून दाखवले आहेत.


अनेक आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर भारताचे प्रतिनिधित्वही त्याच्याकडून केले जाते आणि विविध देशाबरोबर करारमदारांमध्ये त्यांचा सहभाग असतो.

**आयएएस अधिकाऱ्यांच्या नेमणुका**

सहायक जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ), महानगरपालिका आयुक्त, जिल्हाधिकारी, विभाग संचालक, सार्वजनिक क्षेत्रातील कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक, राज्य मंत्रालयात विभागाचे सचिव, राज्याचा मुख सचिव/केंद्र शासन सचिव, भारत सरकारसाठी धोरणात्मक सल्लागार. कॅबिनेट सचिव हे सर्वोच्च पद मिळू शकते.

**भारतीय पोलीस सेवा**

आयपीएस ही कायद्याची अंमलबजावणी करणारी एजन्सी नसून ती एक नागरी सेवा आहे. भारतीय पोलीस सेवा (आयपीएस) अधिकार्याची मुख्य जबाबदारी ही जनतेची सुरक्षा आणि संरक्षण ही आहे. विविध देशविघातक आणि समाजविरोधी प्रवृत्ती, पूर्वोत्तर राज्यातील अतिरेकी कारवाया, फोफावलेला नक्षलवाद, संघटित गुन्हेगारी, तस्करी वगैरेमुळे आयपीएस ही भारतीय प्रशासनाचा मुख्य कणा बनली आहे.



आयपीएस अधिकाऱ्यांना हैदराबादस्थित सरदार वल्लभाई पटेल नॅशनल पोलीस अकॅडमीमध्ये प्रशिक्षण दिले जाते. प्रशिक्षण कठोर व सर्व परिस्थितीचा सामना करता येईल असे अधिकारी घडवणारे असते. त्यात मॅराथॉन असते, कमांडो प्रशिक्षण असते, स्कूबा ड्रायविंग शिकवले जाते, घोडेस्वारी आणि नेमबाजी तर असतेच असते. सर्व प्रकारच्या शस्त्रास्त्रांची हाताळणी शिकवली जाते.

**जबाबदाऱ्या**

गुन्हेगारीचे अन्वेषण आणि प्रतिबंध

वाहतुकीचे नियंत्रण आणि व्यवस्थापन

आयपीएस सेवांची खालीलप्रमाणे विविध कार्यविभागणी केली गेली आहे.

गुन्हे शाखा (क्राइम ब्रांच) , गुन्हे अन्वेषण विभाग (सीआयडी), गृह संरक्षण दल, वाहतूक नियंत्रण विभाग.

इतर जबाबदाऱ्या म्हणजे भारतीय गुप्तचर विभागाच्या अत्युच्च पदावर काम करणे जसे की, रिसर्च अन्ड अनालिसिस विंग (आरएडब्ल्यू), गुप्तचर विभाग (आयबी), केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभाग (सीबीआय), गुन्हे अन्वेषण विभाग (सीआयडी) इ. सर्व राज्यात व केंद्रशासित प्रदेशामध्ये नागरी व सशस्त्र पोलीस दल व भारतीय संघराज्याच्या कायद्याची अंमलबजावणी करणे.

केंद्रीय पोलीस संघटना जसे की सीमा सुरक्षा दल (बीएसएफ), केंद्रीय राखीव पोलीस दल (सीआरपीएफ), इंडो- तिबेट सीमा दल (आयटीबीपी), राष्ट्रीय सुरक्षा गार्ड (एनएसजी), केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल (सीआयएसएफ), दक्षता संस्था, इ. निमलष्करी दलाची धुरा सांभाळणे.

आयपीएस अधिकाऱ्यांच्या नेमणुका खालीलप्रमाणे केल्या जातात.

पोलीस सहायक अधीक्षक (एएसपी), पोलीस अधिक्षक (एसपी), पोलीस उपमहानिरीक्षक (डीआयजी), पोलीस महानिरीक्षक (आयजी), अतिरिक्त महासंचालक (एडीजी), पोलीस महासंचालक (डीजी).

**भारतीय वन सेवा (आयएफओएस)**

भारतीय वन सेवा ही तीन अखिल भारतीय सेवेपैकी ही एक सेवा असून या सेवेसाठी सरळ सेवेद्वारा स्वतंत्र परीक्षेतून निवड केली जाते. या सेवेची स्थापना ही भारतातील वनांचे संरक्षण, संवर्धन आणि वन संसाधनाच्या पुनःनिर्मितीसाठी केली गेली.

**परीक्षेची वैशिष्ट्ये**

यू.पी.एस.सी.कडूनच या पदासाठी परीक्षा होत असली तरी याची फक्त पूर्व परीक्षा नागरी सेवा परीक्षेबरोबर (सीएसपी) होते. मुख्य परीक्षा व मुलाखत स्वतंत्रपणे घेतली जाते. या परीक्षेत यशाचे गुणोत्तर ०.०२ इतके कमी आहे. त्यामुळे ही देशातील सर्वात कठीण परीक्षांपैकी एक आहे असे निर्विवाद म्हणता येईल. पण तरीही या परीक्षेला बसणाऱ्यांची संख्या वाढतीच आहे. या परीक्षेत मुलाखतीबरोबरच शारीरिक चाचणीही घेतली जाते. पुरुष उमेदवारांना चार तासांच्या आत २५ किलोमीटर धावणे/ चालणे पूर्ण करावे लागते तर महिला उमेदवारांना त्याच वेळात १४ किलोमीटरची अट आहे.

**प्रशिक्षण**

भारतीय वन सेवेसाठी निवड झालेल्या उमेदवारांना लालबहादूर शास्त्री अॅकॅडमी, मसुरी येथे प्रशिक्षणासाठी पाठवण्यात येते. त्यानंतर त्यांना वनसेवेच्या विशिष्ट प्रशिक्षणासाठी डेहरादून येथील इंदिरा गांधी राष्ट्रीय वन अकॅडमी येथे पाठवण्यात येते. तिथे त्यांना वन्यजीव व्यवस्थापन, मृद संधारण, सर्वेक्षण, अनुसूचित जाती व शस्त्र हाताळणीसंबंधी प्रशिक्षण दिले जाते. प्रशिक्षणानंतर उमेदवारांची ज्या राज्यात नियुक्ती झाली असेल तिथे त्यांना प्रत्यक्ष कामावर ट्रेनिंग घ्यावे लागते. ३ वर्षांच्या

प्रोबेशनरी कालावधीनंतर त्यांना वन साहाय्यक संवर्धक म्हणून काम पाहावे लागते. यानंतर व एकूण ४ वर्षांच्या अनुभवानंतर ते वरिष्ठ श्रेणीत काम करण्यास पात्र होतात.

**केडर वाटप**

वन सेवेतही राज्यांचे केडर दिले जाते. कधी कधी एकत्रित केडरही असते. दोन तृतीयांश जागा या थेट भरतीने भरल्या जातात तर उरलेल्या जागा या राज्य वनसेवेतून बढतीने भरल्या जातात. जरी हे अधिकारी केंद्र




सरकारचे असले तर राज्य केडरमध्ये काम करताना त्यांना राज्य सरकारच्या आधिपत्याखाली काम करावे लागते.

**कामाचे स्वरूप**

राष्ट्रीय वन धोरणाची अंमलबजावणी करणे ही मुख्य जबाबदारी असते. वनांवर आधारित ग्रामीण व आदिवासी भागातील लोकांसाठी जीविकेच्या संधी निर्माण करणे हीदेखील एक जबाबदारी असते. वनसेवा अधिकारी जिल्हा प्रशासनापासून स्वतंत्र असतो. तो स्वतःच्या कार्यक्षेत्रात प्रशासकीय, न्यायिक आणि वित्तीय शक्ती बाळगून असतो. राज्य वन विभागातील सर्व महत्त्वाच्या जागा भारतीय वनसेवेतील अधिकाऱ्यांनी व्यापले असतात. आय. ए. एस. व आय. पी. एस. अधिकाऱ्यांच्या जशा प्रतिनियुक्त्या होऊ शकतात त्याचप्रमाणे व त्या सर्व ठिकाणी वन सेवेतील अधिकारी नेमले जाऊ शकतात.

**मिळणारी पदे**

सुरुवात वन साहाय्यक संरक्षक या पदाने होते. मग वन संरक्षक या पदावर बढती मिळते. त्यानंतर मुख्य वन संरक्षक, मग अतिरिक्त प्रधान मुख्य वन संरक्षक, त्यानंतर प्रधान मुख्य वन संरक्षक हे राज्यातील सर्वोच्च पद प्राप्त होते. शेवटी वन महासंचालक हे केंद्रातील सर्वोच्च पद मिळू शकते. साधारणपणे सर्वात वरिष्ठ प्रधान मुख्य वन संरक्षक या पदावर नेमला जातो.

**भारतीय विदेश सेवा (आयएफएस)**

भारतासारख्या एका विशाल संस्कृतीचे राजदूत म्हणून काम करणे हे स्वप्नवत असते. हे स्वप्न पूर्ण करायचे असेल तर भारतीय विदेश सेवेला पर्याय नाही. परराष्ट्र व्यवहार हा केंद्राचा विषय असल्याने हे पद पूर्णपणे केंद्राच्या अखत्यारीत येते. हे पद आय. ए. एस. प्रमाणेच इतके महत्त्वाचे मानले जाते की, निवड झाल्यावर पुन्हा परीक्षा द्यायची असेल तर आय. ए. एस. प्रमाणेच राजीनामा द्यावा लागतो.

**जबाबदाऱ्या**

या सेवेतील अधिकारी राजदूत, उच्चायुक्त, कौन्सुल जनरल, भारताचे संयुक्त राष्ट्रातील कायमचे प्रतिनिधी, परराष्ट्र सचिव अशी महत्त्वाची पदे धारण करतात. या सेवेकडे भारताच्या परराष्ट्र संबंधांचे व्यवस्थापन करणे व मुत्सद्दीपणा दाखवणे ही कामे दिली जातात. हे सर्व व्यावसायिक मुत्सद्दी जगभरातील आंतरराष्ट्रीय संस्था व भारताच्या सुमारे १६१ डिप्लोमटिक मिशनमध्ये काम करतात. पंतप्रधानांच्या कार्यालयात (पीएमओ) त्यांची नेमणूक होते. संपूर्ण देशातील प्रांतिक पासपोर्ट कार्यालयांचेही प्रमुखपद ते सांभाळतात. राष्ट्रपतींचे सचिवालय व इतर मंत्रालयातही त्यांची नेमणूक होऊ शकते. भारताचा परराष्ट्र सचिव हा भारतीय विदेश सेवेचा प्रशासकीय प्रमुख असतो.

**प्रशिक्षण**

सुरवातीचे पायाभूत प्रशिक्षण मसूरी येथील लाल बहादूर शास्त्री राष्ट्रीय प्रशासन अकादमी येथे होते. पुढचे मुख्य प्रशिक्षण दिल्लीमध्ये विदेश सेवा संस्था (एफएसआय) दिले जाते. हा प्रशिक्षण कालावधी ३६ महिन्यांचा असतो. (तीन वर्षे) दुसऱ्या कोणत्याच सेवेत इतके सविस्तर प्रशिक्षण दिले जात नाही जितके आय. एफ. एस. मध्ये दिले जाते. या सेवेतील अधिकारी हे भारताचे प्रतिनिधित्व जगभर करीत असतात. अशा वेळी त्यांच्या वागण्यावरून त्या देशातील लोक भारताची प्रतिमा बनवतात. या तीन वर्षात देशात व परदेशात प्रत्यक्ष कामाचाही अनुभव सामील असतो. प्रशिक्षणाच्या शेवटी प्रत्येक अधिकाऱ्याला एक सक्तीची परकीय भाषा (सीएफएल) दिली जाते. उदा. जर्मन. जेव्हा विदेशात अटॅचमेंट तेव्हा ती अशाच देशात दिली जाते जिथे ती सक्तीची भाषा स्थानिक भाषा आहे. उदा. जर्मनी किंवा ऑस्ट्रिया. तिथे अधिकाऱ्याला भाषिक प्रशिक्षण



दिले जाते. या परकीय भाषेची परीक्षा उत्तीर्ण होणे सेवा पुढे चालू ठेवण्यासाठी आवश्यक आहे.

**मुत्सद्देगिरी : एक कला**

एक करिअर डिप्लोमट म्हणून विदेश सेवेतील अधिकाऱ्याला भारताच्या अंतर्गत व बाह्य हितसंबंधांची काळजी वाहावी लागते. त्यात द्विपक्षीय राजकीय व आर्थिक सहकार्य, व्यापार व गुंतवणूक प्रोत्साहन, सांस्कृतिक देवाणघेवाण, वृतपत्रे व मीडियातील संबंध व शिवाय बहुपक्षीय मुद्दे या सर्वांचा समावेश असतो. कामाच्या जबाबदाऱ्यात ज्या देशात ते असतील तेथे मैत्रीचे संबंध ठेवणे. ज्यात (एनआरआय/पीआयओ) यांचा समावेश होतो. विदेशात प्रवास करणाऱ्या नागरिकांचे संरक्षण, विदेशी अधिकाऱ्यांची सोबत करणे हाही कामाचा भाग आहे.

**परराष्ट्र मंत्रालय**

दिल्लीत साउथ ब्लॉक येथे परराष्ट्र संबंध

मंत्रालयाचे (एमईए) मुख्यालय आहे. जवळपास ५० अधिकारी यू. पी. एस. सी. च्या परीक्षेतून निवडले जातात. सध्या या सेवेत सुमारे ८०० आय. एफ. एस. अधिकारी आहेत. येथील कार्यालयात काम करताना परराष्ट्र धोरण निर्मिती व अंमलबजावणी यात सहभाग नोंदविता येतो. करारांच्या वाटाघाटीत भाग घेता येतो. या मंत्रालयात कामाच्या सोयीसाठी अंतर्गतरीत्या अनेक विभाग पाडून काम केले जाते. जसे धोरण नियोजन, बहुसदस्यीय संघटना, प्रादेशिक गट, कायदेशीर बाबी, नि:शस्त्रीकरण, संबंधांचे नियम (प्रोटोकॉल), कौन्सुलर, परदेशातील भारतीय वंशाचे लोक, वृत्तपत्रे व प्रसिद्धी, प्रशासन आणि इतर पैलू.

**नेमणुका**

पहिल्यांदा भारतीय दूतावासामध्ये तिसरे सचिव म्हणून नियुक्ती होते. यात जी परकीय भाषा शिकली आहे तेथे नेमणूक होते. त्यानंतर काही काल परराष्ट्र व्यवहार मंत्रालयात काम असते. मग अत्यंत छोटेखानी देशात वाणिज्य दूत, त्यानंतर मध्यम आकाराच्या देशात राजदूत यानंतर वॉशिंग्टन आणि मॉस्को यासारख्या बड्या दूतावासांमध्ये मंत्रिपदी, त्यानंतर तुलनात्मकरीत्या बडया दूतावासांमध्ये राजदूत अथवा लंडन येथे उप उच्चायुक्त व पुढच्या टप्प्यात आयुक्त. विदेश सल्लागार म्हणूनही कार्य करता येते. शेवटी भारताचे परराष्ट्र सचिव बनण्याची संधी असते.

**भारतीय महसूल सेवा**

(आयआरएस) ही भारत सरकारची महसूल सेवा आहे. हिची स्थापना १९५३ मध्ये झाली. ही केंद्रीय नागरी सेवा (गट अ) आहे. महसूल सेवा केंद्रीय अर्थ मंत्रालयाच्या, महसूल विभागासाठी काम करते. अनेक प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करांचे संकलन व प्रशासन करणे, हे त्याचे मुख्य कार्य आहे.

**कोश मुलो दंडः**

महसूल हे प्रशासनाचे पंख असतात. हे पंख सक्षम असल्याशिवाय सरकारी मनसुबे तडीला जाऊ शकत नाहीत. म्हणूनच ब्रीदवाक्य 'कोश मुलो दंडः' असे ठेवले आहे. (राज्याचे मूळ खजिन्यात आहे) या सेवेचे मुख्यालय कॅबिनेट सचिवालय, दिल्ली येथे आहे. आयकर सेवा गट 'ब' मधील अधिकाऱ्यांनाही बढतीने राजस्व सेवेपर्यंत पोहोचता येते. बढती व थेट भरती यात १:१ असे गुणोत्तर ठेवले जाते.

(आयआरएस) चे दोन विभाग आहेत. आयआरएस (आयकर) आणि आयआरएस (आयात कर आणि अबकारी कर). या दोन विभागांचे नियंत्रण दोन वैधानिक संस्था करतात. प्रत्यक्ष कर केंद्रीय बोर्ड (सीबीडीटी) आणि केंद्रीय आयात कर व अबकारी कर बोर्ड (सीबीईसी). संबंधित बोर्ड हे धोरणे, हस्तांतरण व त्याचा प्रसार करण्यास प्राधिकृत आहेत.

**प्रशिक्षण**

पायाभूत प्रशिक्षण कार्यक्रम (फाऊंडेशन कोर्स) मसुरी, भोपाळ व हैद्राबाद येथे होतो. प्रशिक्षणात कर पद्धतींबरोबरच शस्त्रे, स्फोटके यांना हाताळणे शिकवले जाते. राजस्व अधिकाऱ्यांना प्रशिक्षण कालावधीतच 'व्यवसाय कायदा व करव्यवस्था' या विषयात मास्टर्स डिग्री मिळवता येते.

आयआरएस (आयकर) अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण नागपूर येथील प्रत्यक्ष करांची राष्ट्रीय अकादमी (एनएडीटी) येथे होते. आय. आर. एस. (कस्टम व उत्पादन शुल्क) यांचे प्रशिक्षण नॅशनल अकॅडमी ऑफ कस्टम्स, एक्साईज अन्ड नार्कोटिक्स (एनएसीईएन), फरिदाबाद येथे होते.

**नेमणुका**

आय.आर.एस. अधिकारी केंद्रीय नोकरीत असल्यामुळे त्यांची नियुक्ती देशभरात कुठेही होते. ही अराजकीय पद्धतीने आपले काम करते व तांत्रिक स्वरूपामुळे आपली व्यावसायिकता टिकवून ठेवते. कामाच्या कालावधीतही तुलनात्मक स्थिरता असते. तीन वर्षांचा कार्यकाळ प्रत्येक पोस्टिंग मध्ये मिळतो.

साधारण आठ वर्षे कालावधीपर्यंत सहायक आयुक्त, त्यानंतर क्रमाने प्राप्तिकर विभागाचा उपायुक्त, उपायुक्त (अन्वेषण), महानगर दर्जाच्या शहरात प्राप्तिकर विभागाचा आयुक्त, प्राप्तिकर विभागाचा संचालक, प्राप्तिकर विभागाचा मुख्य आयुक्त, प्राप्तिकर विभागाचा महासंचालक, वित्त सचिव, सचिव (महसूल), सचिव (अर्थ) अतिरिक्त सचिव अशी पदे प्राप्त होतात.

**जबाबदाऱ्या**

अन्वेषण ते निर्णय प्रक्रियेत समाविष्ट टप्पे आणि देशाच्या महसूल प्राप्तीशी संबंधित धोरणांची आखणी करण्याचा समावेश होतो. कर चुकवेगिरीच्या प्रवृत्तींचा तपास, तसेच काही वादग्रस्त प्रकरणात स्वतंत्र अपील ट्रायब्युनलमध्येही प्रतिनिधित्व करावे लागते.

निवडणुकींच्या काळात महसूल अधिकाऱ्यांची 'खर्च निरीक्षक' म्हणून नेमणूक केली जाते. अशा वेळी निवडणूक आयोगाच्या हाताखाली काम करताना निवडणुका योग्य व मुक्त वातावरणात व्हाव्यात म्हणून हे अधिकारी महत्त्वाचे योगदान देतात. प्रजासत्ताक दिनी ज्यांनी अतुलनीय धैर्य दाखवत सेवा बजावली आहे त्यांना राष्ट्रपतींच्या हस्ते प्रशस्ति प्रमाणपत्र मिळते. संवेदनशील ठिकाणी सेवा बजावणाऱ्या अधिकाऱ्यांकडे पिस्तूलही दिले जाते. ज्या जबाबदाऱ्या पूर्वी आय. ए. एस. व आय. पी. एस. अधिकारी होत्या. त्या बऱ्याच प्रमाणात आता आय. आर. एस. अधिकारी निभावतात.

**आर्थिक हद्दींचे संरक्षक**

आय. आर. एस. अधिकाऱ्यांना 'भारताच्या आर्थिक हद्दींचे संरक्षक' मानले जाते. त्यांची प्रतिनियुक्ती सी. बी. आय., राष्ट्रीय तपासणी संस्था, रॉ, आय. बी. येथेही होते. इतकेच काय परदेशात ते भारताच्या राजदूतालयातही काम करतात. (आय. एफ. एस. ऐवजी फर्स्ट सेक्रेटरी म्हणून त्यांची नेमणूक होऊ शकते) जागतिक बँक, जागतिक नाणेनिधी अशा आंतरराष्ट्रीय संस्थांतही त्यांची नेमणूक होऊ शकते. काही नियामक संस्थांचे प्रमुखही महसूल सेवेतून घेतले जातात उदा. दूरसंचार नियामक प्राधिकरण (टीआरएआय), भारताचा स्पर्धा आयोग (सीसीआय), सेबी इत्यादी.

**मूल्यमापन**

ही सेवा विस्तारते आहे व राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर या सेवेतून मिळणाऱ्या संधी वाढत चालल्या आहेत. वस्तू व सेवा कराच्या (जीएसटी) प्रवेशाने सर्व चित्र बदलणार आहे. तंत्रज्ञानाचा वाढता वापर कामाचे स्वरूप दिवसागणिक बदलत आहे. ई-फायलिंग पद्धती, सर्वोत्तम योजना, पैशाचे व्यवहार थेट न करता बँकेच्या द्वारेच करणे अशा गोष्टींमुळे कमी वेळात जास्त चांगली सेवा देता येऊ लागली आहे. केंद्रीय स्वरूपाची सेवा असल्याने कुठेही पोस्टिंग मिळते. अगदी स्वतःच्या राज्यात काम करता येते. त्यामुळे दूर फेकले गेल्याची भावना निर्माण होत नाही. महिला अधिकाऱ्यांना या सेवेतून करिअर व घर या दोन्हीचा समतोल चांगल्या प्रकारे साधता येतो.

**भारतीय रेल्वे सेवा**

यू. पी. एस. सी. परीक्षेच्या माध्यमातून रेल्वेच्या चार वेगवेगळ्या सेवांमध्ये प्रवेश घेता येतो. त्या सर्व गट 'अ' या प्रकारच्या आहेत.

**भारतीय रेल्वे यातायात सेवा (आयआरटीएस)**

यात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना भारतीय रेल्वेच्या वाहतूक (ऑपरेशन्स)किंवा व्यवसाय (कमर्शिअल) या शाखा सांभाळाव्या लागतात. हे अधिकारी रेल्वे व लोक तसेच रेल्वे व खाजगी कंपन्या यांच्यातील दुवा असतात. सध्या या सेवेत ८३० अधिकारी आहेत. निवड झालेल्या अधिकाऱ्यांचा मसुरी/भोपाळ/ हैद्राबाद येथील पायाभूत अभ्यासक्रम संपल्यावर मुख्य प्रशिक्षण भारतीय रेल्वेची राष्ट्रीय अकादमी, बडोदा येथे दिले जाते. पुढचे विशेष प्रशिक्षण वाहतूक व्यवस्थापन भारतीय रेल्वे संस्था (आयआरआयटीएम), लखनौ येथे दिले जाते. या प्रशिक्षणात संपूर्ण देशातील रेल्वेचा परिचय करून दिला जातो.



**जबाबदाऱ्या**

प्रशिक्षणानंतर अधिकाऱ्यांना सतरापैकी एखाद्या झोनमध्ये साहाय्यक व्यवस्थापक म्हणून नेमणूक मिळते. सर्व घटकांचा योग्य मेळ घालून माल व प्रवासी यांची वाहतूक सुरळीत पार पाडणे ही मुख्य जबाबदारी असते. त्यासाठी सर्व विभागांच्या संपर्कात राहून त्यांच्याकडून काम करून घ्यावे लागते.

**भारतीय रेल्वे कार्मिक सेवा (आयआरपीएस)**



या सेवेतील अधिकाऱ्यांकडे भारतीय रेल्वेतील कर्मचाऱ्यांचे (जे सुमारे १४ लाख आहेत) मानव संसाधन व्यवस्थापन करायचे असते. त्यात कर्मचाऱ्यांची भरती, प्रशिक्षण, बढती, पदावनती, बदली, शिस्तभंगाची कारवाई, निवृत्ती, पुनर्वसन अशा वेगवेगळ्या पैलूंचा समावेश होतो. योग्य व्यक्तीकडून योग्य काम व योग्य कामाला योग्य व्यक्ती शोधणे यासाठी नजर रत्नपारखी असावी लागते.

**भारतीय रेल्वे लेखा सेवा (आयआरएएस)**

यातील अधिकारी रेल्वेची लेखा (अकाऊंट्स) व वित्तीय व्यवस्थापन यासाठी जबाबदार असतात. सध्या यात सुमारे ६५० अधिकारी आहेत. १९२४ सालापासून रेल्वेचे वित्तीय व्यवस्थापन इतर व्यवस्थापनेपासून वेगळे केले गेले. तेव्हापासून स्वतःचा वेगळा अर्थसंकल्प मांडणारे रेल्वे हे एकमेव मंत्रालय आहे. या अधिकाऱ्यांकडून वित्तीय व्यवस्थापन, लेखा सादरीकरण व वित्तीय सल्लागार या सेवा दिल्या जातात. रेल्वेचा प्रत्येक खर्च या अधिकाऱ्यांच्या नजरेखालून जातो. ज्यांना कार्यालयीन काम व आकड्यांचा सहवास आवडतो त्यांना आय. आर. ए. एस. हे चांगले करिअर ठरू शकते. वरील तीनही सेवांचे एकत्रीकरण करण्याचा प्रस्ताव सरकारपुढे विचाराधीन आहे.

**रेल्वे सुरक्षा बल (आरपीएफ)**

रेल्वे प्रवासी, रेल्वेची संपत्ती यांची सुरक्षा ज्यांच्यावर सोपवली आहे ते म्हणजे रेल्वे सुरक्षा बल. सध्या यात एकूण ६५००० कर्मचारी आहेत. बलाचा प्रमुख हा वरिष्ठ आय. पी. एस. अधिकारी असतो. आर. पी. एफ. अकॅडमी, लखनौ येथे प्रशिक्षण दिले जाते. रेल्वेच्या हद्दीत घडलेल्या गुन्ह्यांचे अन्वेषण, भारतीय रेल्वेच्या भारतातल्या व परदेशातल्या मालमत्तेची सुरक्षा (देशातील सर्वाधिक मालमत्ता रेल्वेकडे आहे) या मुख्य जबाबदाऱ्या असतात.

सर्व रेल्वे सेवातून रेल्वे बोर्डाचा सदस्य या सर्वोच्च पदापर्यंत पोहोचता येते. (भारत सरकारचा सचिव हा दर्जा) इतर सरकारी खात्यांमध्ये प्रतिनियुक्तीवरही जाता येते.

**भारतीय लेखा परीक्षण व लेखा सेवा (आयएएस)**

आय.ए.ए.एस. ही भारताच्या लेखा परीक्षकाच्या (सीएजी) हाताखाली काम करणारी गट 'अ' प्रकारची केंद्रीय सेवा आहे. यात ६१४ अधिकारी आहेत. आय. ए. ए. एस.ची जबाबदारी केंद्र व राज्य सरकारे, सरकारी कंपन्या यांचे लेखापरिक्षण करणे व त्याचबरोबर राज्य सरकारांचा लेखा ठेवणे ही आहे. या सेवेतील अधिकारी एकतर राज्यांचा



लेखा बघतात किंवा मुख्यालयात काम करतात. उपमहालेखापरीक्षक (डीवायसीएजी) हे सर्वोच्च पद या सेवेतून प्राप्त करता येते.

**प्रशिक्षण**

निवडलेल्या अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण नशनल अकॅडेमी ऑफ ऑडिट ॲण्ड अकाउंट्स, सिमला येथे होते. प्रशिक्षणात कामाच्या सैद्धांतिक व उपयोजित अशा दोन्ही बाजू शिकवल्या जातात. प्रशिक्षणाच्या वेळी विविध संस्थांचा कार्यपरीचय करून दिला जातो जसे आर. बी. आय., नीती आयोग इत्यादी. लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अन्ड पोलिटिक्स येथेही प्रशिक्षणाचा काही भाग असतो ज्यामुळे आंतरराष्ट्रीय दृष्टिकोन प्राप्त होतो.

**कार्यकक्षा**

आय. ए. ए. एस. ही भारताच्या जुन्या सेवांपैकी एक आहे. या सेवेची कार्यालये देशभर असून देशाबाहेर लंडन, क्वौलालम्पूर व वॉशिंग्टन येथेही कार्यालये आहेत. भारताच्या परदेशातील राजदूतालयांचे लेखापरीक्षण करणे हाही कामाचा एक भाग आहे. संयुक्त राष्ट्रांच्या (यूएनओ) आदेशाने विविध आंतरराष्ट्रीय संस्थांच्या लेखापरीक्षणातही भाग घेतला जातो. सरकारचे जास्तीत जास्त जवळून दर्शन कोणाला होत असेल तर ते या सेवेतील अधिकाऱ्यांना होते. कॅग या घटनात्मक पदाच्या हाताखाली काम करीत असल्याने राजकीय हस्तक्षेप असा नसतोच.

**भारतीय नागरी लेखा सेवा (आयसीएएस)**

ही एक गट 'अ' केंद्रीय सेवा आहे. वित्त मंत्रालयाच्या व्यय विभागाखाली ती कार्य





करते. लेखा व लेखा परीक्षण यांना वेगळे करणे व हितसंबंधांचा संघर्ष टाळणे या हेतूने ही सेवा १९७६ पासून निर्माण केली गेली. या सेवेचे नेतृत्व लेखा महानिरीक्षक (सीजीए) करतो. (जसा आय. ए. ए. एस. चे कॅग करतो.)

**प्रशिक्षण**

वित्तिय व्यवस्थापनाची राष्ट्रीय संस्था (एनआयएफएम), फरिदाबाद येथे प्रशिक्षण होते. येथे अधिकाऱ्यांना सरकारी वित्तिय व्यवस्थापन या विषयावर पदव्युत्तर पदविका दिली जाते. परदेशात नेऊन तिथल्या कार्यपद्धतीचा परिचय करून दिला जातो. पुढचे प्रगत प्रशिक्षण सरकारी लेखा व वित्त संस्था (आयएनजीएएफ), दिल्ली येथे होते.

**जबाबदाऱ्या**

आयसीएएस अधिकारी सरकारला वित्तीय व्यवस्थापन सेवा पुरवतात. त्यात देणी सेवा, कर संकलन पद्धतीला आधार, लेखा, वित्तिय अहवाल, अर्थसंकल्प अंदाजपत्रकाची तयारी व त्याशिवाय केंद्र सरकारच्या नागरी मंत्रालयांचे अंतर्गत लेखा परिक्षण या जबाबदाऱ्या येतात. हे काम करताना तंत्रज्ञानाशीही जुळवून घ्यावे लागते. ई-पेमेंट, ई-लेखा अशा तंत्रज्ञान आधारित सेवा सरकारने सुरू केल्या आहेत. पोस्टिंग भारतात कुठेही मिळू शकते.

**भारतीय व्यापार सेवा (आयटीएस)**

ही केंद्रीय नागरी सेवांमधील 'अ' श्रेणीची सेवा आहे. ही विशेष सेवा भारताचा आंतरराष्ट्रीय व्यापार सांभाळण्यासाठी १९८६ साली निर्माण केली गेली. थोडक्यात ही तरुण सेवा आहे व विस्तारक्षम आहे. यात १८९ अधिकारी आहेत. भारतीय विदेश व्यापार संस्था (आयआयएफटी), नवी दिल्ली येथे प्रशिक्षण दिले जाते. व्यापार सेवा वाणिज्य मंत्रालयातील विदेश व्यापाराचे महासंचनालय (डीजीएफटी) यांच्या नियंत्रणाखाली काम करते. महासंचनालयाची भारतभर प्रादेशिक कार्यालये आहेत. ही सेवा भारताचे विदेश व्यापार धोरण ठरवणे व त्याची अंमलबजावणी करणे यात कळीची भूमिका पार पाडते. या

विभागाचे आठ कार्यकारी भाग आहेत. ते म्हणजे १) प्रशासन व सामान्य विभाग २) वित्त विभाग ३) आर्थिक विभाग ४) व्यापार धोरण विभाग ५) विदेश व्यापार सीमा विभाग ६) राज्य व्यापार व पायाभूत सुविधा विभाग ७) पुरवठा विभाग ८) नगदी पिके विभाग



**जबाबदाऱ्या**

भारताचा बाह्य व्यापार वाढवायचा प्रयत्न करणे. यात विविध व्यापार संघटना, चेम्बर्स ऑफ कॉमर्स, कस्टम व राज्य सरकारे, विशेष आर्थिक क्षेत्रे (एस. ई. झेड. ही कल्पनाच मुळी व्यापार सेवेतील अधिकाऱ्यांनी साकारली), तक्रार निवारण यंत्रणा या सगळ्यांमध्ये दुवा म्हणून काम करावे लागते. जागतिक व्यापार संघटनेसारख्या बहुपक्षीय व्यासपीठावर भारताच्या वतीने व्यापार धोरणाच्या वाटाघाटी करणे हाही कामाचा भाग आहे. या वाटाघाटी क्लिष्ट असतात.

भारताचे हितसंबंध सांभाळतानाच जागतिक व्यापाराला चालना देण्याची कसरत करावी लागते. द्विपक्षीय व्यापारी करार करतानादेखील (उदा. मुख्य व्यापार धोरण) आय. टी. एस. अधिकारी महत्वाची भूमिका निभावतात. त्याशिवाय डम्पिंगवर डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवणे, त्याविरुद्ध पावले उचलणे, निर्यातीला प्रोत्साहन देणे, व्यापार मेळावे भरवणे (उदा. दिल्लीतील प्रगती मैदान येथील भारतातील सर्वात मोठा व्यापार मेळावा), ई-कॉमर्सला चालना देणे या गोष्टी कामाचा भाग असतात.

### भवितव्य

भविष्यात जसे व्यापाराचे महत्त्व वाढत जाईल तशी या अधिकाऱ्यांची नेमणूक भारताच्या विदेशातील राजदूतालयात देखील केली जाईल. या सेवेतील अधिकाऱ्यांची भारतात कोठेही नेमणूक होऊ शकते. केंद्रीय कर्मचारी योजनेखाली इतर खात्यांमध्ये प्रतिनियुक्ती होऊ शकते. त्यामुळे सध्या कमी महत्त्वाची वाटणारी ही सेवा उज्ज्वल भवितव्याची आहे हे निश्चित.

### भारतीय आयुध निर्माण सेवा (आयओएफएस)

ही सेवा श्रेणी 'अ' प्रकारची सेवा असून यातील अधिकारी सरंक्षण-नागरी अधिकारी असतात व ते संरक्षण मंत्रालयाखाली काम करतात. भारताच्या अर्थसंकल्पातील सर्वात मोठा वाटा संरक्षण मंत्रालयाला मिळतो. त्यातून त्याच्या कामाची व्याप्ती लक्षात येते. या सेवेची स्थापना १९५४ साली झाली. आय. ओ. एफ. एस. या सेवेत तांत्रिक व अतांत्रिक अशी दोन्ही प्रकारची पदे येतात.

### प्रशिक्षण

संरक्षण उत्पादनाची राष्ट्रीय अकादमी (एनडीपी), नागपूर येथे अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाते. या सेवेतील अधिकाऱ्यांना देशात व परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी प्रवृत्त केले जाते.

### जबाबदाऱ्या

आयुध निर्माण बोर्ड ही जगातली सर्वात मोठी सरकारी क्षेत्रातील निर्माण संस्था आहे. रेल्वे खालोखाल स्थावर संपत्ती बोर्डाकडे आहे. या सेवेला 'संरक्षण सेवेचा चौथा हात' असे म्हटले जाते. आय. ओ. एफ. एस. अधिकाऱ्यांचे प्रमुख कार्य आयुध निर्माण क्षेत्रातील संशोधन व विकासाकडे लक्ष देणे, प्रकल्प व्यवस्थापन करणे, उत्पादन, नियोजन आणि नियंत्रण, पुरवठा व्यवस्थापन, औद्योगिक सुरक्षा, कामगार कल्याण, कर्मचारी व्यवस्थापन, औद्योगिक संबंध राखणे हे असते. सरकारच्या इतर खात्यात प्रतिनियुक्तीही मिळू शकते.

### भारतीय संरक्षण लेखा सेवा (आयडीएएस)

आय. डी. ए. एस. ही श्रेणी 'अ' प्रकारची केंद्रीय नागरी सेवा आहे. ही सेवा संरक्षण सेवा विभाग (डीएडी) या भारत सरकारच्या अडीचशे वर्ष म्हणजे सर्वात जुन्या (१७४७ पासून) विभागाखाली काम करते. हे संरक्षण-नागरी स्वरूपाचे पद असून संरक्षण मंत्रालयाच्या, वित्त विभागाच्या अधीनस्थ कार्यरत असते. प्रशिक्षण राष्ट्रीय संरक्षण वित्त व्यवस्थापन अकादमी, पुणे येथे होते. प्रशिक्षणाचा काही भाग अमेरिका किंवा ब्रिटन येथेही पार पाडला जातो.

सर्व प्रकारच्या वित्तीय सेवा पुरवणे हे प्रमुख कार्य असते. या सेवेतील अधिकारी शस्त्रास्त्रांची खरेदी, परवाने, सेवा हमी, तंत्रज्ञानाचे हस्तांतरण या सर्व बाबतीत प्रमुख सल्लागार व वित्तीय व्यवस्थापक म्हणून काम करतात. ते ज्या मंत्रालयाला सेवा देतात त्या संरक्षण मंत्रालयाला देशातील अर्थसंकल्पाचा सर्वात मोठा वाटा मिळतो. (साधारणपणे अडीच लाख कोटी) त्यातून या कामाची विशालता व महत्त्व कळते.

साधनांचा पुरेपूर वापर करून संरक्षण सामग्री व सर्व दले यांना तयार ठेवणे यात अप्रत्यक्षरीत्या या सेवेचा मोठा वाटा असतो. मोठेमोठे प्रकल्प प्रत्यक्षात आणण्याचा त्यांना अनुभव असतो. अतिशय किचकट अशा समस्यांतून मार्ग काढून ते यश मिळवून देऊ शकतात. त्यामुळे या अधिकाऱ्यांना देशात व परदेशात नेहमीच मागणी असते. हे अधिकारी संरक्षण मंत्रालय व नागरी नोकरशाही यांच्यामध्ये दुवा म्हणूनही काम करतात. इतर सेवांपेक्षा या सेवांमध्ये बढतीही वेगाने होते.

### भारतीय संरक्षण मालमत्ता सेवा (आयडीईएस)

आय. डी. ई. एस. ही १९८५ मध्ये स्थापन झालेली श्रेणी 'अ' ची केंद्रीय नागरी सेवा आहे. ही सेवा संरक्षण मंत्रालयाच्या अखत्यारित

### भारतीय माहिती सेवा (आयआयएस)

माहिती सेवा ही एक गट 'अ' प्रकारची केंद्रीय सेवा आहे. सध्या या सेवेत ५७१ अधिकारी आहेत. हे अधिकारी माहिती व प्रसारण (आयबी) मंत्रालयाच्या नियंत्रणाखाली काम करतात. निवड झालेल्या अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण नवी दिल्ली येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मास कम्युनिकेशन येथे होते. त्यानंतर एक वर्ष माहिती व प्रसारण विषयात काम करणाऱ्या महत्त्वाच्या संस्थांचा परिचय करून दिला जातो. उदा. दूरदर्शन.

अधिकाऱ्यांच्या करिअरची सुरवात साहाय्यक संचालक या पदापासून होते. सर्वोच्च स्तरावर प्रधान महासंचालक (प्रिंसिपल डायरेक्टर जनरल) या पदापर्यंत जाण्याची संधी असते. आय. आय. एस. अधिकाऱ्यांची इतर खात्यात प्रतिनियुक्ती होऊ शकते.

**जबाबदाऱ्या :** प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरोच्या (पीआयबी) मुख्यालयाचे प्रशासन चालवणे व तेथील कामात समन्वय घडवून आणणे. सरकारचे दैनंदिन प्रसिद्धी कार्य सांभाळणे, देशभर विखुरलेल्या प्रसिद्धी केंद्रांना दिशादर्शन करणे, त्यांच्या कार्याचे मूल्यमापन करणे. प्रसिद्धी अभियान राबवून सरकारी काम परिणामकारकपणे लोकांपर्यंत पोहोचवणे, भारतातील वृत्तपत्रांच्या कायदेशीर बाबींची छाननी करणे इत्यादी.

### लख लख चंदेरी दुनिया

आय. आय. एस. अधिकाऱ्याचे काम मोठे आव्हानात्मक व वैविध्यपूर्ण असते. त्यात प्रसिद्धी अभियानाची व्यूहरचना ठरवणे, पत्रकार परिषदा आयोजित करणे, विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सोहळे आयोजित करणे. उदा. संगीत महोत्सव, सिनेमा महोत्सव. काम करताना पत्रकारिता, जनसंपर्क व प्रशासक या तिन्ही कौशल्यांचा संगम घडवून आणावा लागतो.

**भारतीय डाक सेवा (आयपीओएस)**

भारताला २२ पोस्टल सर्कलमध्ये विभागण्यात आले आहे. प्रत्येक सर्कलचा प्रमुख चीफ पोस्टमास्तर जनरल हा असतो.

**प्रशिक्षण**

रफी अहमद किडवाई राष्ट्रीय डाक अकादमी, गाझियाबाद येथे व्यावसायिक अभ्यासक्रमाद्वारे प्रशिक्षण दिले जाते. डाक विभागाच्या वेगवेगळ्या सर्कलनुसार पोस्टल ट्रेनिंग सेंटर्स (पीटीसी) ची स्थापनादेखील करण्यात आली आहे. ही टपाल सेवा प्रशिक्षण केंद्रे सहारणपूर, बडोदे, म्हैसूर, गुवाहटी, मदुराई आणि दरभंगा येथे आहेत. या अकादमीमध्ये पोस्टल सुपरिंटेंडंटसाठीचे प्रशिक्षण कार्यक्रम, मिड-करिअर प्रशिक्षण कार्यक्रम, आशिया आणि आफ्रिकेतील देशांच्या डाक अधिकाऱ्यांचे आंतरराष्ट्रीय प्रशिक्षणाचे कार्यक्रम आयोजित केले जातात.



**प्रतिनियुक्तीची संधी**

या अधिकाऱ्यांना स्वित्झर्लंडमधील बर्न येथील युनिव्हर्सल पोस्टल युनियनमध्ये अथवा अन्य देशातील मोहिमेवर प्रतिनियुक्तीवर पाठवले जाते. आर्मी पोस्टल सर्व्हिसेसवर नियुक्तीवर केवळ भारतीय डाक सेवेतील व्यक्ती जाऊ शकतात.सैन्यात पाच वर्षे मेजर या पदावर काम करायची संधी मिळते. सध्या संजय आखाडे हा अधिकारी या प्रकारे सैन्यात काम करीत आहे. सरकारच्या इतर कोणत्याही समकक्ष पदावर प्रतिनियुक्ती होऊ शकते. शेतकरी नेते शरद जोशी हे भारतीय डाक सेवेचेच अधिकारी होते.

येते. त्यांचे प्रशिक्षण 'संरक्षण मालमत्ता व्यवस्थापनाची राष्ट्रीय संस्था' (एनआयडीईएम) येथे दिले जाते. संरक्षण मंत्रालयाकडे मोठ्या प्रमाणावर स्थावर जंगम मालमत्ता आहे. या सेवेचे प्रमुख कार्य ती मालमत्ता जतन करणे, तिचे व्यवस्थापन करणे व तिचे वेळोवेळी लेखापरिक्षण करणे हे आहे. त्यात एखादी मालमत्ता विकत घेणे, ताब्यात घेणे, भाड्याने घेणे, सोडून देणे यांचा समावेश होतो. कटक मंडळाचा (कॅन्टॉन्मेंट बोर्ड) प्रमुख तर व्यापक अधिकार असतात व तितक्यात जबाबदाऱ्या पेलाव्या लागतात. त्यात नागरी व पालिकेच्या सेवा पुरवणे, ज्यात रस्ते, पायाभूत सुविधा, बगिचे, ग्रंथालये, बाजार, शाळा, दवाखाने या सोयी कटक मंडळात राहणाऱ्या नागरिकांसाठी पुरवाव्या लागतात. शिवाय स्वच्छ पिण्याचे पाणी, नगर विकास योजना, कर धोरण, जन्म मृत्यूची नोंदणी, निवडणूका व शिरगणतीची तयारी यांचा समावेश होतो. कामात पुरेसे स्वातंत्र्य मिळते.

**आर्मड फोर्सेस हेडक्वार्टर सिव्हिल सर्विस**

ही १९६८ सालापासून निर्माण केलेली श्रेणी 'ब' ची सेवा आहे. यात संरक्षण मंत्रालयात काम करताना विविध संस्था, तिन्ही संरक्षण दले यांच्यात समन्वय साधणे ही महत्त्वाची भूमिका निभवायची असते. प्रत्यक्ष लढाई सोडून बाकी सर्व व्यवस्थेची जबाबदारी या अधिकाऱ्यांच्या खांद्यावर असते. संरक्षण दलाच्या सर्व गरजा वेळेत व दर्जेदारपणे पूर्ण करण्यात या अधिकाऱ्यांचा मोलाचा सहभाग असतो.

**दिल्ली, अंदमान आणि निकोबार बेटे नागरी सेवा**

या सेवेला छोट्या स्वरूपात डॅनिक्स असे संबोधतात (डीएएनआयसीएस) त्यात अंदमान व निकोबार बेटे, लक्षद्वीप, दमण व दीव आणि दादरा व नगर हवेली नागरी सेवेचा समावेश होतो. ही एक श्रेणी 'ब' ची केंद्रीय सेवा आहे. १९७२ साली स्थापन झालेल्या या सेवेतील अधिकारी केंद्रीय गृह मंत्रालयाच्या अधीन काम करतात. दोन वर्षांचे प्रशिक्षण संपल्यानंतर या अधिकाऱ्यांची नेमणूक साहाय्यक कलेक्टर (जिल्हा प्रशासन, दिल्ली) येथे होते. याशिवाय दिल्ली सरकारच्या विविध मंत्रालयात उपसचिव म्हणूनदेखील नेमणूक होऊ शकते. सेवेत वरिष्ठ झाल्यावर (जीएमयुटी) केदारमध्ये भारतीय प्रशासकीय सेवेचे अधिकारी (आय. ए. एस.) म्हणून सामावून घेतले जाते.

ही सेवा लोक, प्रदेश, भाषा यातील मनोरम वैविध्य समोर आणणारी आहे. निसर्गाचे वरदान लाभलेल्या सुंदर ठिकाणी पोस्टिंग होते. दिल्लीसारखे भारताचे हृदय या सेवेत येते. नियमानुसार या सेवेतील अधिकारी आठ वर्षात आय. ए. एस. होतात. हा तर आय. ए. एस. मध्ये मागच्या दाराने केलेला प्रवेश असतो. आश्चर्य नव्हे की उमेदवार अग्रक्रम देताना गट 'ब' मध्ये या सेवेला वरती ठेवतात.

**भारतीय पोस्ट व टेलिग्राम लेखा व वित्तसेवा (आयपी एएमपी, टीएएस)**

ही एक श्रेणी 'अ' ची नागरी केंद्रीय सेवा आहे. पोस्ट खाते व दूरसंचार खाते यांना व्यावसायिक वित्तसेवा देण्यासाठी या सेवेची निर्मिती १९७३ मध्ये झाली.

अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण संपर्क वित्ताच्या राष्ट्रीय संस्थेत (एनआयसीएफ) गाझियाबाद, येथे दिले जाते. प्रशिक्षण वर्गात व प्रत्यक्ष क्षेत्रात अशा दोन्ही प्रकारे दिले जाते. सुरुवातीला साहाय्यक मुख्य लेखा अधिकारी हे पद मिळते. नेमणूक देशात कोठेही होऊ शकते. पण बहुतांश जागा राजधानीच्या शहरात असतात. सध्याचे बी.एस.एन.एल., एम.टी.एन.एल.चे प्रमुख या सेवेतून आले

आहेत. ग्रामीण भागात दूरसंचार सेवा पुरवण्यासाठी बरीच वित्तीय तयारी करावी लागते. त्याचे व्यवस्थापन करण्यात या अधिकाऱ्यांचा मोलाचा वाटा असतो. काम करताना हे अधिकारी लेखा, अंतर्गत लेखापरीक्षण, खात्याचा अर्थसंकल्प बनवणे इत्यादी वा पुरवतात.

**दिल्ली, अंदमान व निकोबार बेटे पोलीस सेवा (डीएएनआयपीएस)**

ही संघराज्याची पोलीस सेवा आहे ज्यात केंद्रशासित प्रदेशांचा समावेश होतो. ही श्रेणी 'ब' प्रकारची केंद्रीय सेवा आहे. या सेवेतील अधिकारी दिल्ली, अंदमान व निकोबार, लक्षद्विप, दमण व दीव, दादरा व नगरहवेली या केंद्रशासित भागांमध्ये कायदा व सुव्यवस्था राखण्याचे काम करतात. निक्स जशी प्रशासकीय सेवा आहे. हे अधिकारी भारतातील सर्वात मोठ्या महानगरी पोलीस सेवेचा (दिल्लीचा) कणा आहेत. ते केंद्रीत गृहमंत्रालयाच्या हाताखाली काम करत आहेत. सुरुवातीला साहाय्यक पोलीस उपायुक्त या पदावर नियुक्ती होते. या सेवेतील अधिकाऱ्यांना भारतीय पोलिस सेवा (आय. पी. एस.) या केडरमध्ये काही काळाने सामावून घेतले जाते.

याशिवाय पॉंडिचेरी सिव्हील व पॉंडिचेरी पोलिस या दोन श्रेणी 'ब' च्या सेवादेखील यूपीएससीच्या परीक्षा देऊन प्राप्त होतात.

**पदनाम्याच्या सरतेशेवटी**

या सेवांची पदे प्रत्येक वर्षी भरली जातात का? तर ते मागणीवर अवलंबून असते. एखाद्या वर्षी मागणी नसेल तर त्या सेवेत पदे भरली जात नाहीत. किती पदे भरणार हेही निश्चित नसते. मागणीनुसार पदांची संख्या कमी जास्त होऊ शकते.

**भवितव्याची झुंजूमुंजू**

या पदांना अग्रक्रम देऊन उमेदवार आपली पसंती घोषित करतात. अर्थात आयोग हा क्रम व त्या उमेदवारांची रँक यांचा मेळ घालून पद देते. त्यामुळे काही वरचे दोनशे उमेदवार सोडले (त्यांना त्यांच्या पसंतीचे पद मिळणार असते) तर इतरांना निकालानंतर अनेक दिवस कोणते पद मिळणार याची कल्पना नसते. सरतेशेवटी पदवाटप झाल्यावर सेवा निश्चित होते. एकदा हे पदवाटप झाले की त्यात बदल केला जात नाही.

पदांना असलेली मागणी वेगवेगळ्या काळात वेगवेगळी असते. आय.ए.एस.चे आकर्षण कायम राहिले असले तरी बाकीच्या पदांमध्ये एकप्रकारची स्पर्धा असते उदा. सध्या भारतीय विदेश सेवेची क्रेझ मोठया प्रमाणावर आहे. भारतीय महसूल सेवाही कधीकधी उमेदवारांची पहिला किंवा दुसरी पसंती असते. पदांचे वाटप झाले की, प्रत्येक उमेदवाराला प्रशिक्षणासाठी बोलावणे येते. पुन्हा परीक्षा द्यायची असेल तर काही उमेदवार पायाभूत प्रशिक्षणावर (फाऊंडेशन कोर्स) रुजू होणे टाळतात. आय.ए.एस व आय.एफ.एस. या सेवांना मात्र हा कोर्स करावाच लागतो. निकाल ते प्रशिक्षण यातील कालावधी आता कमी करत आणला आहे. निकालापासून एक ते दीड महिन्यातच प्रशिक्षणावर रुजू व्हावे लागते. ही पदवाटपाची प्रक्रिया जास्तीत जास्त पारदर्शक ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**भारतीय उद्यम कायदे सेवा (आयसीएलएस)**

देशभरातील नवनवीन कंपन्यांची लक्षणीय वाढ पाहता, केंद्रीय नागरी सेवांमध्ये इंडियन कॉर्पोरेट लॉ सर्व्हिसेस (आयसीएलएस) ही नवीन सेवा सुरू करण्यात आली आहे. ही एक उद्यम मंत्रालयाखाली काम करणारी श्रेणी 'अ' प्रकारची सेवा आहे. यू. पी. एस. सी. तून निवड झालेली पहिली बॅच २००९ ची आहे. थोडक्यात ही अत्यंत तरुण सेवा आहे. या सेवेत २१७ अधिकारी आहेत. शास्त्री भवन, दिल्ली येथे या सेवेचे मुख्यालय आहे. भारतात दहा लाखांवर नोंदणीकृत कंपन्या आहेत. त्यांच्यावर या सेवेतील अधिकारी विविध २५ क्षेत्रीय कार्यालयातून लक्ष ठेवतात.



**प्रशिक्षण**

प्रशिक्षण मानेसर (हरयाणा) स्थित इंडियन इन्स्टिटयूट ऑफ कॉर्पोरेट अफेअर्स या संस्थेत दिले जाते. प्रशिक्षणात वित्त, लेखा, व्यवस्थापन, अर्थशास्त्र आणि कायदा हे विषय शिकवले जातात.

**जबाबदाऱ्या**

उद्यम नियम कायद्यांची रचना करण्यासाठी तज्ज्ञ सुविधा उपलब्ध करणे हा उद्देश या सेवेच्या निर्मितीमागे आहे. देशात कॉर्पोरेट लॉ (उद्यम कायदे) आणि उद्यम नियमन अमलात आणण्याची जबाबदारी या सेवेतील अधिकाऱ्यांची असते. जागतिकीकरणाच्या काळात खासगी क्षेत्राच्या कारभारावर नजर ठेवणारी ही एक महत्त्वपूर्ण सेवा आहे. कॉर्पोरेट गव्हर्नन्सशी संलग्न असलेल्या कंपनी कायदा आणि अन्य कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी ही संस्था जबाबदार असते.

कंपनी निबंधकांच्या कार्यप्रणालीच्या देखरेखीचे कार्य या महासंचालनालयाकडून केले जाते आणि कंपनी अवसायनाची (लिक्विडेशन) प्रक्रिया प्रभावीपणे पार पाडण्यासाठी अधिकृत लिक्विडेटर म्हणूनही काम पाहिले जाते.

– **डॉ.मनोज भिडे,** (संचालक, राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था)

– **भूषण देशमुख,** (प्राध्यापक, राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई)

# तयारी नागरी सेवा परीक्षेची

प्रेरणा

**केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत देशातील सर्वात महत्त्वपूर्ण आणि सर्वात कठीण अशी नागरीसेवा परीक्षा घेतली जाते. या परीक्षेविषयी मोठ्या प्रमाणावर जागृती निर्माण झाली आहे. लहान-लहान गावातील अनेक मुले या परीक्षेकडे वळत आहेत.**

यूपीएसएसीची परीक्षा ही तीन टप्प्यांमध्ये घेतली जाते. त्यामध्ये पूर्व परीक्षा ही ४०० गुणांची असते त्यात पहिला पेपर हा सामान्य अध्ययन २०० गुण व दुसरा पेपर सी-सॅट २०० गुण असे ४०० गुण या पूर्व परीक्षासाठी असतात. ही परीक्षा ५वी ते १०वींच्या तसेच एनसीईआरटीच्या पुस्तकांच्या व सामान्यज्ञानाच्या धर्तीवर असते, तर सी-सॅटचा पेपर हा निर्णय क्षमता, संवाद कौशल्य, समस्या सोडवणूक, तर्कनिष्ठपणा, बुद्धिमत्ता यावर आधारित असते. या परीक्षेत फक्त सामान्य अध्ययन हा पेपरच यशस्वितेसाठी ग्राह्य धरला जातो. तर सी-सॅट पेपरचे गुण हे साधारण ३३टक्के गुण उत्तीर्णसाठी आवश्यक असतात. या परीक्षेत ज्यांना १२० च्या वर गुण मिळतील ते विद्यार्थी शक्यतो मुख्य परीक्षेसाठी पात्र ठरतात.

दुसरा टप्पा मुख्य परीक्षेचा आहे. ही मुख्य परीक्षा १७५० गुणांची असते. त्यामध्ये इंग्रजी भाषा हा पेपर अनिवार्य असतो. व दुसरा पेपर भाषेचा असतो. यामध्ये कुठलीही भाषा निवडता येते. या दोन्ही पेपरसाठी प्रत्येकी 300 गुण आहेत. मात्र या दोन्ही विषयाचे गुण केवळ उत्तीर्णसाठी ग्राह्य धरले जातात. साधारणतः ३५ टक्के गुण त्यामध्ये असणे आवश्यक आहे. या गुणांची मुख्य परीक्षेच्या गुणांमध्ये गणना केली जात नाही. जे गुण मुख्य परीक्षेसाठी ग्राह्य धरले जातात त्यामध्ये पेपर - I हा निबंधलेखनाचा असतो त्याला २५० गुण असतात.

सामान्य अध्ययनांचे एकूण चार पेपर असतात. या प्रत्येक पेपरला २५० एवढे गुण असतात व हे सर्व पेपर वस्तूनिष्ठ स्वरूपात आहेत. यातील सामान्य अध्ययन (II) या पेपरसाठी भारतीय वारसा, संस्कृती, जागतिक इतिहास-भूगोल आणि समाज इत्यादी घटकांचा समावेश आहे. सामान्य अध्ययन (III) या पेपरमध्ये शासन, राज्यघटना, राज्यशास्त्र, सामाजिक न्याय, अंतर्राष्ट्रीय संबंध आदि घटकांचा समावेश आहे.

सामान्य अध्ययन (IV) यामध्ये तंत्रज्ञान, अर्थशास्त्र, विकास, जैव वैविधता, पर्यावरण, सुरक्षा, आपत्ती व्यवस्थापन आदि घटकांचा समावेश आहे. सामान्य अध्ययन (V) यामध्ये नैतिक मूल्य, एकात्मता आणि प्रवृत्ती याचा अंतर्भाव आहे. या परीक्षेसाठी

UPSC



दोन विषय वैकल्पिक म्हणून निवडावे लागतात. प्रत्येकी २५० गुण आहेत. या विषयांची यादी अशी - कृषी, पशु विज्ञान, मानववंशशास्त्र, वनस्पती शास्त्र, रसायन शास्त्र, स्थापत्य अभियांत्रिकिशास्त्र, वाणिज्यशास्त्र, अर्थशास्त्र, विद्युत अभियांत्रिकी, भूगोल, भूगर्भशास्त्र, भारतीय इतिहास, कायदा, व्यवस्थापन, गणित, इत्यादींचा समावेश आहे. तर मुलाखतीसाठी २७५ गुण आहेत.

### तयारी कशी करावी

ही परीक्षा ५ वीं ते पदवीच्या परीक्षेच्या अभ्यासक्रमावर आधारित असल्याने प्रारंभी ५ वी ते १० वी पर्यंतची सर्व पाठ्यपुस्तके जमा करावीत तसेच (एनसीईआरटी)ची पुस्तके, काही चालू घडामोडीवर आधारित मासिके एकत्र करून ती वाचावीत. शक्यतो ५वी ते १०वी ची पाठ्यपुस्तके काळजीपूर्वक वाचून त्याच्या नोट्स काढाव्यात. नंतर आपण जे विषय ऐच्छिक निवडणार आहोत त्याची पुस्तके दोन-तीन वेळा वाचून काढावीत. तुम्ही जेवढी उजळणी कराल तेवढे तुम्हाला परीक्षेत आठवेल. या परीक्षेसाठी बाजारात खूप संदर्भसाहित्य उपलब्ध आहे. पण नेमकेपणाने कुठले साहित्य वाचले पाहिजे, हे समजायला हवे.

### शैक्षणिक पात्रता, वयोमर्यादा व परीक्षेच्या संधी


यूपीएससी परीक्षेसाठी कुठल्याही विषयातील किमान पदवी परीक्षा उत्तीर्ण असणे गरजेचे असते. खुल्या प्रवर्गासाठी ३२ वर्ष एवढी वयाची अट असून त्यांना ६ वेळा परीक्षा देता येते. अनुसूचित जातीच्या उमेदवारांना वयाच्या ३७ वर्षांपर्यंत परीक्षा देता येते. त्यांना कितीही वेळा परीक्षेला बसता येऊ शकते. इतर मागासवर्गीयांसाठी ३५ वर्ष वयाची अट असून ९ वेळा परीक्षेची संधी आहे.

### परीक्षेचा संभाव्य कालावधी

यूपीएससी नियमितपणे ही परीक्षा घेत असते. दरवर्षी साधारण १००० ते १२०० जागांसाठी यूपीएससीची जाहिरात दर वर्षी मे महिन्यात येते. यूपीएससीची पूर्व परीक्षा साधारणतः ऑगस्ट महिन्यात होते व निकाल ऑक्टोबरमध्ये लागतो. मुख्य परीक्षा डिसेंबरमध्ये तर निकाल मार्चमध्ये लागतो व मुलाखती एप्रिल-मे मध्ये घेतल्या जातात व जूनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत यशस्वी झालेल्या उमेदवारांची घोषणा केली जाते व त्यांना गुणानुक्रमे केडर दिले जाते.

**डॉ. बबन जोगदंड**
(लेखक हे पुणे येथील यशदा संस्थेत संशोधन अधिकारी आहेत.) संपर्क: ०९८२३३३८२६६

# तुम्ही जिंकणारच...




संघ लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा स्पर्धा परीक्षेकरिता दरवर्षी अंदाजे सहा लाख उमेदवार बसतात आणि या सर्व उमेदवारांमधून अंदाजे १२०० उमेदवारांची अंतिमत: निवड केली जाते. या संख्येचा विचार करूनच बहुतेक उमेदवार या स्पर्धा परीक्षेला बसण्याचे टाळतात. या स्पर्धा परीक्षेसंबंधात बहुतेक उमेदवारांमध्ये विशेषत: महाराष्ट्रीय उमेदवारांमध्ये एक प्रकारचा न्यूनगंड निर्माण झालेला आहे. इतकी मोठी संख्या विचारात घेता आपली निवड कशी होणार, अशा प्रकारची नकारात्मक मानसिकता बऱ्याचशा महाराष्ट्रीय मुलांमध्ये दिसून येते. मात्र आपण हे लक्षात घ्यावे की, या परीक्षेला बसणारे सर्वच विद्यार्थी फार गंभीर असतात असे नाही. बऱ्याचदा असे दिसून येते की, ७० टक्क्यांपेक्षा अधिक उमेदवार परीक्षेची फारशी तयारी न करताच परीक्षेला बसलेले असतात. त्यामुळे केवळ संख्येचा विचार करून या परीक्षेबद्दल भीती बाळगण्याचे कोणतेही कारण नाही.

संघ लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा स्पर्धा परीक्षेकरिता इंग्रजी विषयाचे खूप ज्ञान असणे आवश्यक नाही. मराठी भाषेतूनसुद्धा ही स्पर्धा परीक्षा देता येऊ शकते. या स्पर्धा परीक्षेत यश मिळवण्याकरिता खालील पाच गोष्टींची अत्यंत आवश्यकता आहे.

## यशाची पंचसूत्री

### प्रवृत्ती

या स्पर्धा परीक्षेस बसणाऱ्या सर्व उमेदवारांची प्रवृत्ती सकारात्मक असली पाहिजे. सकारात्मक प्रवृत्ती याचा अर्थ जिंकण्याची प्रवृत्ती. दृढनिर्धार आणि सकारात्मक प्रवृत्ती या दोन्ही बाबी प्रत्येक उमेदवाराच्या ठिकाणी असणे आवश्यक आहे. स्पर्धा परीक्षेची ही लढाई 'मी जिंकणारच' या मनोवृत्तीने स्पर्धा परीक्षेची तयारी करणे आवश्यक ठरते. प्रयत्न करू, यशस्वी झालो तर ठीकच अन्यथा दुसरीकडे बघू, अशा प्रकारची प्रवृत्ती बाळगून चालणार नाही. कोणतीही लढाई ही फक्त जिंकण्याकरिताच लढली पाहिजे, हरण्याकरिता नव्हे, ही जाणीव प्रत्येक उमेदवाराने आपल्या मनात ठेवणे आवश्यक आहे.

### कठोर परिश्रम

या परीक्षेची तयारी करण्याकरिता कठोर परिश्रमाची गरज आहे. केवळ Superficial (वरवरती) अभ्यास करून चालत नाही. दररोज कमीत कमी १२ तास या पद्धतीने कमीत कमी १ वर्ष अभ्यास केला तरच या स्पर्धा परीक्षेमध्ये यश मिळू शकते. उमेदवार सर्वसाधारण दर्जाचा असेल तर त्यास दीड ते दोन वर्षेसुद्धा अभ्यास करावा लागतो. विद्यार्थी तर ३ वर्षेपावेतो अभ्यास करतात. अर्थात, हा कालावधी त्या उमेदवारांच्या क्षमतेवर अवलंबून असतो. एखादा उमेदवार फार हुशार असेल तर तो एका वर्षातसुद्धा तयारी करू शकतो.

### अभ्यास आणि परीक्षेचे तंत्र

या नागरी सेवा स्पर्धा परीक्षेकरिता योग्य अभ्यास तंत्र आणि योग्य परीक्षा तंत्र अवगत करणे आवश्यक आहे. बऱ्याचदा असे दिसून येते की, योग्य तंत्र अवगत न झाल्यामुळे अभ्यासाची दिशा चुकते आणि पर्यायाने अभ्यास करूनसुद्धा उमेदवार यशस्वी होऊ शकत नाही. त्यामुळे या परीक्षेच्या विषयांचे अभ्यास करण्याचे योग्य तंत्र उमेदवारांना माहीत असणे आवश्यक आहे. त्यासोबतच परीक्षेत उत्तरे लिहिण्याचे तंत्रसुद्धा अवगत असणे गरजेचे आहे. अभ्यासाच्या योग्य तंत्रामध्ये सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे योग्य पुस्तकाची निवड आणि त्यासोबतच प्रत्येक पुस्तकातील कुठल्या बाबींना किती महत्त्व द्यावे याबाबतची माहिती.

बाजारात सर्वच विषयांची अनेक पुस्तके उपलब्ध आहेत, परंतु या अनेक पुस्तकांपैकी फारच कमी पुस्तके दर्जेदार आहेत. त्यामुळे या दर्जेदार पुस्तकांची नावे स्पर्धा परीक्षेला बसणाऱ्या उमेदवाराला माहिती असणे आवश्यक आहे. बरीचशी दर्जेदार पुस्तके, मुंबई, पुणे व दिल्ली यासारख्या मोठ्या शहरात उपलब्ध आहेत. त्यामुळे लहान शहरातील आणि ग्रामीण भागातील उमेदवारांना ही पुस्तके मिळविण्यात अनेक अडचणी येतात. दर्जेदार पुस्तकांसोबत काही दर्जेदार मासिकांचे आणि दैनिकांचे वाचन करणे क्रमप्राप्त ठरते. केंद्र शासन तसेच राज्य शासनातर्फे दरवर्षी अनेक प्रकारचे अहवाल प्रसिद्ध केले जातात. या सर्व अहवालांमध्ये अतिशय चांगल्या प्रकारची आणि बिनचूक माहिती उपलब्ध असते. त्यामुळे अभ्यासाचे योग्य तंत्र विकसित करण्यामध्ये दर्जेदार पुस्तके, दर्जेदार मासिके, दैनिके आणि शासनाचे अहवाल या सर्वांचा योग्य प्रकारे उपयोग करणे आवश्यक ठरते.

एखादे पुस्तक कितीही दर्जेदार असले तरीसुद्धा त्यात सर्वच बाबींचा समावेश असेल असे नाही. त्यामुळे प्रत्येक विषयांसंबंधित ३ ते ४ दर्जेदार पुस्तकांचे वाचन केल्यास कोणत्याही प्रश्नाचे उत्तर अधिक सर्वंकष आणि मुद्देसूद पद्धतीने लिहिणे शक्य असते. केवळ एकाच पुस्तकाचे वाचन केल्यास बरेचसे महत्त्वाचे मुद्दे सुटून जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. स्पर्धा परीक्षा ही बाद पद्धतीवर आधारित असते. या स्पर्धा परीक्षेत पास किंवा नापास होण्याचा प्रश्नच नाही. जेवढ्या जागा उपलब्ध आहेत, त्या जागांमध्ये माझा क्रमांक कसा लागेल, हा महत्त्वाचा मुद्दा आहे. त्यामुळे इतर उमेदवारांनी लिहिलेल्या उत्तरांपेक्षा मी लिहिलेले उत्तर अधिक चांगले असेल या दृष्टीने प्रत्येक उमेदवाराने प्रयत्न करणे गरजेचे असते. पुस्तके आणि मासिकासोबतच इंटरनेटचाही नियमितपणे वापर करावा.

### दृढ निर्धार

महाविद्यालयीन शिक्षणाचे पहिल्या वर्षापासूनच आपले करिअरबाबत निश्चित दिशा ठरवणे गरजेचे आहे. आपणास प्रशासनाबाबत विशेष आकर्षण असेल तर मुलकी सेवा परीक्षेच्या तयारीची सुरुवात पहिल्या वर्षापासूनच करा आणि त्याबाबत दृढ निर्धार करा आणि या दृढ निर्धारात गांभिर्य असणे गरजेचे आहे. केवळ औपचारिकता म्हणून दृढ निर्धार करू नये.

### मुलाखत

मौखिक परीक्षा ही एक व्यक्तिमत्त्व चाचणी आहे. आपले व्यक्तिमत्त्व सकारात्मक असले पाहिजे. शिवाय आपल्या विचारात स्पष्टता, मुद्देसूदपणा, पुरेसी कारणमीमांसा आणि तर्कसंगतता असली पाहिजे. आपल्या वर्तनात संयम, नम्रता आणि योग्य संतुलन असले पाहिजे.

### परीक्षेची तयारी

संघ लोकसेवा आयोगाची नागरी सेवा लेखी परीक्षा दोन टप्प्यांत घेतली जाते. १. पूर्व परीक्षा २. मुख्य परीक्षा.

परीक्षेची तयारी करताना या दोन्ही परीक्षांची वेगवेगळी तयारी करण्याची गरज नाही, सुरुवातीपासूनच मुख्य परीक्षेची तयारी केली जावी आणि शेवटचे ३ किंवा ४ महिने पूर्वपरीक्षेच्या दृष्टीने तयारी करावी. पूर्व आणि मुख्य परीक्षा यामध्ये फक्त ३ महिन्यांचा कालावधी असतो. या ३ महिन्यांच्या कालावधीमध्ये मुख्य परीक्षेची तयारी होऊ शकत नाही. ही बाब विचारात घेता सुरुवातीपासून केवळ पूर्वपरीक्षेची तयारी न करता त्यासोबत मुख्य परीक्षेची तयारीसुद्धा केली जावी. या स्पर्धा परीक्षेचा दर्जा संबंधित विषयाच्या पदवी परीक्षेशी समकक्ष असेल असे जरी आयोगातर्फे सांगण्यात येत असले तरीसुद्धा प्रत्यक्षात या परीक्षेचा दर्जा हा पदव्युत्तर शिक्षणाच्या दर्जापेक्षा थोडा अधिक असतो, हे गृहीत धरूनच मुख्य परीक्षेची तयारी करणे गरजेचे आहे.

या स्पर्धा परीक्षेची तयारी खऱ्या अर्थाने पूर्ण झाल्याशिवाय स्पर्धा परीक्षेला बसू नये. केवळ परीक्षा कशी असते याचा अनुभव घेण्याकरिता परीक्षेला बसणे नुकसानीचे ठरते. येथे एक गोष्ट लक्षात ठेवण्याची गरज आहे आणि ती म्हणजे ही स्पर्धा परीक्षा ठरावीक संधीमध्येच उत्तीर्ण करावयाची असते. खुल्या संवर्गातील उमेदवाराकरिता एकूण ७ संधी उपलब्ध आहेत. त्यामुळे कोणतीही संधी विनाकारण व्यर्थ खर्ची पडणार नाही, याची दक्षता घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सुरुवातीच्या काळात उमेदवारांमध्ये बराच उत्साह असतो; परंतु पुढे पुढे हा उत्साह कमी होत जातो. पहिल्या दोनतीन संधीमध्ये यश मिळाले नाही तर बरेचसे उमेदवार नाउमेद होतात आणि त्यांच्यामध्ये नैराश्य निर्माण होते. अशाप्रकारे नैराश्य निर्माण झाल्यानंतर तो उमेदवार पुढच्या संधी उपलब्ध असूनसुद्धा परीक्षेची तयारी करू शकत नाही. पर्यायाने तो स्पर्धा परीक्षेची लढाई हरतो. त्यामुळे पूर्ण तयारी झाल्यानंतरच परीक्षेला बसावे आणि आपण पहिल्याच संधीमध्ये कसे यशस्वी होऊ, यादृष्टीने आपल्या अभ्यायाची रूपरेषा ठरवावी.

– कृष्णा भोगे, माजी सनदी अधिकारी



### सखोल अभ्यास

या परीक्षेत विषयाच्या प्रश्नपत्रिका तयार करणाऱ्या व्यक्ती या देशपातळीवरील मान्यताप्राप्त तज्ज्ञ असतात. त्यामुळे स्पर्धा परीक्षेतील प्रश्नांचा दर्जा हा फार उच्च श्रेणीचा असतो. या स्पर्धा परीक्षेत विचारले जाणारे प्रश्न विश्लेषणात्मक स्वरूपाचे आणि गोंधळात टाकणारे असतात. त्यामुळे अशा प्रश्नांची उत्तरे लिहिण्याकरिता विषयाचा सखोल अभ्यास असणे गरजेचे आहे.

# मार्गदर्शन आणि प्रशिक्षण




देशातील सर्वात महत्त्वाच्या आणि आव्हान मानल्या जाणाऱ्या नागरी सेवा परीक्षेमध्ये मराठी टक्का वर्षागणिक वाढू लागला आहे. या स्पर्धा परीक्षांची तयारी करून घेण्यासाठी अलीकडच्या काळात विविध पातळ्यांवर प्रयत्न होत आहेत. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेच्या तयारीसाठी प्रशिक्षण देणाऱ्या अनेक संस्था राज्यात कार्यरत आहेत. शासनासह स्थानिक स्वराज्य संस्था, विद्यापीठे यांच्या अखत्यारीत या प्रशिक्षण संस्था व केंद्रे सुरू आहेत.

नागरी सेवेमध्ये देशात मराठी टक्का वाढावा यासाठी १९७६ मध्ये मुंबईत राज्य व्यवसाय शिक्षण संस्थेची स्थापना करण्यात आली. त्याच धर्तीवर १९८५ मध्ये नागपूर, औरंगाबाद आणि कोल्हापूर ठिकाणी भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात आले. त्यानंतर २०१३ मध्ये नाशिक व अमरावती येथे नव्याने ३ प्री-आयएएस ट्रेनिंग सेंटर्स सुरू करण्यात आले आहे. त्याशिवाय जानेवारी २०१३ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे या संस्थेकडून उच्च शिक्षण विभागाच्या अखत्यारीतील प्रत्येक भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षणासाठी प्रायोजित करण्यात आलेल्या अनुसूचित जातीच्या १० विद्यार्थ्यांना मुंबई, नागपूर, औरंगाबाद, कोल्हापूर, अमरावती, नाशिक येथे प्रवेश देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

**राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई**

- प्रवेश अट - प्रवेशासाठी विद्यार्थी कोणत्याही शाखेतील पदवीधर हवा आणि तो महाराष्ट्राचा रहिवासी हवा.
- वयोमर्यादा - खुला वर्ग - २१ ते 30 वर्ष, अनुसुचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या विद्यार्थ्यांसाठी वयोमर्यादा २१ ते ३५ वर्ष, इतर मागासवर्ग, एसबीसी, एनटी-बी, एनटी-सी, एनटी-डी, व्हीजेसाठी वयोमर्यादा २१ ते ३३ वर्ष
- प्रवेश प्रक्रिया- दरवर्षीच्या ऑक्टोबर महिन्यात संस्थेमध्ये प्रवेश अर्ज उपलब्ध.
- प्रवेश परीक्षा - डिसेंबरमध्ये प्रवेश परीक्षा घेऊन गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जातो.
- जानेवारी ते नोव्हेंबर या ११ महिन्यांच्या काळात प्रशिक्षण दिले जाते
- एकूण जागा - १००
- संपर्कासाठी पत्ता- हजारीमल सोमाणी मार्ग, सीएसटी स्थानकाजवळ, मुंबई - ४००००१ दूरध्वनी क्रमांक - ०२२-२२०७०९४२ / २२०६१०७१,
- संकेतस्थळ - www.siac.ac.in

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद**

- पात्रता - कोणत्याही शाखेत पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त गुण
- राखीव जागा - अनुसूचित जातींसाठी २० जागा राखीव आहेत (१४ पुरुष, ६ महिला), इतर मागासवर्गासाठी १४ (९ पुरुष, ३ महिला) तर अल्पसंख्याकांसाठी ८ जागा राखीव (५ पुरुष, ३ महिला)
- प्रवेशासाठी वयोमर्यादा - २१ ते ३५ वर्ष
- उत्पन्न मर्यादा - एक लाखापेक्षा कमी
- प्रवेश - या संस्थेतील प्रवेशासाठी सप्टेंबर महिन्यात विविध वृत्तपत्रांमध्ये जाहिरात प्रसिद्ध होते. त्यानंतर प्रवेश परीक्षा होऊन निवड समितीमार्फत उमेदवाराची मुलाखत घेऊन प्रवेश दिला जातो.
- संपर्क दूरध्वनी - ०२४० - २४००४३१३७
- ईमेल- barnuaur@born4vsnl.net.in
- संकेतस्थळ-www.barnuniversity.ac.in

**प्री-आयएएस ट्रेनिंग सेंटर, कोल्हापूर**

- पात्रता- कोणत्याही शाखेतील पदवीधर

- ऑक्टोबर महिन्यात प्रवेशासाठी जाहिरात.
- प्रवेश परीक्षा - यूपीएससीच्या जनरल स्टडीजवर आधारित १०० गुणांची परीक्षा.
- उपलब्ध जागा - ६०
- प्रशिक्षण- जानेवारी ते प्रिलिम परीक्षेपर्यंत.
- निर्वाहभत्ता -एक हजार रुपये प्रतिमाह.
- पत्ता - राजाराम कॉलेज कॅम्पस, जिमखाना बिल्डिंग, कोल्हापूर - ४१६००४ संपर्क क्रमांक- ०२३१-२५२८३५१, kip_iastree@sancharnet.in
- संकेतस्थळ - http://www.preias-kop.in

**प्री-आयएएस ट्रेनिंग सेंटर, नागपूर**

- प्रवेश अट- कोणत्याही शाखेतील पदवीधर.
- वयोमर्यादा - २१ वर्ष
- जाहिरात - नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात प्रकाशित केली जाते.
- प्रवेश - डिसेंबरमध्ये प्रवेश दिला जातो.
- प्रवेश परीक्षा - सामान्य ज्ञानावर आधारीत १०० गुणांची परीक्षा.
- उपलब्ध जागा - ६०
- प्रशिक्षण कालावधी - जानेवारी ते मे
- निर्वाह भत्ता - एक हजार रुपये प्रतिमाह.
- पत्ता-ओल्ड मॉरिस कॉलेज बिल्डिंग, सिताबर्डी, नागपूर - ४४०००१ संपर्क क्रमांक - ०७१२-२५६५६२६


**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे स्पर्धा परीक्षा केंद्र**

- प्रवेश परीक्षा - १०० गुणांची लेखी परीक्षा, मुलाखतीसाठी ३० गुण आणि २० गुण आधीच्या शैक्षणिक कामगिरीसाठी
- उपलब्ध जागा - ६०
- प्रशिक्षण कालावधी - ऑगस्ट ते जून
- पत्ता-स्पर्धा परीक्षा केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे - ४११००७ संपर्क क्रमांक - ०२०-२५६९०३४२, २५६०११७७,

## गुणवत्ताधारित विशेष शिष्यवृत्ती योजना

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या अखिल भारतीय सेवांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या राज्यातील उमेदवारांचे प्रमाण वाढवण्यासाठी गुणवत्ताधारित विशेष शिष्यवृत्ती योजना सुरू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

या योजनेनुसार राज्यातील होतकरू आणि गुणवंत उमेदवारांना यूपीएससी परीक्षांची पूर्व तयारी करून घेणाऱ्या दिल्ली येथील नामांकित खासगी संस्थांमध्ये प्रशिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्तीच्या माध्यमातून अर्थसाहाय्य तसेच दिल्ली येथील त्याच्या वास्तव्याच्या कालावधीत, प्रतिमहिना दहा हजार रुपयांप्रमाणे निर्वाह भत्ता देण्यात येणार आहे.



महाराष्ट्राचा रहिवासी आणि कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न कमाल दहा लाख रुपयांपर्यंत असणाऱ्या उमेदवारास या योजनेचा लाभ घेता येईल. तसेच तो मागील तीन वर्षांमध्ये किमान एक वेळा केंद्रीय लोकसेवा आयोगाची मुख्य परीक्षा उत्तीर्ण होऊन मुलाखत फेरीपर्यंत पोहोचणारा, तथापि, अंतिमत: यशस्वी न झालेला असणे आवश्यक आहे. उमेदवाराने अर्जासह पदवी परीक्षा प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, त्या वर्षीच्या केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची गुणपत्रिका सादर केल्यास भाग-१ (पूर्व परीक्षा ते मुलाखत), भाग-२ (मुख्य परीक्षा) व भाग-३ (मुलाखत) अशा तिन्ही भागांचा तो प्रत्येकी एकदाच लाभ घेऊ शकतो. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेस बसणाऱ्या उमेदवारांना त्या वर्षीच्या मुलाखतीपर्यंतच्या कालावधीसाठी दिल्ली येथील निवडक प्रशिक्षण वर्गांमध्ये मुलाखतीपर्यंतच्या उपलब्ध असणाऱ्या अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यासाठी भाग-१ ही शिष्यवृत्ती देण्यात येईल.

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची अंतिम यादी प्रसिद्ध झाल्यानंतर पुढील वर्षीच्या परीक्षेसाठी या शिष्यवृत्तीचा अर्ज मुंबई येथील राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध होईल. निकष पूर्ण करणाऱ्या उमेदवाराचा शासनाने निवड केलेल्या दिल्ली येथील तीनपैकी एका प्रशिक्षण संस्थेत प्रवेश शुल्काचा भरणा शासनामार्फत केला जाईल.

**प्रेरणा**

२००६ मध्ये यशदा येथे डॉ. आंबेडकर स्पर्धा परीक्षा केंद्राची स्थापना करण्यात आली. केंद्राचे संपूर्ण काम यशदामार्फत स्वतंत्रपणे केले जाते. या केंद्रामध्ये एकूण ७० प्रशिक्षणार्थींना प्रवेश देण्यात येतो. त्यासाठीची जाहिरात यशदाच्या संकेतस्थळावर (www.yashada.org) ऑगस्ट महिन्यात देण्यात येते. प्रवेश परीक्षा नोव्हेंबर महिन्याच्या तिसऱ्या रविवारी आयोजित केली जाते. महाराष्ट्राचा रहिवासी असलेल्या आणि कोणत्याही क्षेत्रातील पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारास ही परीक्षा देता येते. साधारणत: ६००० मुले या परीक्षेला बसतात. संघ लोकसेवा आयोग पूर्व परीक्षेच्या धर्तीवर बहुपर्यायी स्वरूपाची प्रश्नपत्रिका काढली जाते. डिसेंबर महिन्यात अंतिम यादी जाहीर होऊन जानेवारीपासून नवीन वर्ग सुरू होतात. जानेवारी ते डिसेंबर असा संपूर्ण वर्षभरासाठीचा हा प्रशिक्षण कार्यक्रम आहे. दोन टप्प्यांमध्ये हे प्रशिक्षण आयोजित केले जाते. संघ लोकसेवा आयोगाच्या पूर्व परीक्षेचा निकाल जाहीर होण्यापर्यंतचा पहिला टप्पा व तद्नंतर मुख्य परीक्षेपर्यंतचा दुसरा टप्पा असतो. पूर्व परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांनाच, दुसऱ्या टप्प्यासाठी प्रशिक्षण दिले जाते. मौखिक चाचणीसाठी केंद्रामार्फत काही अभिरूप मुलाखतींचे आयोजन केले जाते.

**- दीपा सडेकर-देशपांडे**

(संचालक, डॉ. आंबेडकर स्पर्धा परीक्षा केंद्र, यशदा)

- संकेतस्थळ– www.unipune.ernet.in

**डॉ. चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था, ठाणे**

- जाहिरात – जुलैमध्ये जाहिरात प्रकाशित केली जाते.
- प्रवेशासाठी अट – खुल्या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी कोणत्याही शाखेतून ५५ टक्क्यांपेक्षा जादा गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांना इथे प्रवेश घेता येतो. तर राखीव जागांसाठी ५० टक्के गुणांची अट आहे. प्रवेश
- अर्ज – १ ते २५ ऑगस्ट या कालावधीत प्रवेश अर्ज उपलब्ध असतात.
- प्रवेश परीक्षा – सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात सामान्य ज्ञानावर आधारित लेखी परीक्षा आणि मुलाखत घेतली जाते.
- उपलब्ध जागा – ५०
- प्रशिक्षण कालावधी – ऑक्टोबरमध्ये प्रशिक्षण सुरू होऊन मार्चमध्ये प्रशिक्षण संपते.
- पत्ता – प्रशासकीय प्रशिक्षण संस्था, ठाणे महापालिका जुनी इमारत, पहिला मजला, स्टेशन रोड, ठाणे – ४००६०१ संपर्क क्रमांक – ०२२-२५३८६१४५

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सामाजिक समतेचा विचार जनमानसापर्यंत पोहोचविण्यासाठी आणि या संदर्भात अधिक संशोधन व प्रशिक्षण व्हावे या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने १९७८ मध्ये घेतलेल्या निर्णयानुसर डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेची स्थापना मुंबईत करण्यात आली. 'बार्टी'द्वारे कौशल्य विकास, संशोधन, मूल्यमापन, प्रशिक्षण, युवा नेतृत्व, समतादूत प्रकल्पसारख्या अन्य योजना प्रभावीपणे राबवण्यात येत आहेत.

**अनुसूचित जाती आणि जमातीच्या विद्यार्थ्यांना नागरी सेवा परीक्षा प्रशिक्षण**

केंद्रीय लोकसेवा आयोगाकडून घेण्यात येणाऱ्या नागरी सेवा परीक्षेसाठी 'बार्टी' च्या वतीने राज्यातील अनुसूचित जाती-जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी निःशुल्क व अनिवासी कोचिंग क्लासेसची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

'बार्टी'च्या पुणे येथील स्वतंत्र प्रशिक्षण केंद्रासह सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली, संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावती, सोलापूर विद्यापीठ सोलापूर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील प्रशिक्षण केंद्रावर स्वतंत्र सामाईक प्रवेश परीक्षेद्वारे प्रवेश दिला जातो.



- प्रवेश क्षमता– प्रत्येक विद्यापीठात २५ जागा. महिलांसाठी 30 टक्के तर दिव्यांग व्यक्तींसाठी 3 टक्के जागा आरक्षित
- पात्रता– उमेदवार हा कोणत्याही शाखेचा पदवीधर आणि अनुसूचित जमाती प्रवर्गातील असावा. नागरी सेवा परीक्षेसाठी त्या वर्षात बसण्यास पात्र असावा. वयाची २१ वर्षे पूर्ण असावीत. उमेदवाराच्या कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न ६ लक्ष रुपयांच्या आत असावे.
- सुविधा– निवड झालेल्या प्रत्येक उमेदवारांस दरमहा ४ हजार रुपये विद्यावेतन आणि ६ हजार रुपये किंमतीचा पुस्तक संच दिला जाईल.
- अनुसूचित जातीच्या उमेदवारांना पुणे, नागपूर व औरंगाबाद येथे युपीएससी (नागरी सेवा) स्पर्धा परीक्षेचे निवासी प्रशिक्षण 'बार्टी'द्वारे दिले जाते. त्यशिवाय दिल्ली येथील नामांकित प्रशिक्षण संस्थांमध्ये नागरी सेवा परीक्षा प्रशिक्षणासाठी उमेदवारांना 'बार्टी'द्वारे प्रायोजित केले जाते.

**बँक, रेल्वे, एलआयसीमध्ये लिपिकवर्गीय पदांच्या स्पर्धा परीक्षेसाठी प्रशिक्षण**

'बार्टी' च्या वतीने अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी बँक, रेल्वे, एलआयसी आदी विभागांमध्ये लिपिकवर्गीय वा तत्सम पदांच्या स्पर्धा परीक्षेच्या पूर्वतयारीकरिता निःशुल्क अनिवासी प्रशिक्षण देण्यात येते. राज्यातील २१ विविध प्रशिक्षण संस्थांमध्ये हे प्रशिक्षण दिले जाते.

- प्रवेश क्षमता– प्रत्येक प्रशिक्षण केंद्रामध्ये एकूण ५० जागा
- पात्रता– उमेदवार अनुसूचित जाती प्रवर्गातील असावा आणि त्याचे वय १८ ते ३५ वर्ष दरम्यान असावे. किमान १२ वी उत्तीर्ण असावा आणि उमेदवाराने दहावीची परीक्षा ग्रामीण भागातून उत्तीर्ण केली असावी किंवा तो 'क' वर्ग नगरपालिका क्षेत्रातून किंवा शहरी झोपडपट्टी भागातील असावा.

**अधिक माहितीसाठी संपर्क–**

महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, क्वीन्स गार्डन, पुणे-२८ संकेतस्थळ:

http://barti.maharashtra.gov.in

**– वर्षा फडके**
(विभागीय संपर्क अधिकारी)

प्रेरणा

# संरक्षण दलासाठी प्रशिक्षण



नॅशनल डिफेन्स् ॲकॅडमीमध्ये प्रवेशासाठीची सुवर्णसंधी औरंगाबाद येथील सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्थेने महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली आहे. महाराष्ट्रातील युवक जास्तीत जास्त संख्येने एनडीएच्या परीक्षेत यशस्वी व्हावे यासाठी या संस्थेची स्थापना करण्यात आली आहे. राज्य शासनमान्य ही एकमेव संस्था आहे.

पात्रता : यावर्षीच्या प्रवेशासाठी मुलांची वयोमर्यादा जन्मतारीख ०२ सप्टेंबर २००० ते ३१ डिसेंबर २००२ च्या दरम्यानची असावी. तसेच तो मार्च / एप्रिल २०१७ मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालांत (एस.एस.सी) परीक्षेला बसणारा असावा.

शारीरिक पात्रता : उंची १५७ से.मी.पेक्षा कमी नसावी, वजन ४३ कि.ग्रॅ.पेक्षा कमी नसावे. छाती न फुगवता ७४ तर फुगवून ७९ सेमी.असावी. डोळ्यांची दृष्टी चष्मा लावून जास्तीत जास्त ६/९, तसेच रंगांधळेपणा नसावा. लाल व हिरवा रंग ओळखता यावा.

## निवड प्रक्रिया

सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्थेमध्ये विद्यार्थ्यांची निवड ही लेखी परीक्षा आणि मुलाखतीद्वारे केली जाते. लेखी परीक्षा अनुक्रमे पुणे, कोल्हापूर, नागपूर आणि औरंगाबाद येथे घेण्यात येतात. लेखी परीक्षा इंग्रजीमधून घेतली जात असून, त्यामध्ये दोन पेपरांचा समावेश असतो. पहिला पेपर हा गणित तर दुसरा पेपर जनरल ॲबिलिटी टेस्ट (जीएटी) या विषयावर आधारित ७५-७५ गुण असे एकूण १५० गुणांची परीक्षा घेतली जाते. लेखी परीक्षा ही १० वीच्या राज्य मंडळ व सीबीएसईच्या अभ्यासक्रमावर आधारीत असते. या परीक्षेत गुणवत्ता यादीत आलेल्या उमेदवारांच्या मुलाखती (तोंडी) घेतल्या जातात व त्यानंतर निवड केली जाते.

सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्थेमध्ये प्रवेश अर्ज ऑनलाइन आणि ऑफलाइन अशा दोन्ही पद्धतीने अवलंब करता येतो. ऑनलाइन अर्ज करण्यासाठी www.spiaurangabad.com हे संकेतस्थळ आहे. परीक्षा शुल्कही ऑनलाइनच भरता येते. ऑफलाइन अर्ज व बँक चलान संस्थेच्या संकेतस्थळावरून डाऊनलोड करता येते. प्रवेश अर्ज संपूर्ण भरून रु.४५० परीक्षा शुल्क व रु.३५ बँक शुल्क बँक ऑफ महाराष्ट्राच्या कोणत्याही शाखेत चलनाद्वारे भरावेत. चलन तीन प्रतीत भरावे. चलनाची मूळ प्रत व भरलेला अर्ज हा कुरिअर किंवा स्पीड पोस्टने पाठवावा किंवा रु.४५० चा राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष डायरेक्टर, एसपीआय औरंगाबाद (पेएबल ॲट औरंगाबाद) या नावाने काढून अर्जासोबत पाठवावा.

अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्र.९२७२२११३७०/०२४०-२३८१३७०. ईमेल - sanchalakspi@gmail.com, संकेतस्थळ-www.spiaurangabad.com.

उमेदवारांची निवड गुणवत्ता प्राधान्यक्रमाने होते. त्यासाठी निवड मंडळाची स्थापना केली असून या निवड मंडळामध्ये लेफ्टनंट जनरल, एअर मार्शल अशा समकक्ष पदाशी असणाऱ्या व्यक्तींचा समावेश आहे. लेफ्टनंट जनरल व्ही. जी.पाटणकर हे अध्यक्ष आहेत. या संस्थेमध्ये संरक्षण दलातील उच्चपदस्थ, व्यक्तींच्या मार्गदर्शनामध्ये विद्यार्थ्यांची निवड, प्रशिक्षण पूर्ण केले जाते.

## भारतीय थल सेना

शालेय काळापासून अनेक विद्यार्थ्यांचे आवडीच्या करिअर क्षेत्रांमध्ये सर्वोच्चस्थानी भारतीय थल सेना आहे. शिक्षण सुरू असताना बरेच विद्यार्थी शारीरिक, बौद्धिक पात्रतेची तयारी करून थलसेनेमध्ये प्रवेश मिळवत असतात. थलसेनेमध्ये अधिकारी पदाच्या भरतीसाठी विशेष कोर्स उपलब्ध आहेत. या वर्षीचा एन.सी.सी.विशेष भरती योजनेचा ४२ वा अभ्यासक्रम ऑक्टोबर २०१७ अल्पसेवा, पुरुष आणि महिला तसेच युद्धामध्ये शहीद झालेल्या मुलामुलींसाठी अभ्यासक्रम राबवला जात आहे.

४९ वा अल्पकालिक सेवा (पुरुषांसाठी) फक्त आणि २० वा अल्पकालिक सेवा (महिलांसाठी) अभ्यासक्रम ऑक्टोबरमध्ये सुरू होत आहे.

जज ॲडव्होकेट जनरल (जे.ए.जी.) भरती योजनेमधील १९ वा अभ्यासक्रम २०१७ : अल्पकालिक सेवामधील मुलामुलींचा समावेश केला जातो.

अर्ज करण्याकरिता ऑनलाइन प्रक्रिया पुढीलप्रमाणे असेल : एन.सी.सी.विशेष पुरुष आणि महिलांसाठी १७ जानेवारी ते १५ फेब्रुवारी २०१७, अल्पकालिक सेवा पुरुष आणि महिलांसाठी २३ जानेवारी ते २२ फेब्रुवारी २०१७, जे.ए.जी. पुरुष आणि महिलांसाठी २३ जानेवारी ते २२ फेब्रुवारी २०१७ आहे. अधिक माहिती www.joinindianarmy.nic.in या संकेतस्थळाला भेट द्यावी.

**- मंगेश कोळी**

(आंतरवासिता, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)

# नागरी सेवा : टप्पा मुलाखतीचा




**केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षेतील शेवटचा टप्पा म्हणजे मुलाखत होय. लोकसेवा आयोगाने जाणीवपूर्वक या टप्प्यास व्यक्तिमत्त्व चाचणी असे संबोधले आहे. स्वाभाविकच नागरी सेवापद प्राप्त करू इच्छिणाऱ्या उमेदवाराकडे प्रशासन चालवण्यासाठी आवश्यक, पूरक व पोषक क्षमता आहेत अथवा नाहीत याची चाचपणी याद्वारे केली जाते. २७५ गुणांसाठी असलेला हा टप्पा अनेक अर्थाने महत्त्वाचा ठरतो. कित्येकदा अंतिम यादीतील स्थान मुलाखतीत मिळालेल्या गुणांवरच निर्धारित होते.**

व्यक्तिमत्त्व चाचणीद्वारा नागरी सेवापदासाठी आवश्यक क्षमतांची चाचपणी केली जाते. यात उमेदवाराच्या शैक्षणिक आणि शिक्षणबाह्य अशा दोन्ही आयामांना महत्त्व दिले जाते. व्यक्तिमत्त्वाची सर्व अंगे मुलाखतीमध्ये विचारात घेतली जातात. तज्ज्ञ व निष्पक्ष मुलाखत मंडळाद्वारा उमेदवारांची व्यक्तिगत सुयोग्यता जोखणे हा मुलाखतीमागील मुख्य उद्देश असतो. व्यापक अर्थाने उमेदवाराचा सामाजिक कल, वर्तमान घडामोडीविषयक भान व समज, त्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन, दृष्टीतील सकारात्मकता व आशावाद, आत्मविश्वास, हजरजबाबीपणा, आवडीच्या गोष्टीमधील सखोलता, नेतृत्वगुण, बौद्धिक व नैतिक बांधिलकी इ. गुणवैशिष्ट्यांची चाचपणी केली जाते. प्रत्येक उमेदवाराने व्यक्तिमत्त्व चाचणीचा अर्थ लक्षात घेऊन त्याची प्रभावी तयारी करणे क्रमप्राप्त ठरते.



मुलाखत ही तुमच्या ज्ञानाची कसोटी पाहणारी परीक्षा नसते. पूर्व व मुख्य परीक्षेद्वारा विद्यार्थ्यांचे ज्ञान तपासलेले असते. मुलाखत मंडळाद्वारे विचारले जाणारे काहीच (फारच कमी) प्रश्न तथ्याधारित (फॅक्च्युअल) व माहितीप्रधान असतात. मंडळास रस असतो तो मुख्यतः उमेदवाराचा एखाद्या बाबींकडे बघण्याचा दृष्टिकोन कसा आहे हे जाणून घेण्यात.

### नेमके आणि संतुलित स्वरूप

मुलाखतीतील बहुतांश प्रश्न उमेदवाराचा दृष्टिकोन, भूमिका, उपायात्मक विचार करण्याची क्षमता तपासणारेच असतात. त्यामुळे मुलाखतीत विचारलेल्या किती प्रश्नांची बरोबर उत्तरे दिली यापेक्षा दिलेल्या प्रश्नांची उत्तरे योग्य माहिती व आकलनावर आधारित, नेमकी आणि संतुलित स्वरूपाची असणे महत्त्वाचे ठरते. एखाद्या गोष्टीबद्दल माहिती नसल्यास वा एखाद्या प्रश्नाचे उत्तर देता येत नसल्यास, तसे सांगण्याची उमेदवाराची प्रामाणिक वृत्ती मुलाखत मंडळाला अभिप्रेत असते.

व्यक्तिमत्त्व चाचणीत उमेदवाराच्या विविध क्षमतांचे मूल्यमापन केले जाते. त्यातील मध्यवर्ती क्षमता म्हणजे महत्त्वाच्या बाबीविषयी स्वतःचे मत मांडण्याची क्षमता. आपल्या भोवताली घडणाऱ्या महत्त्वपूर्ण कळीच्या मुद्द्यांविषयी उमेदवाराचे स्वतःचे मत असणे अत्यावश्यक ठरते. दुसरी बाब म्हणजे त्याची उलट तपासणी करणारे प्रश्न मुलाखत मंडळाने विचारल्यास आपल्या मताच्या समर्थनार्थ स्पष्टीकरण देण्याची क्षमतादेखील उमेदवारामध्ये असणे महत्त्वपूर्ण ठरते. अर्थात प्रस्तुत मत टोकाचे अथवा अतिरेकी स्वरूपाचे असणार नाही याची खात्री बाळगावी. त्यामुळे एखाद्या विषयासंबंधी सविस्तर विचार करूनच आपले मत विकसित करणे अत्यावश्यक ठरते.

### निर्णय घेण्याची क्षमता

उमेदवाराकडून अपेक्षित दुसरी महत्त्वाची क्षमता म्हणजे निर्णय घेण्याची क्षमता होय. प्रशासकीय सेवकास विविध स्वरूपाचे निर्णय घ्यावे लागतात हे सर्वश्रुत आहे. त्यामुळे मुलाखतीतील काही प्रश्न उमेदवाराकडे प्राप्त परिस्थितीत निर्णय घेण्याची क्षमता आहे किंवा नाही याची चाचपणी करणारे असतात. मुलाखत मंडळ कित्येकदा जाणीवपूर्वक परिस्थितीजन्य प्रश्न विचारून निर्णयक्षमतेची पडताळणी करत असतात.

### स्वाभाविक आणि आत्मविश्वासपूर्वक

अपरिचित अशा मुलाखत मंडळासमोर उमेदवार किती स्वाभाविकपणे आणि आत्मविश्वासपूर्वक स्वतःचे व्यक्तिमत्त्व सादर करतो यावर, व्यक्तिमत्त्व चाचणीतील गुण अवलंबून असतात. मुलाखत मंडळाबरोबर होणारा संवाद हा स्वाभाविक, नैसर्गिक अशा स्वरूपाचा असला पाहिजे. प्रश्नांची उत्तरे तयार करून, पाठांतर केलेली आहेत अशा रीतीने मांडली जाऊ नयेत. त्यासाठी मंडळाने

प्रश्न विचारल्यानंतर काही सेकंदाचा विराम घेतच विचारपूर्वक उत्तर द्यावे. अन्यथा मुलाखत यांत्रिक होण्याचीच शक्यता असते. आत्मविश्वास हा मुलाखतीतील आधारभूत घटक आहे असे म्हटल्यास अतिशयोक्त ठरणार नाही.

उमेदवाराच्या तयारीचे स्वरूप; आकलन व विचारातील स्पष्टता, त्याविषयक उमेदवारास वाटणारी खात्री; परिणामी मुलाखत मंडळासमोर आपले मत मांडण्याचा आलेला निर्भीडपणा आणि संवादातील प्रभावीपणा (औपचारिक संतुलित भाषा, आवाजाची योग्य पातळी, मंडळातील सर्वांना संबोधित करत सर्वांना संवादात सामावून घेणारी दृष्टी इ.) या घटकांआधारे उमेदवाराचा आत्मविश्वास निर्धारित व आविष्कृत होत असतो.

### मुलाखतीतील विविध अभ्यास घटक

केंद्र लोकसेवा आयोगाने यूपीएससी परीक्षेतील मुलाखतीसाठी विशिष्ट अभ्यासक्रम नमूद केलेला नसला तरी या टप्प्याची तयारी करण्यासाठी पुढील घटक लक्षात घेणे अत्यावश्यक ठरते. मुख्य परीक्षेचा अर्ज भरतांना उमेदवाराला आपली संपूर्ण व्यक्तिगत माहिती नमूद करावी लागते. हा 'बायोडाटा' च पायाभूत मानून त्यातील प्रत्येक घटकाची तयारी करावी.

उमेदवाराच्या व्यक्तिगत माहितीतील पहिला घटक म्हणजे नाव होय. यात उमेदवाराचे स्वत:चे नाव, आईवडिलांचे नाव आणि आडनावासंबंधी माहिती संकलित करावी. यातील कोणत्याही नावाचा विशिष्ट अर्थ असल्यास तो लक्षात घ्यावा. तसेच आपल्या नावाची एखादी व्यक्ती इतर क्षेत्रात सुप्रसिद्ध असल्यास तिच्याविषयी माहिती संकलित करावी.

दुसरी बाब म्हणजे विद्यार्थ्यांचे मूळ ठिकाण, सध्याचे ठिकाण, तालुका, जिल्हा, विभाग आणि राज्य असे वर्गीकरण करावे. यातील प्रत्येक घटकाचा थोडक्यात इतिहास, भूगोल, समाजव्यवस्था, राजकरण, अर्थकारण, इतर काही महत्त्वाची वैशिष्ट्ये यासंबंधी तयारी करणे अत्यावश्यक ठरते. त्यातही आपला जिल्हा, विभाग आणि राज्य याविषयी लोकसंख्यात्मक माहिती, आर्थिक स्थितीविषयक आकडेवारी व वैशिष्ट्ये, विकासविषयक स्थिती आणि इतर काही खास वेगळेपण याअनुषंगाने एक प्रकारचे प्रोफाइलच तयार करावे. आपल्या भागातील महत्त्वाच्या समस्या व आव्हाने, त्याविषयक शासकीय, बिगरशासकीय उपाय याव्यतिरिक्त काही आवश्यक उपायांचा सविस्तर विचार केलेला असावा.

### शैक्षणिक पार्श्वभूमी

उमेदवाराची शैक्षणिक पार्श्वभूमी हा आणखी एक महत्त्वपूर्ण घटक आहे. यात शालेय शिक्षणापासून, माध्यमिक, उच्चमाध्यमिक, महाविद्यालयीन आणि पदवी-पदव्युत्तर शिक्षणापर्यंतची माहिती पदवी संपादन केली आहे. त्यातील पायाभूत संकल्पना, विचार आणि उपायोजनात्मक भाग, अलीकडील शोध व घडामोडी यावर लक्ष केंद्रित करावे. शिक्षण संस्थांची नावे आणि ठिकाणे यासंबंधीदेखील प्रश्न विचारले जाऊ शकतात हे लक्षात घेऊन त्यासंबंधीही माहिती प्राप्त करावी.



### अभ्यासबाह्य बाबीतील रस

उमेदवाराच्या व्यक्तिगत माहितीतील 'अभ्यासबाह्य बाबीतील रस' हा घटकही महत्त्वपूर्ण ठरतो. यात विद्यार्थ्यांचा छंद, क्रीडा प्रकारातील रस, विविध स्पर्धांत प्राप्त केलेली पारितोषिके, बक्षिसे, शालेय-महाविद्यालयीन जीवनात भूषवलेल्या जबाबदाऱ्या यापासून ते एखाद्या सामाजिक कार्यातील सहभाग अशा अभ्यासबाह्य घटकांचा समावेश होतो. वास्तविक पाहता अभ्यासबाह्य घटक हा त्या-त्या उमेदवाराच्या व्यक्तिमत्त्वाचे मूल्यांकन करण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडत असतो. त्यामुळे मुलाखत मंडळदेखील बहुतांश वेळा या घटकावरच भर देत असते. उमेदवाराने खरेच या बाबी केल्या आहेत का? कशा केल्या आहेत? उमेदवार त्यातून काय शिकला आहे? त्याबाबतीत तो किती प्रामाणिक, जिज्ञासू आहे? अशा महत्त्वपूर्ण बाबींची तपासणीच जणू केली जाते. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने या घटकाची प्रभावी तयारी करणे मध्यवर्ती ठरते.

### वैकल्पिक विषय - महत्त्वपूर्ण घटक

उमेदवाराने मुख्य परीक्षेसाठी निवडलेला वैकल्पिक विषय हा देखील एक महत्त्वपूर्ण घटक आहे. संबंधित विषय का निवडला? संबंधित विषयाचा नागरी सेवेत कसा उपयोग होईल? यासारख्या प्रश्नांपासून वैकल्पिक विषयातील मूलभूत संकल्पना, विचार, चालू घडामोडी, उपाययोजनात्मक भाग यावर विविध प्रश्न विचारले जातात.

### चालू घडामोडी

आपल्या भोवताली घडणाऱ्या चालू घडामोडींविषयी अनेक प्रश्न विचारले जातात. राज्य, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळी आणि सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, विज्ञान-तंत्रज्ञान, क्रीडा अशी विभागणी करून त्यासंबंधी महत्त्वाच्या घडामोडींची सविस्तर तयारी करावी. चर्चेतील मुद्द्यांविषयी जी प्रचलित मतमतांतरे आहेत त्याची माहिती उमेदवाराकडे असणे गरजेचे आहे. या महत्त्वाच्या, कळीच्या मुद्द्यांविषयी स्वत:चे मत असणे महत्त्वाचे ठरते.

अशा रीतीने उपरोक्त विविध घटकांची सविस्तर माहिती संकलित करून त्यावर आधारित अधिकाधिक 'मॉक इंटरव्यूव्ह' चा सराव केल्यास अधिक गुण मिळवता येतील.

- तुकाराम जाधव

# राज्यसेवा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत पोलीस उपनिरीक्षकापासून ते पोलीस उपअधीक्षकापर्यंत तर नायब तहसीलदारापासून ते उपजिल्हाधिकाऱ्यांपर्यंत पदांच्या परीक्षा घेतल्या जातात. याशिवाय विविध खात्यातील कनिष्ठ लिपिक, वरिष्ठ लिपिक आणि चतुर्थ श्रेणी कर्मचारी अशी पदे तसेच जिल्हा निवड समितीच्या माध्यमातून भरण्यात येतात.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दरवर्षी काही पदांची भरती केली जाते. यामध्ये पोलीस उपनिरीक्षक, विक्रीकर निरीक्षक, मंत्रालय सहायक आणि लिपिक भरती यांचा समावेश आहे. राज्यसेवा (राजपत्रित) अधिकारी यांचीसुद्धा भरती घेण्यात येते. यामध्ये उप जिल्हाधिकारी, पोलीस उप अधीक्षक, तहसीलदार, विक्रीकर अधिकारी वर्ग १, निबंधक वर्ग १ व २, वित्त लेखाधिकारी वर्ग १ आणि २, गटविकास अधिकारी, मुख्याधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, नायब तहसीलदार, सहायक उप प्रादेशिक परिवहन अधिकारी पदांचा समावेश असतो. यासाठी शैक्षणिक पात्रता कोणत्याही शाखेचा पदवीधर किंवा पदवीच्या अंतिम वर्षाला असणे आवश्यक आहे. निवड होईपर्यंत तो पदवी उत्तीर्ण झालेला असावा.

याशिवाय आयोगामार्फत महाराष्ट्र वनसेवा, वरिष्ठ आणि कनिष्ठ लिपिक, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर व प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी, कर साहाय्यक, पोलीस उपनिरीक्षक खात्यांतर्गत, पोलीस उपनिरीक्षक सरळसेवा, मोटार वाहन उपनिरीक्षक, विक्रीकर अधिकारी, साहाय्यक आदी परीक्षा घेण्यात येतात. जिल्हापातळीवर जिल्हा निवड समितीच्या माध्यमातून काही पदे दरवर्षी भरली जातात. ज्याप्रमाणे गृह विभाग – पोलीस, लिपिक. वनविभाग – वनपाल,वनरक्षक आणि चालक. सार्वजनिक बांधकाम विभाग – कनिष्ठ आणि वरिष्ठ लिपिक, अनुरेखक, कनिष्ठ अभियंता, कृषी विभाग – कृषीसेवक, कनिष्ठ व वरिष्ठ लिपिक, कृषी पर्यवेक्षक, भूमापन विभाग – भूमापक व कनिष्ठ लिपिक, पाटबंधारे विभाग – कनिष्ठ व वरिष्ठ लिपिक, अनुरेखक, कनिष्ठ अभियंता. आरोग्य विभाग – आरोग्यसेवक. शिक्षण विभाग – कनिष्ठ व वरिष्ठ लिपिक. महसूल विभाग – तलाठी व ग्राम सेवक यांचा समावेश असतो. या सर्व पदासाठी पदानुसार शैक्षणिक पात्रता निश्चित केली आहे. भूमापक व आरोग्यसेवक यांच्यासाठी दहावी आणि बारावी, कनिष्ठ लिपिकांसाठी बारावी (इंग्रजी मराठी टायपिंग) वरिष्ठ लिपिकासाठी पदवी, तांत्रिक पदांसाठी त्या शाखेतील पदविका असणे अनिवार्य आहे.



### राज्यसेवा (पूर्व) परीक्षा..

राज्यसेवा परीक्षेतील (राजपत्रित अधिकारी) हे महत्त्वाचे आणि प्रतिष्ठेचे पद समजले जाते. ही परीक्षा पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा आणि मुलाखत अशा तीन टप्प्यांमध्ये घेतली जाते. पूर्व परीक्षा ४०० गुणांची असते.

### पेपर १ सामान्य अध्ययन – गुण २००

वेळ २ तास. यामध्ये चालू घडामोडी, आधुनिक भारताचा इतिहास महाराष्ट्राच्या विशेष संदर्भासह, भारताचा स्वातंत्र्य लढा, भूगोल – महाराष्ट्र, भारत आणि जग, भारताचे संविधान, पंचायती राज, शहरी स्थानिक स्वराज्य संस्था, अर्थशास्त्र – सामाजिक विकास, दारिद्र्य आणि बेरोजगारी, पर्यावरण परिसंस्था, जैवविविधता आणि सामान्य विज्ञान या विषयावर प्रश्न विचारले जातात.

### पेपर २ – गुण २०० – वेळ २ तास

यामध्ये प्रामुख्याने तर्कशक्ती, निर्णय क्षमता, सामान्य बुद्धिमापन चाचणी, अंकगणित

## प्रेरणा



(दहावी स्तर), मराठी आणि इंग्रजीमधील सुसंवाद कौशल्य, व्याकरणावर प्रश्न विचारले जातात.

**मुख्य परीक्षा**

राज्यसेवा (राजपत्रित) मुख्य परीक्षेत विद्यार्थ्यांची खरी कसोटी लागते. ही परीक्षा ८०० गुणांची असून यामध्ये चार पेपर असतात. प्रत्येक पेपरला १५० गुण, यामध्ये इतिहास, भूगोल, महाराष्ट्राच्या संदर्भासह आधुनिक भारताचा इतिहास, भारतीय संविधानाचा प्राथमिक अभ्यास, भारतीय राजकारण महाराष्ट्राच्या विशेष संदर्भासह, मानवी संसाधन आणि मानवी हक्क, अर्थव्यवस्था व नियोजन तसेच विकास विषयक अर्थशास्त्र, कृषी आणि विज्ञान तंत्रज्ञान या विषयांवर प्रश्न विचारले जातात. मराठी आणि इंग्रजी भाषा यावर प्रत्येकी १०० गुणांचा पेपर असतो. यामध्ये निबंधलेखन, उतारा प्रश्न, व्याक्रण यावर प्रश्न विचारले जातात. अंतिम निवडीसाठी १०० गुणांची मुलाखत प्रकिया पार पाडावी लागते.

**पीएसआय,एसटीआय आणि सहाय्यक**

मुख्य परीक्षेच्या अभ्यासक्रमात किंचित बदल वगळता या परीक्षांचे स्वरूप एकसारखेच असते. मंत्रालयीन सहायक या पदाला मुलाखत नसून अंतिम परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे निवड केली जाते. पोलीस उपनिरीक्षक (शारीरिक चाचणीसह) आणि विक्रीकर निरीक्षक यांना मुलाखतीची प्रक्रिया पार पाडावी लागते. पोलीस उपनिरीक्षक/विक्रीकर निरीक्षक/साहाय्यक या पदासाठी पूर्व परीक्षा १०० गुणांची असते. तीनही पदांसाठी पूर्व परीक्षेचे स्वरूप सारखेच असते. प्रश्न वस्तुनिष्ठ स्वरूपाचे असतात. यामध्ये चालू घडामोडी, नागरिकशास्त्र, भारतीच घटनेचा प्राथमिक अभ्यास, राज्यव्यवस्थापन, ग्रामव्यवस्थापन, इतिहास भूगोल राज्याच्या संदर्भासह, पृथ्वी, हवामान, अक्षांश, रेखांश, जमिनीचे प्रकार, प्रमुख पिके, पर्जन्यमान, शहरे, नद्या, उद्योगधंदे, अर्थव्यवस्था भारतीय अर्थव्यवस्था, राष्ट्रीय उत्पन्न, शेती, उद्योग, परकीय व्यापार, बँकिंग, लोकसंख्या, दारिद्र्य बेरोजगारी, मुद्रा आणि राजकोषीय नीती, शासकीय अर्थव्यवस्था, अर्थसंकल्प, लेखापरीक्षण, सामान्य विज्ञान - भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, वनस्पतिशास्त्र, प्राणिशास्त्र, आरोग्यशास्त्र, बुद्धिमापन आणि अंकगणित या विषयावर प्रश्न विचारले जातात.

मुख्य परीक्षा - वरील तीनही पदांसाठी मुख्य परीक्षेला दोन पेपर असतात. यामध्ये पेपर क्रमांक १ भाषा असून यामध्ये इंग्रजी या विषयावर ४० गुणांचे तर मराठी विषयावर ६० गुणांसाठी असे एकून १०० प्रश्न विचारले जातात. यामध्ये व्याकरण, उतारा प्रश्न, वाक्यरचना, म्हणी, शब्दसंग्रह यावर प्रश्न आधारित असतात. पेपर २ - हा सामान्य अध्ययन १०० गुणांचा असतो. या पेपरमध्ये सर्वसाधारण चालू घडामोडी, राज्य ते जागतिकस्तरावरील, बुद्धिमापन चाचणी, भूगोल भारत आणि जग (महाराष्ट्राच्या विशेष संदर्भासह), इतिहास, माहिती अधिकार, सामाजिक सुधारणा चळवळी, भारताचे संविधान, म ानवी हक्क आणि जबाबदाऱ्या, महिला संरक्षण, घरगुती हिंसाचार कायदा, कृषी, तंटामुक्ती अभियान, संगणक व माहिती तंत्रज्ञान, ॲट्रासिटी, मुंबई पोलीस कायदा, पुरावा कायदा, सीआरपीसी आणि आयपीसी यावर प्रश्न विचारले जातात.

मुख्य परीक्षेमध्ये विक्रीकर निरीक्षक आणि मंत्रालयीन सहायक या पदांसाठी पोलीस संदर्भात अभ्यासक्रम तसेच संगणक व माहिती तंत्रज्ञान या विषयाऐवजी लेखाकर्म या विषयावर प्रश्न विचारले जातात. पोलीस उपनिरीक्षपदाची मुलाखत ५० गुणांची असून शारीरिक चाचणी १०० गुणांची असते. ही सर्व प्रक्रिया पार पाडल्यानंतर अंतिम निवड केली जाते.

**- ॲड. नरेंद्र बेलसरे**

(लेखक हे ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

संपर्क : ०९९२२७३२२३३

### कमी वेळात करसे मिळवाल यश..

कमी वेळात यश संपादन करण्यासाठी निवड झालेल्या आपल्या मित्रांचा सल्ला व मार्गदर्शन अवश्य घ्या. योग्य मार्गदर्शकांच्या सल्ल्याने योग्य साहित्याचा वापर करावा. सार्वजनिक वाचनालयाचा उपयोग करून प्रतिष्ठित वर्तमानपत्रांचे वाचन करावे. आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेले ग्रामीण भागातील विद्यार्थी स्पर्धा परीक्षांचे महागडे क्लास लावू शकत नाहीत. अशांनी खचून न जाता घरूनच वरील विषयाला अनुसरून तयारी करावी. अभ्यासात सातत्य ठेवावे.

# यशाची प्रेरणा

अत्यंत तीव्र आणि कठोर स्पर्धा असणाऱ्या युपीएससी आणि एमपीएससीच्या परीक्षांमध्ये यशस्वी होऊन आयएएस, आयपीएस, आयएफएस या सेवा मिळवणाऱ्या स्पर्धकांमध्ये मराठी मुलांचा टक्का गेली काही वर्षे वाढतो आहे. यशाची सर्वाधिक अनिश्चितता असणाऱ्या या परीक्षांना सामोरे जाऊन तिथल्या यशासह प्रशासनातही उत्तम कामगिरी बजावलेल्या अधिकाऱ्यांच्या - ही परीक्षा देण्यामागील प्रेरणा काय होत्या याचा घेतलेला हा वेध...



भारतीय प्रशासकीय सेवेत गेल्या काही वर्षात महाराष्ट्रातील युवक-युवतींनी मोठी आघाडी मिळवली आहे.

**विशाल सोळंकी**

विशाल सोळंकी यांचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण पुणे जिल्ह्यातील सासवडला वाघिरे विद्यालयात झाले. इयत्ता आठवीत असतानाच आयएएस व्हायचं त्यांच्या मनात आलं. काही शिक्षकांनी, नातेवाईकांनी प्रोत्साहन दिलं. ते म्हणतात, ''मी जेव्हा दहावी झालो तेव्हा महाराष्ट्र बोर्डातर्फे गुणवत्ता यादी काढली जायची. मी गुणवत्ता यादीमध्ये अकरावा आलो आणि मनात रुजलेल्या बीजाला कोंब फुटला. आयएएस व्हायचं यावर मनानं शिक्कामोर्तब केलं.



१९९७ मध्ये पुण्यात येऊन 'फर्ग्युसन कॉलेज'मध्ये शिकताना 'ज्ञान प्रबोधिनी'च्या विवेक कुलकर्णी सरांनी युपीएससीविषयी प्रथम ओळख करून दिली. १९९९ साली मी प्रथम 'चाणक्य मंडल' मध्ये फाऊंडेशन कोर्स आणि नंतर युपीएससीचा कोर्स केला. अभ्यासाव्यतिरिक्त इतर अनेक सामाजिक आणि शैक्षणिक कार्यामध्ये सहभाग घेतल्याने व्यक्तिमत्त्व विकासाबरोबरच सामाजिक आणि राष्ट्रीय प्रगतीत आपलाही वाटा असावा ही प्रामाणिक तळमळ मनात वाढत गेली.''

**डॉ. सुदाम खाडे**

सध्या मध्य प्रदेशमध्ये सेहोरचे जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत आहेत.

महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्याच्या खटाव तालुक्यातलं 'एनकूळ' हे त्यांचं गाव. गावात जायला सात किमीपर्यंत रस्ता नाही, दुष्काळ पाचवीला पूजलेला. घरी कुणीच शिकलं सवरलेलं नाही. नित्यनेमाने शेतात राबणं हाच दिनक्रम. अशा कौटुंबिक पार्श्वभूमीवर

**यशाची सूत्रे**



अभिजित शेवाळे
भा.प्र.से. रँक - १० २०१४

- घोकंपट्टी न करता प्रत्येक अभ्यासक्रमातील संकल्पना समजून घ्या.तासन्तास अभ्यास करण्यापेक्षा गुणवत्तापूर्ण अभ्यास कसा होईल यावर भर द्यावा.
- एखाद्या टॉपिकच्या तयारीसाठी मोजकी निवडक पुस्तके अभ्यासावी.
- विविध विषय अभ्यासताना स्वत:च्या नोट्स काढाव्यात.
- परीक्षेपूर्वी केलेल्या अभ्यासाची उजळणी करण्यासाठी काही दिवस राखून ठेवावे.
- मुलाखतीत स्वत:ला व्यक्त करा.
- नामांकित इंग्रजी दैनिकांचे नियमित वाचन करा.
- संपर्कात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीपासून चांगले गुण घ्या.
- विविध प्रलोभनांपासून स्वत:ला दूर ठेवा.
- स्वत:च्या गरिबीच्या आणि हलाखीच्या परिस्थितीचा बाऊ करू नका.



तुषार निखारे
भा.प्र.से. २०१५, केडर - सिक्कीम

- पूर्वपरीक्षेपर्यंत सामान्य अध्ययन पेपरचा अभ्यासक्रम पूर्ण करावा. पूर्वपरीक्षेनंतर लिखाणावर भर द्या. यामुळे लेखनशैली सुधारेल.
- एकाग्रता असेपर्यंतच अभ्यास करा.
- सर्वच पुस्तके वाचण्यापेक्षा त्यातील महत्त्वाचे टॉपिक वाचून स्वत:च्या नोट्स काढा.



गावातल्याच महर्षी शिंदे विद्यालयात दहावीपर्यंतचं आणि कराडच्या यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स येथे त्यांनी बारावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतरचा टप्पा होता तो मिरजेच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात घेतलेले शिक्षण.

एम.डी. मेडिसिन पूर्ण झालं आणि भारतीय प्रशासकीय सेवा अर्थातच यूपीएससी परीक्षेचा आव्हानात्मक रस्ता मी निवडला.

युपीएससीची परीक्षा द्यायची असं ठरवल्यापासूनच आपल्या आयुष्यातले 'यूपीएससी' पर्व सुरू होतं. बौद्धिक, शारीरिक आणि मानसिक पातळीवर कसोटी बघणारे अनेक प्रसंग या संपूर्ण टप्प्यात आपल्यापुढे उभे असतात. इच्छा असो वा नसो, आपल्यासोबत आपलं कुटुंबही या प्रक्रियेचा भाग बनून गेलेलं असतं. डॉक्टर झाल्यानंतर आर्थिक स्थिरता देणारं करिअर निवडणं सहज शक्य असूनही ते न निवडता मी कसल्या परीक्षेच्या मागे लागलोय असा प्रश्न मला माझ्या घरच्यांनी कधीही विचारला नाही. मी जे काही करतोय ते योग्यच असणार या विश्वासानं त्यांनी मला माझं निर्णय घेण्याचं स्वातंत्र्य दिलेलं होतं. आज विचार केल्यानंतर असं जाणवतं की आई-वडलांनी काहीही न बोलता दिलेला तो अबोल पाठिंबा ही माझी सगळ्यात मोठी ताकद होती.''

**सचिन जाधव**

मूळचे सातारा जिल्ह्यातील, पण सध्या ओदिशा राज्यात जिल्हाधिकारी पदावर असलेले सचिन जाधव म्हणतात, ''मी जेव्हा आयएएसच्या धक्क्याला लागलो. तोपर्यंत अभ्यासाचे, यशाचे, अपयशाचे, संघर्षाचे, आणि एकूणच आयुष्यातील विविधतेचे कडुगोड अनुभव या काळात भरपूर मिळाले.



परीक्षार्थी मित्रांना माझा अनुभवान्ती एक सल्ला आहे. मुलाखतीला उंदीर मांजराचा खेळ समजू नये; तसे समजलात तर तो खरंच तसा खेळ होतो. त्यांना जिल्हे सांभाळणारे अधिकारी निवडायचेत. ते तुमच्या नर्व्हज् तपासतात. ही परीक्षा कुणी म्हणतं माहितीची आहे तर कुणी म्हणतं शहाणपणाची. मला वाटतं ही सगळी परीक्षा नर्व्हज्‌ची आहे. मानसिक कणखरपणा मुख्य.

**हृषीकेश मोडक**

मणिपूर राज्यात प्रशासकीय अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. ते सांगतात, ''माझ्यासाठी स्पर्धा परीक्षेचे दिवस बरेच लवकर सुरू झाले आणि भरपूर दिवस टिकले. आयएएसच्या ग्लॅमरची मला १० वी पासून भुरळ पडली होती. करिअर निवडायचं तर आपण काहीतरी वेगळं, मोठं केलं पाहिजे, ती आपली एक अचिव्हमेंट असली पाहिजे असं वाटत होतं.



स्पर्धा परीक्षा ही अवघड परीक्षा आहे. कारण ॲकॅडमिक तयारी बरोबरच परीक्षार्थींच्या टेम्परामेंटचासुद्धा इथे कस लागतो.

अशा जबरदस्त स्पर्धेत यशस्वी होण्यासाठी विषयाच्या आकलनासाठीची बुद्धिमत्ता, आकलन पूर्ण करण्यासाठी आणि योग्य शब्दात, दिलेल्या वेळेत परीक्षेत उतरवण्यासाठी परीक्षाभिमुख तयारी, आणि हा सगळा अभ्यास २-३ वर्षे न कंटाळता, गुणवत्ता कमी न होऊ देता, अपयशानी खचून न जाता करण्यासाठी लागणारे टेम्परामेंट या गुणांचा कस लागतो.''

**अनिकेत मांडवगणे**



आपण भारतीय परराष्ट्र सेवेतच जायचे असं ठरवून ही परीक्षा देणारे अनिकेत मांडवगणे आपल्या अनुभवांबद्दल म्हणाले, ''जून २००६ बी.ई.च्या दुसऱ्या वर्षाला असताना प्रकर्षाने जाणवलं की आयुष्यभर मी मेकॅनिकल

**यशाची सूत्रे**



नरसिंग संभाजी पवार
आय. ए. एस. (२०१३)
उपसचिव, नगरविकास सचिवालय, आसाम

- पूर्व परीक्षेसाठी जास्तीत जास्त पुस्तके वाचावी, तर मुख्यसाठी मोजकी दर्जेदार पुस्तके अधिक वेळा वाचावी.
- स्वत:च्या नोट्स काढाव्या. महिन्याभरापूर्वी उजळणी करावी, उत्तरे लिहण्याचा सराव करावा
- संदर्भ, माहिती लक्षात ठेवण्यासाठी व्हिज्युअलाइज करावे.
- ज्येष्ठ मित्र किंवा शक्य असल्यास स्पर्धा परीक्षा केंद्राचे मार्गदर्शन घ्यावे.
- लेखनशैली मुद्देसूद, सहज व ओघवती असावी.

---



जी.श्रीकांत
जिल्हाधिकारी, अकोला.

- गरिबीचा बाऊ न करता जिद्दीने प्रयत्न करा.
- मोठी स्वप्न बघा, स्वप्नपूर्तीसाठी जीवाचे रान करा.
- आपल्यासमोर काही उदाहरण नसेल तर आपण स्वत:चेच उदाहरण इतरांसाठी निर्माण करा.
- टार्गेट ठेवून वाचन करा.
- यशाचा निर्धार करून प्रयत्नांवर लक्ष केंद्रित करा.
- भरपूर वाचन व विश्लेषणात्मक क्षमता निर्माण करावी.

## यशाची सूत्रे



विजया जाधव
साहाय्यक जिल्हाधिकारी, झारखंड, भा.प्र.से. (२०१४)

- जुन्या प्रश्नपत्रिका सोडवाव्या. यशस्वी विद्यार्थ्यांच्या प्रश्नपत्रिकांतील उत्तरांची शैली, मांडणी लक्षात घ्यावी.
- नियमित वृत्तपत्र वाचन तुलनात्मकदृष्ट्या करावे.
- कसलीही शिकवणी न लावता सुसूत्रता, नियोजनबद्ध अभ्यास, उजळणी, स्वतःच्या नोट्स काढून तयारीत शिस्त ठेवली तर या परीक्षेत यश मिळवता येते.
- ऐच्छिक विषय निवडताना महत्त्वाचे आणि नेहमीचे विषय घेतलेच पाहिजे असे नाही. २२ विषयांपैकी पाली, संस्कृत असा कुठलाही विषय घेऊन चांगले गुण मिळवू शकता.
- सदैव सकारात्मक दृष्टिकोन ठेवा.

---




पराग गवळी, (भा.प्र.से.)
उपजिल्हाधिकारी,
नाबरंगपूर, ओडिशा

- ध्येय निश्चित करा आणि त्यावर ठाम राहा.
- समस्या निवारण विचारपद्धती विकसित करा. याचा फायदा तुम्हाला केवळ सकारात्मक व्यक्तिमत्त्व घडवण्यातच नव्हे तर परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर मुलाखतीदरम्यान आणि प्रत्यक्ष कर्तव्य बजावण्यादरम्यान होईल.
- तुमच्या आजूबाजूला जे काही घडत आहे, ज्या काही अडचणी, प्रश्न आहेत त्यावर अधिक चांगला उपाय, मार्ग काय असू शकेल याचा सतत विचार करा.
- आपला शैक्षणिक पाया, क्षमता, मर्यादा, आकलन या बाबींचा विचार करून निर्णय घ्यावा व अभ्यासाची दिशा ठरवावी.

इंजिनिअरिंग करू शकणार नाही.

मला दहावीत चांगले मार्क मिळाले आणि मी पुण्यात फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. तेव्हा असं वाटलं की आपण खूप ग्रेट काही केलंय. अकरावीत गणिताच्या पहिल्याच परीक्षेत हा फुगा फुटला. हा माझ्यासाठी पुरेसा धक्का होता. त्यामुळे चाणक्य मंडलमध्ये प्रिपेरेटरी कोर्स करताना असो वा पुढे युपीएससीचा कोर्स करताना असो, मी ठरवलं की कुठलीही परीक्षा असो, प्रामाणिकपणे शक्य असेल तेवढा प्रयत्न करायचा आणि पहिलंच यायचं. यशासारखे दुसरे काहीच नसते, यशाची सवय व्हावी लागते. हे मनाशी ठेवून दोन्ही वर्ष इंजिनिअरिंगसोबत कोर्स आणि अभ्यास असे चालू ठेवले. हे करताना जाणवलं की वेळेच्या व्यवस्थापनाला फार महत्त्व आहे.''

### उज्ज्वलकुमार चव्हाण



उज्ज्वलकुमार चव्हाण यांनीही बालपणापासून प्रतिकूल परिस्थितीशी सामना करत या नागरी सेवा परीक्षेत यश मिळवलं. त्यांची आठवण सांगताना ते म्हणाले,

''लहानपणाचा काळ तसा भौतिक अर्थाने कठीण काळ होता. पावसाळ्यात गळणारं मातीचं घर, रात्रीची मोडणारी झोप, बकऱ्या, कुत्रा यांचा घरातच कोंडवाडा असा कार्यक्रम. हिवाळ्यात दिवाळीच्या सुमारास कापूस वेचणी, लगणी (कणसं बुडणं), ढोरांमागे राखण अशी धांदल असे. उन्हाळा भकास, रुक्ष, गावातली भांडणं असा काळ.

मी चौथी आणि सातवी स्कॉलरशिपला, ८वी ला एमटीएसला चाळीसगाव तालुक्यात पहिला होतो. गावातून कधीच असं झालं नव्हतं. त्यामुळे मी गटात न बसणारा झालो. मित्रात अहिराणी बोलावी की मराठी भाषा बोलावी, विहिरीत पोहायला जावं की जाऊ नये, श्यामची आई, क्रिकेट खेळायला जावं की काल्याच्या कीर्तनात टाळकरी म्हणून उभं राहावं असे अनेक प्रश्न मला पडायचे.

मित्रांसारखं नाही वागलं तर चेष्टा होते अन् वागलं तर घरी मार पडतो. आईचा मी भरपूर मार खाल्ला आहे.

मी कॉलेजच्या शेवटच्या वर्षाला असताना आमच्याच कॉलेजचे सुदाम खाडे सर यूपीएससी पास होऊन आयएएस झाले. दुसऱ्या दिवशी आम्ही चार मित्र सरांना भेटायला गेलो. सर २-३ तास यूपीएससीवर बोलले, पण आम्हाला त्यातलं काहीच कळलं नाही. पण एक कळलं की सर होऊ शकतात तर आपणही होऊ शकतो. पुढचं नियोजन सुरू झालं. ''

### सलील बिजूर



सलील बिजुर हे सध्या दिल्लीत भारतीय राजस्व सेवेतील अधिकारी आहेत. ते सांगतात ''कॉलेजमध्ये असताना काही सेवाभावी संस्थांमध्ये काम केलं होतं. त्या काळात पुणे महापालिकेच्या आयुक्तांचं काम पाहून माझ्या मनात आयएएसबद्दल कुतूहल निर्माण झालं होतं.

आयुक्त होण्यासाठी यूपीएससीची परीक्षा द्यावी लागते हेसुद्धा ऐकलं होतं. पण असंही माझ्या कानावर आलं होतं की प्रशासकीय सेवेत अधिकारी होण्यासाठी २-३ वर्षांपेक्षा अधिक अभ्यास करावा लागतो. मी जेव्हा परीक्षा द्यायचा निर्णय घेतला तेव्हा कोणतंही काम न करता केवळ या परीक्षेची तयारी करायची माझी तयारी नव्हती. कॉलेज संपवून लगेच स्वतःच्या पायावर उभं राहावं असं मला वाटत होतं. मग कॉलेजनंतरची १-२ वर्षे काम करून, थोडं कमवून, मग परीक्षेला बसण्याचा निर्णय मी घेतला.''

### डॉ. राजेंद्र भारुड



डॉ. राजेंद्र भारुड यांची प्रशासकीय सेवेत येण्यापूर्वीपासूनची जीवन कहाणी थक्क करणारी आहे. ते सांगतात, ''मुंबईत मी माझं वैद्यकीय शिक्षण घेत असताना माझ्या मनात विचार आला की, आपण पदवी शिक्षण घेऊन पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रवेश घ्यावा. पण पदव्युत्तर शिक्षण करून मी समाजातील काही मोजक्याच लोकांसाठी काम करू शकलो असतो, परंतु जर

प्रशासनातील चांगली सर्व्हिस मिळवून चांगली पोस्ट मिळवली तर त्या पोस्टमुळे आपल्या सेवेची जी व्यापकता आहे, ती निश्चितच अजून वाढेल असं मला वाटू लागलं. घरातील वातावरण स्पर्धा परीक्षेसाठी अनुकूल नव्हतं. किंबहुना घरातील शिकलेल्या व्यक्ती फारच कमी होत्या. वैद्यकीय शिक्षण चालू असताना इंटर्नशिप करून पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रवेश घ्यावा की, केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा देऊन अधिकारी व्हावं अशी द्विधा मन:स्थिती माझ्या मनात निर्माण झाली. मार्च २०११ ला तिसऱ्या आठवड्यामध्ये केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या पूर्वपरीक्षेचा २० रुपयाचा फॉर्म भरून, अंतिम दिवसाला फक्त एक दिवस शिल्लक असताना पोस्टाने केंद्रीय लोकसेवा आयोग दिल्ली यांच्याकडे पाठवला, त्यानंतर माझं इंटर्नशिपचं काम ८ तास आणि ६ ते ८ तास अभ्यास अशी नियमित दिनचर्या. आवेदन अर्ज भरल्यानंतर सुरू झाली.

मी परीक्षेची तयारी करीत असताना कसलेही शिकवणी वर्ग नव्हते. आमच्या वैद्यकीय महाविद्यालयाच्या ग्रंथालयात एका कोपऱ्यामध्ये आपलं पुस्तक घेऊन त्या पुस्तकाचा अभ्यास एकचित्तपणे, एकाग्रपणे ध्यान लावून त्याचं मूळ तत्त्व समजून फक्त ६ महिन्याच्या कालावधीमध्ये ६ ते ८ तास काम, ८ तास अभ्यास करून मिळेल तेवढ्या वेळेचे नियोजन करून सुद्धा पास होता येते. ही परीक्षा पास होण्यासाठी व्यक्तिमत्त्व, परीक्षेतील विषयाबद्दल सखोल ज्ञान आणि सामान्य ज्ञान म्हणजेच सभोवतालचे ज्ञान या सर्व गोष्टी तुम्हाला यथोचितपणे मांडता आल्या आणि तुमची मांडणी बरोबर असेल तर आपण परीक्षेत नक्की यश संपादन करू शकतो असं माझं मत आहे.'

**प्रतीक ठुबे**

प्रतीक ठुबे हे मूळचे अहमदनगर जिल्ह्यातले. सध्या ते आसाम राज्यात सेवेत आहेत. ते सांगतात ''चौथ्या इयत्तेमध्ये असताना मला राष्ट्रीय शिष्यवृत्ती मिळाली होती. त्यावेळेस एका सत्कार सोहळ्यात मला मनोगत व्यक्त करण्यास सांगितलं. जरासा वेळ होता मध्ये, त्यामुळे वडिलांना भाषणासाठी काही मुद्दे देण्याचा आग्रह केला. वडलांनी दिलेल्या मुद्द्यांमध्ये शेवटचा मुद्दा होता की, असेच आशीर्वाद मिळत राहिले तर आम्ही एखाद्या दिवशी कलेक्टर होऊन दाखवू. अर्थातच या वाक्यानंतर भरपूर टाळ्या मिळाल्या. मलाही भारी वाटलं की काहीतरी मोठं पद दिसतंय म्हणून. कार्यक्रमानंतर वडलांना विचारलं की कलेक्टर म्हणजे काय? त्यावर त्यांनी मला यूपीएससी/एमपीएससी परीक्षेविषयी सांगितले.

लहानपणापासून मला एक सवय होती की, मी खूप प्रश्न विचारायचो आणि उत्तर मिळेपर्यंत त्याचा पिच्छा पुरवायचो.



आईवडिलांनी देखील कधीही या कुतूहलास दाबलं नाही. याचच रूपांतर पुढे एका सवयीत झालं, कोणतीही गोष्ट किंवा संकल्पना जोपर्यंत पूर्णपणे समजत नाही तोपर्यंत पुढे जायचं नाही, तसंच दुसरं कोणीतरी सांगतो किंवा अमुकने तमुक केलं आणि तो यशस्वी झाला म्हणून मीही हेच करावं. यापेक्षा आपण आपल्याला काय रुचेल आणि जमेल हे SWOT (एस-स्ट्रेंथ, डब्ल्यू-विकनेस, ओ-ऑपॉर्च्युनिटी, टी-थ्रेट) अॅनॅलिसिस करून आपण स्वत:च ठरवू शकलो तर अर्धे प्रश्न येथेच सुटतात हा माझा अनुभव आहे. बारावीमध्ये अनेक प्रवेश परीक्षा देऊन एक ना धड भाराभर चिंध्या हा अनुभव आलेला असल्याने एकच काय तो पर्याय ठरवून पुढे जावं हे ठरवलं होतं. युपीएससीची तयारी करण्याचा निर्णय घेतला. स्पर्धा परीक्षेला सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही बाजू आहेत. त्याचा डोळसपणे अभ्यास करून या क्षेत्रात मुला-मुलींनी यायला हवं. ज्यांना ज्यांना शक्य असेल त्यांनी आपण अधिकारी झाल्यावर नक्की कोणकोणती कामं आपल्याला करावी लागणार, कोणती आव्हानं पेलावी लागणार याचीही सखोल माहिती आधी घ्यायला हवी.

– स्मिता देशपांडे

**यशाची सूत्रे**



टीना डाबी
आयएएस २०१६

- विषयाच्या पाठांतरापेक्षा समजून घेणे जास्त गरजेचे.
- वक्तशीरपणा, संयम तसेच नियोजन ही त्रिसूत्री आवश्यक.
- स्वत:ची एक विचारपद्धती, लेखनशैली विकसित करा.
- फेसबूक व इतर समाज माध्यमांपासून शक्यतो दूर राहा.
- टीव्ही कमीतकमी वेळ पाहा.
- केवळ कोचिंगवर अवलंबून राहू नका.



हरेश्वर विश्वनाथ स्वामी, अतिरिक्त पोलीस उपायुक्त, दिल्ली (भा.पो.से)

- न्यूनगंड बाळगू नका
- घोकंपट्टीपेक्षा गुणात्मक अभ्यासावर भर द्या.
- सदैव स्वयंप्रेरित राहा.
- उजळणी व आत्मचिंतन करा
- शिकवणी वर्गाच्या मागे न लागता स्वयंअध्ययनावर भर द्या.
- मुख्य परीक्षेसाठी कमी शब्दात आशय मांडण्याचा सराव करा.
- मुलाखतीत स्वत:शी प्रामाणिक राहा.



# करिअर कसे निवडावे?

घोकंपट्टी करून उत्तम गुण मिळवणे फारसे अवघड नसते. त्यामुळेच परीक्षेतील गुणांवरून दिसते तीच बुद्धिमत्ता, हा गैरसमज मोडीत काढायला हवा. आधुनिक संशोधनाद्वारे 'मल्टिपल इंटेलिजन्स' ही संकल्पना पुढे आली आहे. करिअर निवडताना आपली बुद्धिमत्ता नेमकी कोणत्या प्रकारची आहे. याची चाचपणी करून करिअरच्या घोडदौडीत उतरायला हवे. एकविसाव्या शतकात येऊन ठाकलेले आपण, एका अर्थाने ज्ञानाच्या विस्फोटाच्या युगात जगत आहोत. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील झेप तर थक्क करायला लावणारी आहे. कालचे तंत्रज्ञान आज कालबाह्य ठरत आहे. सरकारी, खासगी क्षेत्रामध्ये ई (इंटरनेट) क्रांती झाली आहे. खासगी आयुष्यातही ई संचार झाला आहे. (फेसबूक, ट्विटर, व्हॉटसअप, ई-मेल वगैरे).

ई-क्रांतीवरून हळूहळू आपण एम (मोबाइल) क्रांतीकडे वाटचाल करत आहोत. जागतिकीकरण व खुल्या अर्थव्यवस्थेमुळे तर रोजगाराचे स्वरूपच बदलत चालले आहे. चीनने एस.सी.झेड.सारख्या संकल्पना राबवून उत्पादन व्यवसायाचे चित्र बदलले. मोठ्या प्रमाणावर उत्पादन व स्वस्त उत्पादन हा जणू यशाचा मंत्र झाला. अनेक जागतिक व भारतीय कंपन्यांच्या मालाचे उत्पादन चीनमध्ये होत आहे. जेवढे काम कराल तेवढे पैसे असे नवीन वर्क कल्चर अवतरले आहे. स्वाभाविकच प्रत्येक क्षेत्रातील काम करण्याच्या पद्धतीत भरपूर बदल झाले आहेत. उदा. बँकिंग क्षेत्रात ई-क्रांतीनंतर ग्राहकांना बँकेत जायची गरजच उरली नाही. पैसे काढण्यासाठी ए.टी.एम. सेंटर्स, खात्यातील बाकी पाहण्यासाठी इंटरनेट बँकिंग वा मोबाइल बँकिंग सेवा, चेक बुक विनंतीसाठी फोन रिक्वेस्ट, खरेदी करण्यासाठी क्रेडिट वा डेबिट कार्ड या साधनांचा सर्रास उपयोग करतो. जागोजागी बँकांच्या शाखा सुरू करण्यापेक्षा ऑनलाइन सेवा अधिक सक्षम करणे हे महत्त्वाचे झाले आहे. कारकुनांपेक्षा आजकाल बँकांमध्ये सिंगल विंडो ऑपरेटर वा कस्टमर सर्व्हिस एक्झिक्युटिव्हची गरज आहे. या प्रत्येकाकडे मार्केटिंगचे कौशल्य असणे महत्त्वाचे आहे.

### बदल व कामगिरीतील सातत्य

आजचा जमाना कोअर कॉम्पिटन्सचा आहे. आपले वैशिष्ट्य असलेले काम स्वत: करायचे व बाकीची कामे बाहेरून (आऊटसोर्स) करून घ्यायची हा आजचा कामाचा शिरस्ता झाला आहे. नोकरीच्या ठिकाणीसुद्धा विविध कौशल्ये असणाऱ्या व्यक्तींची आवश्यकता असते. खूप वर्षे एकाच कंपनीत काम करण्याचे आणि त्याचा अभिमान वाटण्याचे दिवस संपले आहेत. तीन ते पाच वर्षांमध्ये नोकरीची ठिकाणे बदलण्याचे प्रमाण वाढत आहे. एकाच जागी खूप वर्षे काम करत असल्यास त्या व्यक्तीमध्ये न्यून आहे, असे मानले जाते.

### मार्ग अनेक

नव्या युगात माणसांच्या गरजादेखील प्रचंड वाढल्या आहेत. कुटुंबव्यवस्थेमध्ये व सामाजिक जीवनामध्येसुद्धा भरपूर बदल झाले आहेत. कुटुंबातील माणसांची संख्या कमी होताना दिसते आहे. याचाच अर्थ रोजच्या जीवनातील अनेक गरजा भागवण्यासाठी अन्य पर्याय शोधावे लागत आहेत. (डे केअर सेंटर, पेशंट केअर सेंटर वगैरे). आधुनिक जगातील नवनव्या गरजांनी हजारो व्यवसायांना जन्म दिला आहे. यापैकी आपल्याला साजेसा कोणताही एक व्यवसाय निवडल्यास आपण आयुष्यात यशस्वी होऊ शकतो. महत्त्वाचा मुद्दा हा व्यवसाय वा करिअर निवडायचे कसे.

### मल्टिपल इंटेलिजन्स

सर्वसाधारणपणे करिअर निवडताना दोन निकष विद्यार्थी व पालकांसमोर असतात. एक म्हणजे परीक्षेत मिळवलेले गुण व सामाजिक प्रतिष्ठा. केवळ परीक्षेतील गुणांनुसार करिअर ठरवणे तितकेसे योग्य नसते. कारण आपल्या परीक्षापद्धतीमध्ये अनेक त्रुटी आहेत. एका विशिष्ट वर्षी विशिष्ट दिवशी, विशिष्ट प्रश्न असणाऱ्या परीक्षेत विद्यार्थ्यांना मिळणारे गुण त्याच्या बुद्धिमत्तेचा खरा आरसा असतीलच, असे नाही. घोकंपट्टी करून उत्तम गुण मिळवणे फारसे अवघड



नसते. त्यामुळेच परीक्षेतील गुणांवरून दिसते तीच बुद्धिमत्ता, हा गैरसमज मोडीत काढायला हवा. आधुनिक संशोधनाद्वारे 'मल्टिपल इंटेलिजन्स' ही संकल्पना पुढे आली आहे. गणिती बुद्धिमत्तेप्रमाणेच भाषिक बुद्धिमत्ता, कलाविषयक बुद्धिमत्ता, क्रीडाविषयक बुद्धिमत्ता असे बुद्धिमत्तेचे कितीतरी प्रकार आहेत. त्यामुळेच अभ्यासात मागे असणारा एखादा चित्रकलेत मात्र सरस असतो किंवा खेळात प्रवीण असतो. म्हणूनच करिअर निवडताना बुद्धिमत्ता नेमकी कोणत्या प्रकारची आहे, याची चाचपणी आवश्यक ठरते.

### क्षमता ओळखाव्या

प्रत्येक व्यक्तीमध्ये काही ना काही निसर्गदत्त क्षमता असतात. कुणाचा आवाज चांगला असतो, कुणाची चित्रकला चांगली असते, शरीरयष्टी उत्कृष्ट असते इत्यादी. करिअर निवडताना या क्षमतांनुसार निवडल्यास यशस्वी होणे अवघड राहत नाही. सचिन तेंडुलकरने चांगले गाणे गावे अशी अपेक्षा आपण करत नाही किंवा शाहरुख खानला चांगले चित्र काढता यावे, अशी आपण अपेक्षा करत नाही. कारण खेळातील कौशल्य वा अभिनयातील कौशल्य हे अनुक्रमे सचिन व शाहरुखला प्राप्त झालेल्या निसर्गदत्त क्षमतांचे मूर्त रूप आहे. म्हणूनच आपणच आपल्या क्षमतांचा अंदाज घेऊन योग्य प्रशिक्षण घेणे आवश्यक ठरते.



### करिअर निवडीची घिसाडघाई नको

करिअर ठरवण्यात सामाजिक प्रतिष्ठा हा एक महत्त्वाचा निकष विद्यार्थी व पालकांच्या मनात असतो. त्यामुळेच अभ्यासात चांगले गुण मिळवणारा विद्यार्थी कला शाखेत जायचे म्हणतो, तेव्हा पालक त्याला परावृत्त करून विज्ञानशाखेकडे वळवण्याचा प्रयत्न करतात. किंवा आमच्या खानदानात सर्व डॉक्टर्स, इंजिनीअर असल्याने आमच्या मुलाने/मुलीनेही तेच व्हायला हवे, असे पालक बजावतात व मुलांच्याही काहीवेळा ते गळी उतरते. मात्र सामाजिक प्रतिष्ठेच्या या चुकीच्या कल्पनांमुळे विद्यार्थ्यांच्या करिअरचा बळी जाऊ शकतो. मुळात अभियांत्रिकी वा वैद्यकीय शिक्षण हेच जीवनात यशस्वी होण्याचे राजमार्ग आहेत, हा गैरसमज काढून टाकला पाहिजे. आय.आय.एम.च्या विद्यार्थ्यांला प्रतिमहा काही लाख वेतनाची ऑफर आल्याचे वाचल्यावर आपणही एम.बी.ए. करायचे हा निर्णय विद्यार्थी घेतात. पण मुळात मॅनेजमेंट क्षेत्रासाठी लागणाऱ्या क्षमता, रुची आपल्यात आहे का, याचा विचारच कोणी करत नाही. केवळ पैसा व प्रतिष्ठेच्या 'वरलिया रूपा' ला भुलून करिअर निवडण्याची घिसाडघाई करतात.

### व्यक्तिमत्त्व

सर्वात शेवटचा घटक म्हणजे तुमचे व्यक्तिमत्त्व कसे आहे याचाही विचार करिअर निवडताना करायला हवा. व्यक्तिमत्त्व म्हणजे केवळ बाह्य रूप (रंग, रूप व पोशाख इ.) नव्हे, तर तुमचा स्वभाव, दृष्टिकोन याही घटकांचा त्यात समावेश होतो. हवाईसेवा (एअर हॉस्टेस), जनसंपर्क, हॉस्पिटॅलिटी या क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी नुसतेच आकर्षक व्यक्तिमत्त्व असून चालणार नाही, तर विनयशीलता, नम्रता, आपलेपणा, स्वागतशीलता या गुणांची आवश्यकता असते. संतापलेल्या ग्राहकाला शांत करण्याची हातोटी लागते. मार्केटिंग क्षेत्रासाठी तुमचे व्यक्तिमत्त्व मैत्री करणारे, नवीन लोकांना भेटायला उत्सुक असणारे असे हवे; तर अंतर्मुख स्वभाव असणाऱ्या व्यक्ती सॉफ्टवेअर प्रोग्रॅमिंग, विश्लेषणाचे क्षेत्र (कोणत्याही विषयाचे विश्लेषण - उदा. आर्थिक, गुन्हे तपास, सामाजिक), संशोधनात्मक क्षेत्र इ. ठिकाणी यशस्वी ठरतील. तुमची बुद्धिमत्ता, क्षमता व आवडीबरोबरीनेच व्यक्तिमत्त्वाचा विचार करून करिअर निवडणे महत्त्वाचे आहे. कारण ज्या क्षेत्रात करिअर करायचे आहे, त्या क्षेत्रातील लाइफस्टाइलला (जीवनपद्धती) अनुरूप व्यक्तिमत्त्व असावे.

बुद्धिमत्ता, आवड, क्षमता (ॲप्टिट्युड) व व्यक्तिमत्त्व इ. घटकांचा विचार करिअर निवडताना करायला हवा. जर या विषयी संभ्रम असेल तर अनुभवी शैक्षणिक समुपदेशकांकडून मानसशास्त्रीय कसोट्या (ॲप्टिट्युड टेस्ट) करून घ्याव्यात. या आधारे अभ्यासक्रम निवडणे व प्रशिक्षण घेणे उपयुक्त ठरते.

**- आनंद मापुस्कर**

## आवड, छंदातूनही उत्तम करिअर

करिअर निवडताना आपल्या आवडीचा म्हणजेच अभिरुचीचा विचार करणे आवश्यक असते. कारण ज्या व्यवसायात आपल्याला ३५-४० वर्षे काम करायचे आहे, त्यातून आनंद मिळायला हवा. आवडीचे काम असल्यास मिळणारे समाधान, आनंद द्विगुणित होतो. मात्र अभिरुचीप्रमाणे व्यवसाय न निवडल्यास चिडचिड होणे, मानसिक व शारीरिक स्वास्थ्य बिघडणे असे परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. शिक्षण एका क्षेत्रातील मात्र, आपल्या आवडीनुसार असलेल्या वेगळ्या क्षेत्रात करिअर करण्याचा निर्णय घेऊन यशस्वी झालेली उदाहरणे आपल्याला दिसतात. डॉ. गिरीश ओक, डॉ. श्रीराम लागू हे वैद्यकीय डॉक्टर्स पण अभिनयाच्या क्षेत्रात त्यांनी उत्तम यश संपादन केले आहे. हर्षा भोगलेंनी इंजिनीयरिंग व मॅनेजमेंट (आय.आय.एम.मधून) करून क्रिकेट समालोचक म्हणून नाव मिळवले. म्हणजे स्वत:ची आवड, छंद यातून उत्तम करिअर करता येते.



जगात प्रत्येक क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर दिवसागणिक वाढत चालला आहे. माणसाच्या दैनंदिन आयुष्याचा बहुतांशी भाग डिजिटल तंत्रज्ञानाने व्यापून टाकला आहे. २०२० पर्यंत संपूर्ण जग डिजिटल होईल, यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. हे होत असतानाच डिजिटल मार्केटिंगच्या पर्यायाने सोशल मीडियाच्या क्षेत्रातदेखील रोजगाराच्या लाखो संधी उपलब्ध होत आहेत.

# डिजिटल मार्केटिंग : नवे क्षेत्र

इंटरनेट, स्मार्टफोन, टॅबलेट, संगणक, लॅपटॉपसारख्या इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे केले जाणारे विपणन म्हणजे डिजिटल मार्केटिंग.. यालाच आपण ऑनलाइन मार्केटिंगसुद्धा म्हणू शकतो. डिजिटल उपकरणे घराघरात पोहोचली आहेत. इंटरनेट ॲण्ड मोबाइल असोसिएशन ऑफ इंडियाच्या एका आकडेवारीनुसार २०१८ पर्यंत डिजिटल मार्केटिंगच्या क्षेत्रात देशात १५ ते २० लाख नव्या नोकऱ्या उपलब्ध होणार आहेत. सॉफ्टवेअर प्रॉडक्ट आणि ॲप्स डेव्हलपमेंट, माहितीचे विश्लेषण आणि सोशल मीडिया मार्केटिंग आदी घटकांचा यात समावेश असेल. वाढत्या डिजिटल मार्केटिंग क्षेत्राने युवकांना भुरळ घातली असून या क्षेत्रात रोजगाराच्या आणि करिअरच्या मोठ्या संधी उपलब्ध आहेत.

देशातील इंटरनेट वापरकर्त्यांना आकर्षित करण्यासाठी विविध उद्योग, व्यावसायिक कंपन्या ऑनलाइन उपस्थिती वाढवू लागल्या आहेत. त्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करून नित्य नवे प्रयोग सुरू आहेत. मोबाइलवर लघुसंदेश (एसएमएस), सूचना, अलर्ट्स पाठवण्याबरोबरच ब्लॉग वर लिखाण, त्यासाठी संशोधन, डिझाईनिंग, वेब स्टॅटिस्टिक्स रिपोर्टिंग आदी पद्धती अवलंबल्या जात आहेत. हे सर्व करण्यासाठी कौशल्याधारित मनुष्यबळाची डिजिटल मीडिया क्षेत्रात नितांत आवश्यकता आहे.

**डिजिटल मार्केटिंग क्षेत्रातील संधी**

■ डिजिटल मार्केटिंग डायरेक्टर/मॅनेजर ■ वेब डेव्हलपर आणि वेब डिझाईनर ■ सोशल मीडिया एक्झिक्युटिव्ह ॲण्ड सोशल मीडिया मॅनेजर ■ सर्च इंजिन एक्झिक्युटिव्ह/सर्च इंजिन एक्सपर्ट ■ पीपीसी/एसईएम एक्सपर्ट ■ कन्टेन्ट मार्केटर ■ ग्राफिक डिझाईनर ■ ॲप डेव्हलपर ■ इनबाऊन्ड मार्केटिंग मॅनेजर ■ कनव्हर्जेन रेट ऑप्टिमाईजर

**कामाचे स्वरूप, जबाबदारी**

डिजिटल मार्केटिंग डायरेक्टर/मॅनेजर – डिजिटल मार्केटिंग डायरेक्टर किंवा मॅनेजर हे एक वरिष्ठ पद आहे. डिजिटल मार्केटिंग मधला किमान ५-७ वर्षांचा अनुभव असलेला व्यक्ती या पदावर काम करू शकतो. डिजिटल मार्केटिंग कॅम्पेन्सचे नियोजन, वेबसाईट आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्स नियमित अपडेट करण्याची महत्त्वाची जबाबदारी यांची असते.

वेब डेव्हलपर आणि वेब डिझाईनर–आकर्षक, दर्जेदार वेबसाईट बनवण्याची महत्त्वाची जबाबदारी यांची असते. वेब डेव्हलपर वेबसाईट बनवण्याची जबाबदारी पार पाडत असले तरी वेब डिझाईनरला खूप साऱ्या क्रिएटिव्ह गोष्टी कराव्या लागतात. वेबसाईट वापरकर्त्यांसाठी सुलभ म्हणजेच युझर फ्रेन्डली बनविण्यासाठी तिचे डिझाईनिंग, कोडिंग आणि मॉडिफाईंग करायचे काम वेब डेव्हलपर आणि वेब डिझाईनरला करावे लागतात. जावा स्क्रीप्ट, जे क्युरी, एचटीएमएल, सीएसएस आणि वेब प्रोग्रॅमिंगचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

सोशल मीडिया एक्झिक्युटिव्ह ॲण्ड सोशल मीडिया मॅनेजर – सोशल मीडियातील हा एक महत्त्वाचा घटक आहे. सोशल मीडियातील लेटेस्ट ट्रेण्डस पाहणे, सोशल मीडिया स्ट्रॅटेजी ठरवणे, सोशल मीडियासाठी कन्टेन्ट आणि क्लायन्ट टीमबरोबर नियमित समन्वय ठेवून दर्जेदार मजकूर (इन्फोग्राफिक, व्हिडिओ, ऑडिओ आदी) तयार करणे. या कामासाठी विविध सोशल मीडिया प्लॅटफॉर्मची माहिती आणि क्रिएटिव्हिटी असणे आवश्यक आहे.

सर्च इंजिन एक्झिक्युटिव्ह/सर्च इंजिन एक्सपर्ट – एखादी वेबसाईट कितीही आकर्षक, दर्जेदार असली पण ती जर लोकांपर्यंत पोहोचली नाही तर काहीच उपयोग नसतो. त्या वेबसाईटच्या प्रसारासाठी सर्च इंजिन ऑप्टिमाईझेशनची नितांत आवश्यकता असते. त्या कामासाठीच सर्च




इंजिन एक्झिक्युटिव्ह/सर्च इंजिन एक्सपर्टची नियुक्ती केली जाते. कंपनीच्या वेबसाईटला वेबजालावर अधिकाधिक प्रमोट करण्यासाठी, वेबसाईटला भेट देणाऱ्यांची संख्या वाढविण्यासाठी आणि गुगल रँकिंगमध्ये वरचा क्रमांक आणण्याचे महत्त्वाचे काम त्यांना करावे लागते. वेबसाईटवरील मजकूर हा सहजपणे शोधता येईल, त्यासाठी कीवर्डस तयार करणे, एसईओ टुल्सचे संशोधन, साईटमॅप अशा विविध जबाबदाऱ्या या सर्च इंजिन एक्झिक्युटिव्ह/सर्च इंजिन एक्सपर्टला पार पाडाव्या लागतात.

पीपीसी/एसईएम तज्ज्ञ – पीपीसी म्हणजे Pay Per Click Expert तर एसईएम म्हणजे Search Engine Martketing Manager.. इंटरनेटवर सर्फिंग करीत असताना काही महत्त्वाच्या उपयुक्त तर काही कंटाळवाण्या डॉस ज्या आपल्याला दिसतात, त्या सर्व हे एक्सपर्ट तयार करीत असतात. इंटरनेट साईटवर अधिकाधिक लोकांची ट्रॅफिक वाढवण्यासाठी Pay Per Click कीवर्डस, स्प्लीट अॅड ग्रुप्स, अहवाल तयार करणे, ग्राफिक्स आणि अॅड कॉपीजसाठी मजकूर सुचवण्याचे काम हे एक्सपर्ट करत असतात.

कन्टेन्ट मार्केटर – जर तुम्ही इतरांपेक्षा अधिक चांगले, आकर्षक वेबसाईटसाठी कॉपी लिहीत असाल तर तुम्ही कन्टेन्ट मार्केटर म्हणून नक्कीच काम करू शकता. सोशल मीडिया किंवा इन्स्टन्ट मेसेजिंगमध्ये लगेच व्हायरल होण्याची गुणवत्ता असलेला मजकूर निर्मितीचे काम कन्टेन्ट मार्केटरला करावे लागते. हा मजकूर सर्च इंजिन ऑप्टिमाईझेशनद्वारा आणि इतर टीम सदस्यांच्या समन्वयातून अधिकाधिक प्रमोट करण्यासाठी फायदेशीर ठरत असल्यामुळे त्यात अधिक क्रिएटिव्हिटी असणे आवश्यक असते. कन्टेन्ट मार्केटिंगचे काम करताना इंग्रजीबरोबर स्थानिक भाषेवर प्रभुत्व असणे आवश्यक आहे.

ग्राफिक डिझाईनर – सोशल मीडिया टीमला क्रिएटिव्ह कन्टेन्टसह सहकार्य करणे. आपल्या प्रकल्प किंवा उत्पादनाच्या प्रसारासाठी ग्राफिक मांडणी करण्याकरिता संकल्पना तयार करणे. कॅम्पेनसाठी डिझाईन विकसित करणे.

अॅप डेव्हलपर – डिजिटल मार्केटिंगमध्ये अॅप हे एक महत्त्वाचे माध्यम असून मोठ्या व्यावसायिक, औद्योगिक संस्था किंवा प्रसारमाध्यम संस्थांचे स्वतःचे मोबाईल अॅप जेव्हा तयार करतात त्यावेळी अॅप डेव्हलपरची गरज भासते. अॅन्ड्रॉईड किंवा आयफोनसाठी (आयओएस) अॅप डिझाईन-विकसित करून त्याची देखभाल करण्याचे काम अॅप डेव्हलपरचे असते.

इनबाऊन्ड मार्केटिंग मॅनेजर – इनबाऊन्ड मार्केटिंग मॅनेजर हा डिजिटल टीममधील एक घटक असून सोशल मीडिया, एसईओ, ईमेल मार्केटिंगच्या संबंधीने डेटा आणि सांख्यिकी विश्लेषण करण्याचे काम तो करतो. कॅम्पेनचे यशापयश तपासण्याचे काम हा मॅनेजर करीत असतो. विश्लेषणात्मक नवीन डिजिटल रिपोर्टिंग पद्धती तयार करण्याबरोबरच कॅम्पेनचे सादरीकरण अजून दर्जेदार होण्यासाठी, नवनवीन तंत्र आणि साधने विकसित करण्याचे काम हे इनबाऊन्ड मार्केटिंग मॅनेजर करत असतात.

डिजिटल मार्केटिंगच्या क्षेत्रात कनव्हर्जन रेट ऑप्टिमाईजर, अॅनालिटिक्स मॅनेजर, सीआरएम मॅनेजर, ईमेल मार्केटिंग मॅनेजर, ई-कॉमर्स मॅनेजर, डिजिटल एजन्सी अकाऊन्ट डायरेक्टर अशा विविध तज्ज्ञांच्या स्वरूपात रोजगाराच्या असंख्य संधी उपलब्ध आहेत.

## डिजिटल मार्केटिंग पात्रता

■ संबंधित विषयातील पदवीधर ■ एमबीए (मार्केटिंग), मास कम्युनिकेशन अॅण्ड जर्नालिझम किंवा ग्राफिक डिझाईनमध्ये पदवीधर असलेल्यांना संधी ■संगणक शास्त्रातील पदवीधरांसाठी आणि अॅडव्हान्स्ड विविध पदवी, पदविका प्राप्त तरुण-तरुणींसाठी हे एक आव्हानात्मक क्षेत्र ■ मॅक, लिनक्स, विंडोज या ऑपरेटिंग सिस्टिम्सची तसेच आयओएस/अॅन्ड्रॉईड मोबाईल प्रणालीचे ज्ञान असणे आवश्यक. ■ इंग्रजीबरोबरच प्रादेशिक भाषेची उत्तम जाण असणे आवश्यक ■ एसईओ आणि वेब ट्रॅफिक मेट्रिक्सची माहिती असावी ■ सोशल मीडिया प्लॅटफॉर्मविषयी सविस्तर माहिती ■ जावा, एचटीएमएल यासारख्या भाषांची माहिती ■ व्हिडिओ एडिटिंग आणि विविध आधुनिक ग्राफिक डिझाईनिंग सॉफ्टवेअर्स हाताळता येणे आवश्यक ■ डेटा आणि सांख्यिकीचे विश्लेषण करण्याची क्षमता

## डिजिटल मार्केटिंगचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्था

केंद्र शासनाचे एमएसएमई-टेक्नॉलॉजी डेव्हलपमेन्ट सेंटर आग्रा – महाराष्ट्रात मुंबई, पुणे, नाशिक येथे प्रशिक्षण केंद्र. प्रवेशासाठी पात्रता- कोणत्याही शाखेचा पदवीधर/पदविकाधारक. संपर्क- प्रधान संचालक, एमएसएमई-टेक्नॉलॉजी डेव्हलपमेन्ट सेंटर. (पीपीडीसी), फाऊन्ड्री नगर, आग्रा-२८२००६ ईमेल- info@ppdcagra.in, संकेतस्थळ- www.ppdcagra.in

डिजिटल विद्या, नवी दिल्ली- सर्टिफाईड डिजिटल मार्केटिंग मास्टर कोर्स. हा कोर्स ऑनलाइन आहे.

एज्युकार्ट, नवी दिल्ली- हे एक देशातील नामवंत डिजिटल मार्केटिंग ट्रेनिंग इन्स्टिट्यूट असून डिजिटल मार्केटिंगचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम येथे शिकवला जातो. हा कोर्स ऑनलाइन सुद्धा करता येतो.

डिजिटल मार्केटिंग अकॅडमी, हैदराबाद- डिजिटल मार्केटिंगसह सर्च इंजिन ऑप्टिमाईझेशन, गुगल ऍडवर्डस/पे पर क्लिक/एसईएम आणि सोशल मीडिया ऑप्टिमाईझेशनचे कोर्सेस येथे आहेत.

**– किशोर गांगुर्डे**
(वरिष्ठ सहायक संचालक, सोशल मीडिया)



# बँकर व्हा!

बँकेमधील नोकरीला आज प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. बँकिंग क्षेत्रात खासगी, सहकारी व सार्वजनिक (राष्ट्रीयीकृत) असे तीन प्रकार आहेत. १९९० नंतर आर्थिक उदारीकरणाच्या, खासगीकरणाच्या काळात खासगी बँकांविषयी आकर्षण वाढलं होतं. वेतनाचे मोठे आकडे हेच यामागचं मुख्य कारण होतं. गेल्या काही वर्षांत राष्ट्रीयीकृत बँकांनी आपली कामगिरी टिकवून आणि आपला व्यवसाय वाढवला. त्यामुळे या बँकांमध्ये सध्या नोकऱ्यांची उत्तम संधी निर्माण झाली आहे. यूपीएससी, एमपीएससी परीक्षांनंतर बँकेत प्रोबेशनरी ऑफिसर होण्याची क्रेझ आजही आहे. राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये प्रोबेशनरी ऑफिसरचे पद हे मानाचे समजले जाते.



राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये विविध पदांसाठी हजारो करिअरच्या संधी निर्माण झाल्या आहेत. येत्या काही वर्षांत हे चित्र कायम असेल. देशात सध्या २६ राष्ट्रीयीकृत बँका आहेत. बँकामध्ये विविध पदांसाठी भरती होत असते. मोठ्या प्रमाणावर भरती ही लिपिक पदे व प्रोबेशनरी ऑफिसर्ससाठी होते. याबरोबरीनेच लॉ ऑफिसर्स, आय.टी. ऑफिसर्स, क्रेडिट ऑफिसर्स, सुरक्षा अधिकारी, ग्राहक संपर्क अधिकारी, हिंदी भाषा अधिकारी इ. पदांसाठीदेखील भरती होते. संबंधित विषयातील पदवी अभ्यासक्रम पूर्ण केलेले विद्यार्थी या पदांसाठी पात्र ठरतात.




पूर्वी प्रत्येक बँक वरील पदांसाठी स्वतंत्रपणे स्पर्धा परीक्षा आयोजित करत असे. त्यामुळे युवकांना वर्षांतून अनेकदा परीक्षेला सामोरे जावे लागत असे. उमेदवारांना वारंवार लेखी परीक्षा द्यायला लागू नये, यासाठी २६ पैकी २० बँकांनी (स्टेट बँक ऑफ इंडिया व त्यांच्या सहयोगी बँका आदी वगळून) एकत्र येऊन सामायिक लिपिक परीक्षा, सामायिक प्रोबेशनरी ऑफिसर परीक्षा व सामायिक स्पेशालिस्ट ऑफिसर परीक्षा २०११ पासून सुरू केली आहे. याचाच अर्थ २० राष्ट्रीयीकृत बँकांसाठी एकाच लेखी परीक्षेला उमेदवारांना सामोरे जावे लागेल. या परीक्षा घेण्याचे काम इन्स्टिट्युट ऑफ बँकिंग पर्सोनेल सिलेक्शन (आयबीपीएस) ही संस्था करीत आहे. सामायिक लेखी परीक्षेसाठी प्रवेश अर्ज संस्थेच्या वेबसाइटवर ऑनलाइन भरावे लागतात. प्रवेश अर्ज भरण्याबाबत तसंच परीक्षा शुल्क भरण्याबाबतची सर्व माहिती संस्थेच्या वेबसाइटवर देण्यात आली आहे-(www.ibps.in)

सामायिक परीक्षेत सहभागी असलेल्या २० राष्ट्रीयकृत बँका- अलाहाबाद बँक, इंडियन ओवरसीज बँक, आंध्र बँक, ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स, बँक ऑफ बडोदा, पंजाब नॅशनल बँक, बँक ऑफ इंडिया, पंजाब अॅण्ड सिंध बँक, बँक ऑफ महाराष्ट्र, सिंडिकेट बँक, कॅनरा बँक, यूको बँक, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, युनियन बँक ऑफ इंडिया, कॉर्पोरेशन बँक, युनायटेड बँक ऑफ इंडिया, देना बँक, विजया बँक, इंडियन बँक, आय.डी.बी.आय बँक

**प्रोबेशनरी ऑफिसर व मॅनेजमेंट ट्रेनी**

शैक्षणिक पात्रता - कोणत्याही विषयातील मान्यताप्राप्त विद्यापीठातील पदवीधर

वयोमर्यादा - किमान २० वर्षे व कमाल 30 वर्षे (ओ.बी.सी.साठी कमाल वयोमर्यादा 33 वर्षे तर अनुसूचित जाती/जमातीसाठी कमाल वयोमर्यादा ३५ वर्षे)

निवडप्रक्रिया -

पहिला टप्पा (पूर्व परीक्षा) - पूर्व परीक्षा १०० गुणांची घेतली जाते. प्रश्नपत्रिकेचे स्वरूप वस्तुनिष्ठ असून परीक्षा संगणकावर ऑनलाइन घेतली जाते.

खालील तीन विषयांवर प्रत्येकी एकूण १०० गुणांचे प्रश्न विचारले जातात. परीक्षेसाठी १ तास कालावधी असतो.

इंग्रजी भाषा (30 प्रश्न), क्वांटिटेटिव्ह अॅप्टिट्युड (३५ प्रश्न), टेस्ट ऑफ रिझनिंग (३५ प्रश्न)

पूर्व परीक्षेतून एकूण जागांच्या २० पट उमेदवारांची निवड मुख्य परीक्षेसाठी केली जाते.

दुसरा टप्पा (मुख्य परीक्षा) -

मुख्य परीक्षेमध्ये २०० गुणांची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नपत्रिका असते. ही प्रश्नपत्रिका ऑनलाईन (संगणकीकृत) असेल. यासाठी कालावधी २ तासांचा असतो. पुढील पाच विषयांवर प्रश्न विचारले जातात. इंग्रजी भाषा - (४० प्रश्न - ४० गुण), सामान्य ज्ञान - (४० प्रश्न - ४० गुण), क्वांटिटेटिव्ह अॅप्टिट्युड - (५० प्रश्न - ५० गुण), टेस्ट ऑफ रिझनिंग (५० प्रश्न - ५० गुण), कॉम्प्युटर नॉलेज - (२० प्रश्न

– २० गुण) पूर्व व मुख्य परीक्षेमध्ये चुकीच्या उत्तरासाठी एक चतुर्थांश म्हणजेच ०.२५ इतके गुण कमी केले जातील.

### तिसरा टप्पा

मुख्य परीक्षेच्या दोन्ही भागांमध्ये निवड झालेल्या उमेदवारांना तिस-या टप्प्यांत मुलाखतीसाठी बोलावले जाते. मुलाखतीसाठी एकूण १०० गुण असतात. खुल्या वर्गातील उमेदवाराला मुलाखतीमध्ये किमान ४० टक्के तर राखीव वर्गातील उमेदवाराला किमान ३५ टक्के गुण मिळवणे आवश्यक आहे.

### अंतिम निवड

उमेदवारांची निवड करताना मुख्य परीक्षेतील गुणांना ८० टक्के वेटेज असेल तर मुलाखतीतील गुणांना २० टक्के वेटेज असेल. मुख्य परीक्षा व मुलाखतीतील एकत्रिक गुणांनुसार उमेदवारांची निवड केली जाते.

### लिपिक संवर्ग

वयोमर्यादा– किमान वयोमर्यादा २० वर्षे असून खुल्या वर्गासाठी कमाल वयोमर्यादा २८ वर्षे आहे. (अनुसूचित जाती/जमातींसाठी 33 वर्षे, ओबीसींसाठी ३१ वर्षे इतकी आहे.)

शैक्षणिक पात्रता – मान्यताप्राप्त विद्यापीठातील पदवीधर. तसेच ज्या राज्यासाठी उमेदवार प्राधान्य देणार आहे त्या राज्याची भाषा त्याला येणे आवश्यक आहे. (उदा. महाराष्ट्रामध्ये मराठी भाषा येणे गरजेचे आहे.)

### निवडप्रक्रिया

पहिला टप्पा (पूर्व परीक्षा) – पूर्व परीक्षा १०० गुणांची घेतली जाते. प्रश्नपत्रिकेचे स्वरूप वस्तुनिष्ठ असून परीक्षा संगणकावर ऑनलाईन घेतली जाते.

खालील तीन विषयांवर प्रत्येकी एकूण १०० गुणांचे प्रश्न विचारले जातात. परीक्षेसाठी १ तास कालावधी असेल. इंग्रजी भाषा (30 प्रश्न), न्यूमरिकल ॲबिलिटी (३५ प्रश्न), रिझनिंग ॲबिलिटी (३५ प्रश्न)

पूर्व परीक्षेतून एकूण जागांच्या २० पट उमेदवारांची निवड मुख्य परीक्षेसाठी केली जाते.

### दुसरा टप्पा (मुख्य परीक्षा)

मुख्य परीक्षेमध्ये २०० गुणांची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नपत्रिका असते. ही प्रश्नपत्रिका ऑनलाईन (संगणकीकृत) असते. यासाठी कालावधी २ तासांचा असतो. खालील पाच



## स्पेशालिस्ट ऑफिसर

बँकेमध्ये दैनंदिन कामासाठी लिपिक व प्रोबेशनरी ऑफिसर्सबरोबरीनेच विविध विषयातील स्पेशालिस्ट ऑफिसर्सची आवश्यकता असते. २० सार्वजनिक क्षेत्रातील बँकांत स्पेशालिस्ट ऑफिसर्सची निवड करण्यासाठी एकच सामायिक परीक्षा घेतली जाते.

विषयांवर प्रश्न विचारले जातात. इंग्रजी भाषा – (४० प्रश्न – ४० गुण), सामान्य ज्ञान (विशेषत: बँकिंग संदर्भातील) – (४० प्रश्न – ४० गुण ), क्वांटिटेटिव्ह ॲप्टिट्युड – ( ४० प्रश्न – ५० गुण), टेस्ट ऑफ रिझनिंग (४० प्रश्न – ५० गुण), कॉम्प्युटर नॉलेज – (४० प्रश्न – २० गुण). पूर्व व मुख्य परीक्षेमध्ये चुकीच्या उत्तरासाठी एक चतुर्थांश म्हणजेच ०.२५ इतके गुण कमी केले जातील.

अंतिम निवड – उमेदवारांची निवड करताना मुख्य परीक्षेतील गुणांवरून केली जाईल. लिपिक वर्गासाठी मुलाखती घेतल्या जात नाहीत.

संगणकाचे प्राथमिक ज्ञान असणे आवश्यक असतं. मायक्रोसॉफ्ट ऑफिसमधील वर्ड एक्सेल, पॉवरपॉइंट आदी सॉफ्टवेअर वापरता येणेही गरजेचे असते.

क्लेरिकल पदासाठीच्या कामांमध्ये आता मार्केटिंग, प्रमोशनल ॲक्टिव्हिटी आदी कामांचाही सहभाग केला गेला आहे. या उपक्रमांसाठी बँकेच्या बाहेरदेखील जावे लागेल, असा अनेक जाहिरातींत उल्लेख केलेला आढळतो. या पदासाठी मार्केटिंगचे स्किल असणे हे आता आवश्यक झाले आहे.

### स्पेशालिस्ट ऑफिसर्सची पदे

**माहिती तंत्रज्ञान अधिकारी**

वयोमर्यादा – किमान २० वर्षे, कमाल 30 वर्षे. शैक्षणिक पात्रता – इलेक्ट्रॉनिक्स, संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान या विषयातील पदवी वा पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केलेले असणे आवश्यक.

**कृषी क्षेत्र अधिकारी**

वयोमर्यादा – किमान २० वर्षे, कमाल 30 वर्षे. शैक्षणिक पात्रता – कृषी वा त्यासंबंधीत क्षेत्रातील पदवीधर ( हॉर्टीकल्चर, पशुवैद्यकीय, डेअरी सायन्स, कृषी अभियांत्रिकी, फिशरीज सायन्स वगैरे)

**राजभाषा (हिंदी) अधिकारी**

वयोमर्यादा – किमान २० वर्षे, कमाल

३० वर्षे. शैक्षणिक पात्रता – एम.ए. (हिंदी) तसेच पदवीस्तरावर इंग्रजी विषय घेतलेला असणे आवश्यक किंवा एम.ए. (संस्कृत) तसेच पदवीस्तरावर हिंदी व इंग्रजी विषय घेतलेले असणे आवश्यक.

**विधी (लॉ) अधिकारी**

वयोमर्यादा – किमान २० वर्षे, कमाल ३० वर्षे. शैक्षणिक पात्रता – विधी विषयातील पदवी आवश्यक

**तांत्रिक (टेक्निकल) अधिकारी**

वयोमर्यादा – किमान २० वर्षे, कमाल ३० वर्षे. शैक्षणिक पात्रता – इंजिनियरींगमधील खालील विषयातील पदवी आवश्यक

(सिव्हिल/इलेक्ट्रिकल/मेकॅनिकल/प्रॉडक्शन/मेटलर्जी/ इलेक्ट्रॉनिक्स / कॉम्प्युटर सायन्स/ इन्फोर्मेशन टेक्नोलॉजी/ टेक्सटाईल/ केमिकल) किंवा बी.फार्मसी.

**मनुष्यबळ विकास (एच.आर.)/कार्मिक (पर्सोनेल) अधिकारी**

वयोमर्यादा – किमान २० वर्षे, कमाल ३० वर्षे. शैक्षणिक पात्रता – पदवीधर व खालील विषयांपैकी किमान एका विषयात ए.आय.सी.टी.ई. मान्यताप्राप्त संस्थेतून पदव्युत्तर पदवी वा पदविका प्राप्त असणे आवश्यक. (पर्सोनेल मॅनेजमेंट/इंडस्ट्रीयल रिलेशन्स/मनुष्यबळ विकास/ सोशल वर्क/ लेबर लॉ) किंवा बिझनेस मॅनेजमेंट/ॲडमिनीस्ट्रेशनमधील पदवी किंवा पदविका (मनुष्यबळ विकासातील स्पेशलायझेशनसह)

**माहिती तंत्रज्ञान अधिकारी (स्केल–२)**

वयोमर्यादा – किमान २१ वर्षे, कमाल ३० वर्षे. शैक्षणिक पात्रता – इलेक्ट्रॉनिक्स, संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान या विषयातील पदवी वा पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केलेले असणे आवश्यक. किमान १ वर्षाचा अनुभव आवश्यक

**विधी (लॉ) अधिकारी (स्केल – २)**

वयोमर्यादा – किमान २० वर्षे, कमाल ३० वर्षे. शैक्षणिक पात्रता – विधी विषयातील पदवी आवश्यक. किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक.

**चार्टड अकाऊंटन्ट (स्केल –२)**

वयोमर्यादा – किमान २१ वर्षे, कमाल ३० वर्षे. शैक्षणिक पात्रता – सी.ए.

**फायनान्स एक्झिक्युटिव्ह (स्केल –२)**

वयोमर्यादा – किमान २५ वर्षे, कमाल ३० वर्षे. शैक्षणिक पात्रता – एम.बी.ए. किंवा पी.जी.डी.बी.एम. (ए.आय.सी.टी.ई. मान्यताप्राप्त) अनुभव – फायनान्शियल इन्स्टिट्यूट किंवा बँकेत इंडस्ट्रीयल प्रोजेक्टसचे क्रेडिट. ॲपरायझल करण्याचा कमीत कमी ३ वर्षाचा अनुभव आवश्यक

**पणन (मार्केटिंग) अधिकारी**

वयोमर्यादा – किमान २० वर्षे, कमाल ३० वर्षे. शैक्षणिक पात्रता – एम.बी.ए. (मार्केटिंग) किंवा २ वर्षांचा पी.जी.डी.बी.एम / पी.जी.डी.बी.ए. किंवा मार्केटिंग मधील मान्यताप्राप्त विद्यापीठातील पदवी वा पदविका अभ्यासक्रम आवश्यक.



**लेखी परीक्षा**

लेखी परीक्षा ऑनलाइन घेतली जाईल. चुकीच्या उत्तरासाठी ०.२५ गुण वजा केले जातील. परीक्षेसाठी २ तासाचा कालावधी असेल. परीक्षेचे स्वरूप वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी असते.

- लेखी परीक्षा (राजभाषा व विधी अधिकारी पदांसाठी) – राजभाषा अधिकारी / विधी अधिकारी पदांसाठी घेतल्या जाणाऱ्या लेखी परीक्षेमध्ये तर्कशक्ती (रिझनिंग), इंग्रजी, सामान्य ज्ञान (विशेषतः बँकिंग संदर्भात), व्यावसायिक ज्ञानाची परीक्षा या विषयांचा समावेश असतो. वरील प्रत्येक विषयासाठी प्रत्येकी ५० प्रश्न विचारले जातात. तर्कशक्ती, इंग्रजी व सामान्य ज्ञान या विषयांमध्ये उमेदवाराने केवळ उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अंतिम निवडीमध्ये या विषयांचे गुण ग्राह्य धरले जात नाहीत. केवळ व्यावसायिक ज्ञानाच्या विषयाचे ५० प्रश्न (८० गुण) हेच अंतिम निवडीमध्ये ग्राह्य धरले जातात.

- लेखी परीक्षा (अन्य पदांसाठी) – राजभाषा व विधी अधिकारी या पदांव्यतिरिक्त अन्य पदांसाठी घेतल्या जाणाऱ्या लेखी परीक्षेमध्ये खालील विषयांचा समावेश होतो. तर्कशक्ती (रिझनिंग), इंग्रजी, क्वांटिटेटिव्ह ॲप्टिट्युड, व्यावसायिक ज्ञानाची परीक्षा या विषयांवर प्रत्येकी ५० प्रश्न विचारले जातात. तर्कशक्ती (रिझनिंग), इंग्रजी, क्वांटिटेटिव्ह ॲप्टिट्युड या विषयांमध्ये उमेदवाराने केवळ उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अंतिम निवडीमध्ये या विषयांचे गुण ग्राह्य धरले जात नाहीत. केवळ व्यावसायिक ज्ञानाच्या विषयाचे ५० प्रश्न (८० गुण) हेच अंतिम निवडीमध्ये ग्राह्य धरले जातात.

- मुलाखत – लेखी परीक्षेमध्ये निवड झालेल्या उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावले जाते. मुलाखतीसाठी एकूण १०० गुण असतात. खुल्या वर्गातील उमेदवाराला मुलाखतीमध्ये किमान ४० टक्के तर राखीव वर्गातील उमेदवाराला किमान ३५ टक्के गुण मिळवणे आवश्यक आहे.

अंतिम निवड – उमेदवारांची निवड करताना लेखी परीक्षेतील गुणांना ८० टक्के वेटेज असेल तर मुलाखतीतील गुणांना २० टक्के वेटेज असेल. मुख्य परीक्षा व मुलाखतीतील एकत्रिक गुणांनुसार उमेदवारांची निवड केली जाते.

लेखी परीक्षेत निवड झालेल्या उमेदवारांची मुलाखत देखील आय.बी.पी.एस. घेते. लेखी परीक्षा व मुलाखतीमधील गुणांनुसार गुणवत्ता यादी जाहीर केली जाते. गुणवत्ता यादी जाहीर केल्यानंतर आय.बी.पी.एस. राष्ट्रीयकृत बँकांमधील राज्य/केंद्रशासित प्रदेशानुसार उपलब्ध पदांची संख्या जाहीर करते. यामध्ये राखीव जागांचाही उल्लेख असतो. गुणवत्ता यादीतील उमेदवारांकडून त्यांना कोणत्या बँकेत नोकरीसाठी प्राधान्यक्रम हवा आहे हे विचारले जाते. लेखी परीक्षा व मुलाखतीमधील गुण, उमेदवारांनी दिलेले प्राधान्यक्रम व बँकेतील रिक्त जागांची संख्या या माहितीच्या आधारे बँकेच्या वतीने नोकरीसाठी यशस्वी उमेदवाराला कॉल लेटर पाठवले जाईल. राष्ट्रीयकृत बँकात विविध संवर्गात निवड झालेल्या उमेदवारांना उच्च पदापर्यंत जाण्याची संधी मिळतात.

– प्रा. मीनल मापुस्कर

# व्हा फिटनेस गुरू...

प्रेरणा

खेळ आणि आरोग्याविषयी मोठ्या प्रमाणावर जागृती वाढली आहे. पाल्याने एखाद्या खेळात करिअर करावे असे अनेक पालकांना वाटते. तर कुणाला आपण निरोगी आणि सुदृढ राहावे असे वाटते. त्यामुळे कुठलाही मैदानी खेळ आणि व्यायामशाळेसाठी शारीरिक प्रशिक्षकाची गरज भासत असल्याने फिटनेस क्षेत्रात अनेक संधी निर्माण झाल्या आहेत.



फिटनेस हा आरोग्याचा मूलमंत्र आहे. आपल्याला फिटनेस प्रशिक्षक बनायचे असेल, तर फिटनेसबद्दल आवड, सुदृढ शरीरियष्टी ही पहिली पात्रता म्हणता येईल. या क्षेत्रात करिअर करण्यासाठी बीपीएड व एमपीएड हे पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम राजमार्ग आहेत. त्यासोबतच मुंबईसारख्या महानगरांमध्ये काही संस्थांमार्फत फिटनेस संदर्भातील काही अभ्यासक्रम शिकवले जातात. मात्र शासनमान्य अभ्यासक्रम बीपीएड व एमपीएड या पदव्या अथवा पदव्युत्तर शिक्षणानंतर पीएच.डी. मिळवली तर आपल्याला खासगीसोबतच शासकीय क्षेत्रातही करीअरच्या अनेक संधी उपलब्ध असतात. फिटनेसमधील शास्त्रशुद्ध शिक्षण पूर्ण केल्यानंतर फिटनेस प्रशिक्षक म्हणून काम करता येते. त्यासोबतच विशेष प्रशिक्षक, खासगी प्रशिक्षक, जिम इन्स्ट्रक्टर, ॲरोबिक्स इन्स्ट्रक्टर, डाएटिशियन आणि स्पोर्ट्स प्रशिक्षक अशा अनेक पदावर काम करता येते. शिवाय शारीरिक शिक्षण, एखादा खेळ, योग, जिम्नॅस्टिक्स, ॲरोबिक्स इत्यादी विषयांपैकी एखादा आवडीचा विषय घेऊन त्यामध्ये विशेष प्रावीण्य (स्पेशलायझेशन) मिळवल्यास अधिक फायदा होतो.

**बीपीएड**

पात्रता : उमेदवार भारतीय नागरिक असावा. कुठल्याही शाखेची पदवी ५० टक्के गुणांसह आवश्यक. मागासवर्गांसाठी किमान ४५ टक्के गुणांची मर्यादा. उमेदवाराने आंतरमहाविद्यालयीन, विभागीय, जिल्हा तसेच शालेय स्पर्धेत भाग घेतलेला असावा. किंवा शारीरिक शिक्षण विषय अनिवार्य किंवा पर्यायी विषयी म्हणून निवडलेला कुठल्याही शाखेचा किमान ४५ गुण प्राप्त (मागासवर्गांसाठी ४० टक्के) पदवीधर. किंवा कुठल्याही शाखेचा ४५ टक्के (४० टक्के मागासवर्गांसाठी) गुण प्राप्त आणि किमान तीन वर्षांचा शारीरिक शिक्षण शिक्षक/प्रशिक्षक म्हणून काम केलेला पदवीधर.

**एमपीएड**

पात्रता : या अभ्यासक्रमासाठी उमेदवार हा भारतीय असावा. तसेच त्याने शारीरिक शिक्षण (बीपीएड) मध्ये किंवा समकक्ष अभ्यासक्रमात किमान ५० टक्के गुणांसह (मागासवर्गांसाठी ४५ टक्केपर्यंत) पदवी प्राप्त केलेली असावी. किंवा त्याने हेल्थ ॲण्ड फिजिकल एज्युकेशनमध्ये ५० टक्के गुणांसह बीएस्सी पदवी अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा. मागासवर्गांसाठी ४५ टक्केपर्यंत अट शिथिल करण्यात आली आहे.

प्रवेश : बीपीएड व एमपीएड या दोन्ही अभ्यासक्रमाला राज्य सामायिक प्रवेश परीक्षेमार्फत (सीईटीमार्फत) प्रवेश दिला जातो. मेरीट व आपण निवडलेल्या महाविद्यालयांचा प्राधान्यक्रम यानुसार प्रवेश दिला जातो.

शैक्षणिक शुल्क : राज्य शासन/शिक्षण शुल्क समिती किंवा विद्यापीठाने ठरवून दिलेले शुल्क.

प्राधान्य : शासकीय महाविद्यालय व विद्यापीठांमध्ये बीपीएड व एमपीएस प्रवेशासाठी होम युनिव्हर्सिटीतील उमेदवारांसाठी ६० टक्के, इतर विद्यापीठातील उमेदवारांसाठी २० टक्के, राज्याबाहेरील उमेदवारांसाठी १५ टक्के तर एनआरआय व विदेशी उमेदवारांसाठी ५ टक्के जागा राखीव ठेवल्या जातात. हेच प्रमाण विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये अनुक्रमे ६४, १६, १५ व ५ टक्के असे असते, तर शासकीय अनुदानित अल्पसंख्याक महाविद्यालयात हे प्रमाण अनुक्रमे १८, १२, १५, ५ टक्के असे असते व ५० टक्के जागा अल्पसंख्याकांसाठी राखीव असतात.

**अधिक माहितीसाठी...**

http://www.mahacet.org

अर्ज करण्यासाठी संकेतस्थळ : http://dhe.mhpravesh.in

**– राजाराम देवकर**

# व्यवसाय शिक्षण: रोजगाराची हमी





राज्यातील शासकीय व खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेंतर्गत व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रम पूर्ण करून औद्योगिक क्षेत्रात मोठ्या संख्येने उपलब्ध असणारे रोजगार मिळण्याची संधी आहे. राज्यातील एकूण ४१७ शासकीय आणि ४५४ खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून एकूण ७९ प्रकारच्या व्यवसाय अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण दिले जाते. यामध्ये अभियांत्रिकी, बिगर अभियांत्रिकी आणि मशीन गट अशा गटातील व्यवसाय अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

राज्यात व्यवसाय शिक्षणांतर्गत माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील व्यवसाय अभ्यासक्रम राबवले जातात. व्यवसाय प्रशिक्षणांतर्गत केंद्रशासन पुरस्कृत शिल्प कारागीर प्रशिक्षण योजना व शिकाऊ उमेदवारी योजना या प्रमुख योजना राबवण्यात येतात.

**औद्योगिक प्रशिक्षण संस्था**

राज्यात प्रत्येक तालुक्यात किमान एक शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) सुरू करण्यात आलेली आहे. त्यानुसार ३५९ तालुक्यात ४१७ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था कार्यरत असून त्यांची एकूण प्रवेश क्षमता जवळपास एक लाख आहे. त्यामध्ये आदिवासी भागात आदिवासींसाठी ६१ संस्था, अनुसूचित जाती व नवबौद्धांच्या मुलामुलींसाठी ४ उच्चस्तर संस्था, अल्पसंख्याकांसाठी स्वतंत्र २ संस्था व ४३ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये स्वतंत्र तुकड्या, महिलांसाठी १५ तर २८ आदिवासी आश्रमशाळा औद्योगिक प्रशिक्षण संस्था अशा संस्थांचा समावेश आहे. याचबरोबर राज्यात एकूण ४५४ खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था कार्यरत असून त्यांची प्रवेशक्षमता साधारणत: ४0000 इतकी आहे.

औद्योगिक प्रशिक्षण संस्था म्हणजे शासनामार्फत चालविल्या जाणाऱ्या अथवा शासन मान्यताप्राप्त खासगी संस्थाद्वारे शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेतंर्गत येणाऱ्या व्यवसायांमध्ये प्रशिक्षण देणाऱ्या, राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (एनसीव्हीटी) अथवा राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेची (एससीव्हीटी)संलग्नता प्राप्त असलेल्या राष्ट्रीय व्यवसाय प्रमाणपत्र अथवा राज्य व्यवसाय प्रशिक्षण परीषदेचे प्रमाणपत्र निर्गमित करणारी संस्था.

**७९ व्यवसाय अभ्यासक्रम**

राज्यातील एकूण ४१७ शासकीय व जवळपास तेवढ्याच संख्येच्या खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून एकूण ७९ प्रकारच्या व्यवसाय अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण दिले जाते. त्यात अभियांत्रिकी गटातील एक वर्ष कालावधीचे एकूण २३ व्यवसाय अभ्यासक्रम, दोन वर्ष कालावधीचे एकूण ३२ व्यवसाय अभ्यासक्रम, तसेच बिगर अभियांत्रिकी गटात एक वर्ष कालावधीचे २४ व्यवसाय अभ्यासक्रमांचा अंतर्भाव आहे. या व्यवसाय अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण डायरक्टरेट जनरल ऑफ ट्रेनिंग (डीजीटी), नवी दिल्लीने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमानुसार दिले जाते. अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण करून परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारास (डीजीटी), नवी दिल्लीकडून राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परीषदेकडून (एनसीव्हीटी) प्रमाणपत्र दिले जाते. या प्रमाणपत्रास आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता प्राप्त आहे.

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत विविध व्यवसाय अभ्याक्रमात प्रशिक्षण देताना या प्रशिक्षणासाठी

उपलब्ध पायाभूत सुविधेचा महत्तम विनियोग व्हावा व कुशल मनुष्यबळाचे प्रमाण वाढावे म्हणून राज्यात महापालिका क्षेत्रांतर्गत असलेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था तीन पाळीत व इतर संस्थामध्ये दोन पाळीत प्रशिक्षण दिले जाते.

**संकेतस्थळ**

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रवेशित उमेदवारांना http://admission.dvet.gov.in या संकेतस्थळवरून ऑनलाइन प्रवेशासाठी व अभ्यासक्रमाविषयी अधिक माहिती घेता येईल.

**प्रवेशाकरिता पात्रता**

उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (एसएससी) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ किंवा केंद्रीय परीक्षा मंडळा व्यतिरिक्त अन्य मंडळाकडून उत्तीर्ण झाला असेल तर त्याने महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाकडून तसे समकक्षता प्रमाणपत्र आसावे.

उमेदवाराचे निकालपत्र श्रेणीस्वरूपात असल्यास, अशा उमेदवारांनी श्रेणी व गुण यांची समकक्षता असलेले संबंधित मंडळाचे अधिकृत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

राष्ट्रीय मुक्त शाळेतील विज्ञान व गणित हा विषय नसलेले उमेदवार व अपंग शाळेतील उमेदवार अभियांत्रिकी व्यवसायासाठी पात्र नाहीत.

उमेदवाराने वयाची १४ वर्षे पूर्ण केलेली असावी. मेकॅनिक रिपेरींग ॲण्ड मेंटेनन्स ऑफ लाईट ॲण्ड हेवी मोटार व्हेहिकल, ड्रायव्हर कम मेकॅनिक, लाईट मोटर व्हेहिकल या व्यवसायांकरिता ३१ जुलै रोजी उमेदवाराचे वय १८ वर्षे पूर्ण असले पाहिजे.

कोणत्याही व्यवसायाच्या प्रवेशाकरिता कमाल वयोमर्यादेची अट नाही.

अनिवासी भारतीय उमेदवारांनी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाचे असे समकक्षता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**केंद्रीय प्रवेश प्रक्रिया**

राज्यातील शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत ऑगस्ट २०१५ पासूनची प्रवेश प्रक्रिया ही केंद्रीय ऑनलाइन प्रवेश पद्धतीने राबवण्यात येत आहे. ऑनलाइन स्वरूपात प्रवेश प्रक्रिया राबवणारे महाराष्ट्र हे देशातील प्रथम राज्य ठरले आहे.

**सत्र पद्धत**

एक ते दोन वर्षे कालावधीचे विविध व्यवसायांचे अभ्यासक्रम हे उद्योगधंद्यातील तज्ज्ञांनी बनवलेले असून ते बनवताना कारखान्यात वापरल्या जाणाऱ्या कौशल्यांचा विचार करण्यात आला आहे. प्रशिक्षण कालावधीत कारखान्यांना भेटी देणे, उद्योगधंद्यातील तज्ज्ञांचे व्याख्यान, कॅम्पस मुलाखती आयोजित करणे, प्रशिक्षण संपताच शिकाऊ उमेदवारी, नोकरी मिळवून देण्यासाठी मदत करणे यासारखे उपक्रम राज्यातील सर्वच संस्थामध्ये राबवले जातात. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर साधारणता १ ऑगस्ट ते ३१ जुलै या कालावधी दरम्यान प्रशिक्षण वर्ष असते.

**शिकाऊ उमेदवारीसाठी जागांची उपलब्धता**

विद्यार्थ्यांना पायाभूत प्रशिक्षण औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये दिल्यानंतर औद्योगिक आस्थापनेत वापरण्यात येणारी यंत्रसामग्री व तंत्र यांचे ज्ञान व कौशल्य प्राप्त करून सर्व दृष्टीने पूर्ण कुशल बनावा यासाठी शिकाऊ उमेदवारी योजना असून, शिकाऊ उमेदवारांना केंद्र शासनाने मंजूर केलेल्या दरानुसार प्रशिक्षण कालावधीमध्ये विद्यावेतन मिळते. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारांपेक्षा शिकाऊ उमेदवारीसाठी उपलब्ध जागा अधिक असल्याने प्रत्येक उत्तीर्ण उमेदवारांस रोजगाराची संधी उपलब्ध आहे.





### आवश्यक कागदपत्रे

- माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेची गुणपत्रिका.
- शाळा अथवा महाविद्यालय सोडल्याचे प्रमाणपत्र (अलीकडील शाळा / महाविद्यालय शिक्षण घेतलेले)
- उमेदवाराचे अधिवास प्रमाणपत्र
- उमेदवार मागास अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती प्रवर्गात असल्यास जाती प्रमाणपत्र
- उमेदवार विमुक्त जाती /भटक्या जमाती (अ), (ब), (क), (ड) इ.मा.व./ वि.मा.व. असल्यास जाती प्रमाणपत्र आणि पुढील वर्षी ३१ मार्चपर्यंत वैधता असलेले नॉन-क्रिमी-लेयर प्रमाणपत्र
- माजी सैनिक  आरक्षण घेत असाल तर संरक्षण सेवा प्रमाणपत्र/ उमेदवाराचे आई/वडील संरक्षण सेवेत कार्यरत होते व ते महाराष्ट्र राज्याचे अधिवास असल्याचे प्रमाणपत्र
- अपंग उमेदवार असल्यास अपंगत्वाचा प्रकार (पीडब्ल्यूडी १/ पीडब्ल्यूडी २/ पीडब्ल्यूडी ३), अपंगत्त्वाची टक्केवारी, कायमस्वरूपी अपंगत्व याबाबतचा स्पष्ट उल्लेख असलेले वैद्यकीय मंडळाचे प्रमाणपत्र
- तांत्रिक विषय घेतलेले विद्यार्थ्यांनी तांत्रिक विषयाचा उल्लेख असलेले माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्र

### अतिरिक्त गुणासाठी आवश्यक कागदपत्रे

- इंटरमिडीएट चित्रकला श्रेणी परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र
- एनसीसी/ एमसीसी/ स्काऊट गाईड/ सिव्हिल डिफेन्स गाइडचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र
- जिल्हा/ राज्य / राष्ट्रीय स्तरावर क्रीडा प्रकारांमध्ये सहभाग घेतलेला असल्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे खेळाचे प्रमाणपत्र
- शासन मान्यताप्राप्त महाराष्ट्रातील बोल्स्टर स्कूलमधून उत्तीर्ण असल्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र
- शासनमान्य अशासकीय संस्थांच्या महाराष्ट्रातील अनाथ आश्रमात वास्तव्यास असल्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र
- २०११ च्या जनगणनेमध्ये ग्रामीण भाग म्हणून नमूद करण्यात आलेल्या भागातून उमेदवाराने माध्यमिक शालांत परीक्षा दिलेली असल्यास.

### पदविका अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या वर्गात थेट प्रवेश

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील प्रशिक्षण पूर्ण केल्यावर उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांना पदविका अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या वर्गात थेट प्रवेश दिला जातो. अशा प्रकारे औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना रोजगार, स्वयंरोजगार, शिकाऊ उमेदवारी योजनेंतर्गत रोजगाराची संधी व उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध आहे.

### दिव्यांग उमेदवारांना आरक्षण

केंद्रीय प्रवेश पद्धतींतर्गत उपलब्ध जागांच्या ३ टक्के जागा प्रत्येक औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये अपंग उमेदवारांना आरक्षित असतील. अपंगाच्या आरक्षणाच्या दाव्यासाठी सादर केलेले अपंगत्वाचे प्रमाणपत्रात अपंगत्व कायमस्वरूपी असून त्याचे प्रमाण ४० टक्क्यांपेक्षा जास्त आहे, असा स्पष्ट उल्लेख असला पाहिजे.



### माजी सैनिकांच्या मुला/ मुलींकरिता आरक्षण

संरक्षण सेवेत कार्यरत असलेल्या अथवा संरक्षण सेवेतील माजी कर्मचारी / कर्मचाऱ्याचा पाल्यांकरिता केंद्रीय प्रवेश पद्धतींतर्गत प्रत्येक औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये १ टक्के जागा त्याची कमाल १० जागेच्या मर्यादेपर्यंत असतील. सर्व संरक्षण श्रेणी उमेदवारांचा गुणवत्तेनुसार एकत्रितरीत्या विचार करून संरक्षण सेवेतील कर्मचाऱ्यांच्या पात्रताधारक मुलांकरिता या १ टक्के जागा देण्यात येतात.

### अल्पसंख्याकाकरिता आरक्षित जागा

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये धार्मिक अल्पसंख्याक उमेदवाराकरिता आरक्षित निवडक तुकड्यामध्ये ७० टक्के जागा मुस्लिम, बौद्ध, ख्रिश्चन, शीख, पारशी व जैन धर्मातील विद्यार्थ्यांकरिता आणि 30 टक्के जागा खुल्या व मागासवर्ग श्रेणीमधील उमेदवारांकरिता राखून ठेवलेल्या आहेत. प्रत्येक अभ्यासक्रमाकरिता वर नमूद केलेल्या अल्पसंख्याक उमेदवाराकरिता ७० टक्के जागा राखून ठेवण्यात आल्या आहेत. (त्यापैकी प्रत्येक अल्पसंख्याक गटामध्ये 30 टक्के जागा महिलांकरिता राखून ठेवण्यात येतील) व 30 टक्के जागा सर्व अन्य खुल्या आणि मागास प्रवर्गातील उमेदवारांकरिता उपलब्ध असतील.

### गुणानुक्रम/गुणवत्ता यादी

महाराष्ट्रातील ज्या पात्र उमेदवारांची शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेंतर्गत येणाऱ्या व्यवसाय अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी केंद्रीय प्रवेश पद्धतीमधून शेवटच्या दिनांकापर्यंत ऑनलाइन अर्ज सादर करून प्रवेश निश्चित केले जातात. अशा प्रत्येक उमेदवाराला तात्पुरता गुणानुक्रम देण्यात येतो. यामध्ये माध्यमिक शालांत परीक्षा (इयत्ता १०वी) अथवा समतूल्य पात्रता परीक्षेत प्राप्त एकत्रित गुण हे गुणवत्ता ठरवण्यासाठी पायाभूत गुण मानण्यात येतात.

### अतिरिक्त गुण पद्धत

इंटरमिडीएट चित्रकला श्रेणी परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र (१० गुण), एनसीसी/ एमसीसी/ स्काऊट गाइड/ सिव्हील डिफेन्स गाइडचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र (१० गुण), जिल्हा/ राज्य / राष्ट्रीय स्तरावर क्रीडा प्रकारांमध्ये सहभाग घेतलेला असल्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे खेळाचे प्रमाणपत्र असल्यास (१०/१५/२५ गुण), शासन मान्यताप्राप्त महाराष्ट्रातील बोल्स्टर स्कूलमधून उत्तीर्ण असल्यास सक्षम

प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र (२० गुण), शासनमान्य अशासकीय संस्थांच्या महाराष्ट्रातील अनाथ आश्रमात वास्तव्यास असल्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र असल्यास (२० गुण), २०११ च्या जनगणनेमध्ये ग्रामीण भाग म्हणून नमूद करण्यात आलेल्या भागातून उमेदवाराने माध्यमिक शालांत परीक्षा दिलेली असल्यास (१० गुण) अशा गुणांचा अतिरिक्त गुण म्हणून समावेश करण्यात येतो.

### केंद्रीय प्रवेश प्रक्रियेचे टप्पे

केंद्रीय प्रवेश प्रक्रियेमध्ये सर्वसाधारण दहा टप्प्यांचा समावेश होतो. यामध्ये प्रामुख्याने माहिती पुस्तिका, ऑनलाइन अर्ज भरणे व अर्ज स्वीकृती केंद्रावर अर्ज निश्चित करणे, गुणवता यादी प्रसिद्ध करणे, प्रवेश फेरीसाठी पर्याय देणे, जागा वाटप करणे, संबधित औद्योगिक संस्थेत व्यक्तीश: हजर राहून प्रवेश निश्चित करणे, समुपदेशन फेरी, खाजगी औद्योगिक संस्था स्तरावरील प्रवेश, प्रवेशानंतरची कार्यवाही आदी बाबींचा समावेश आहे.

### महिलांकरिता शासकीय संस्था

महिलांसाठी सुरू करण्यात आलल्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था १५ आहेत. त्यापुढीलप्रमाणे दादर, ठाणे, रत्नागिरी, सोलापूर, औंध पुणे, नाशिक, जळगाव, औरंगाबाद, बीड, लातूर, अमरावती, अकोला, नागपूर, चंद्रपूर आणि भंडारा.

### आदिवासी उमेदवारांकरिता शासकीय संस्था

आदिवासी उमेदवारांकरिता सुरू करण्यात आलेल्या शासकीय प्रशिक्षण औद्योगिक संस्था राज्यात ६१ ठिकाणी आहेत. त्या पुढीलप्रमाणे पालघर, तलासरी, वाडा, विक्रमगड, मुरबाड, जव्हार, मोखाडा (जि. पालघर), वाणगाव, शहापूर, कर्जत (सर्व ठाणे जिल्ह्यातील), माणिकडोह (जिल्हा- पुणे), यावल, चोपडा (जिल्हा- जळगाव), राजुर (जिल्हा- अहमदनगर), किनवट (जि नांदेड), दिंडोरी, कळवण, सुरगाणा, पेठ, इगतपुरी, त्र्यंबकेश्वर, सटाणा (बागलाण), देवळा (जि. नाशिक), नंदुरबार, नवापुर, तळोदा, अक्राणी, अक्कलकुवा, शहादा (जिल्हा- नंदुरबार), पारशिवनी (जिल्हा- नागपूर), पिंपळनेर, शिरपुर (जिल्हा- धुळे), चिखलदरा, धारणी (जिल्हा- अमरावती), पांढरकवडा, आर्णि, राळेगांव, मारेगाव, कळंब (जिल्हा- यवतमाळ), देवरी, अर्जुनीमोरगांव, सालेकसा (जिल्हा- गोंदिया), गडचिरोली, आल्लापल्ली, देसाईगंज, भामरागड, कुरखेडा, आरमोरी, चार्मोशी, ऐटापल्ली, धानोरा,मुलचेरा, सिरोचा (जिल्हा-गडचिरोली), कोरची, भद्रावती, चिमुर, जिवती, राजुरा, कोरपणा, पोंभुर्णा, गोडपिंपरी (जिल्हा- चंद्रपूर).

## बारा औद्योगिक कंपन्यांशी सामजंस्य करार

कॉर्पोरेट सोशल रिसपॉन्सिबिलीटी अंतर्गत राज्यातील १२ विविध औद्योगिक आस्थापनेबरोबर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांबरोबर सामंजस्य करार करण्यात आले आहेत. बोश, सिमेनस, सिस्को, टाटा ट्रस्ट, व्होल्कस्वगॉन, मारुती सुजुकी, एसडीएन, जेएसडब्ल्यु, एचएएल, भारत डायनामिक लिमिटेड, सिंडलर आणि डाटा मोटर्स अशा कंपन्यांसोबत करार करण्यात आले आहेत. या कंपन्याच्यावतीने राज्यातील विविध औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शिक्षकांना प्रशिक्षण देणे, प्रशिक्षण केंद्र स्थापन करणे. व्हर्चुअल क्लासरूमचा वापर करताना आवश्यक सॉफ्टवेअर पुरवणे, तांत्रिक कौशल्याशी सुसंगत ब्रिज प्रशिक्षण देणे आदीबाबींचा पुर्तता या कंपनींच्या वतीने पुरवण्यात येणार आहेत.



### आदिवासी औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आश्रमशाळा)

राज्यात आदिवासी शासकीय आश्रमशाळा औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची एकूण - २८ आहेत. त्यापुढीलप्रमाणे, सुकापूर, शिर्वे (जिल्हा- नंदुरबार), बिजेपार (जिल्हा-गोंदिया), मवेशी, बेलदा (जिल्हा- नागपूर), हर्षी, आंतरगाव (जिल्हा- यवतमाळ), देवडा, मंगी (जिल्हा-चंद्रपुर), पाटोदा (जिल्हा- नांदेड), जामगांव (जिल्हा- बुलढाणा), नवापाडा (जिल्हा- धुळे), शेणवे, कारेगाव, डोंगरी (जिल्हा- ठाणे), कोर्ची, जांबिया, खमनचेरू, रामगड (जिल्हा- गडचिरोली), आसरबारी, मांडवी, जोंधनखेडा, ननाशी, बोरीपाडा, आंबूपाडा (जिल्हा- नाशिक), केळीकोतूळ, (जिल्हा- अहमदनगर), चिखलदरा, सुसर्दा (जिल्हा- अमरावती)

### अल्पसंख्याक उमेदवारांसाठी दोन संस्था

अल्पसंख्याक उमेदवारांसाठी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था या मुंबई उपनगर जिल्ह्यातील कुर्ला (नेहरूनगर) आणि मुंबई शहर जिल्ह्यातील मांडवी येथे आहे.

### अल्पसंख्याक उमेदवारांसाठी स्वतंत्र तुकड्या

अल्पसंख्याक उमेदवारांसाठी स्वतंत्र तुकड्या

## महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम

शालेय स्तरावरील शिक्षण अर्धवट सोडलेल्या व उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेऊ न शकलेल्या विद्यार्थ्यांसाठी रोजगार/स्वयंरोजगारास उपयुक्त महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाचे अल्पमुदतीचे अभ्यासक्रम राबवण्यात येत आहेत. सद्य:स्थितीत राज्यातील २५ शासकीय तंत्रमाध्यमिक शाळा/केंद्रांमधून ६ महिने ते २ वर्षे कालावधीचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबवण्यात येत आहेत.

६ महिने ते २ वर्षे या कालावधीचे (पूर्णवेळ व अर्धवेळ) एकूण ३१५ व्यवसाय अभ्यासक्रम राबवण्यात येत आहेत.

राज्यात मध्यम व मोठ्या औद्योगिक आस्थापनांची तसेच लघुउद्योगांची वाढ झाल्यामुळे कुशल कामगारांची गरज निर्माण झालेली आहे. त्याचबरोबर स्वयंरोजगाराच्या संधीसुद्धा उपलब्ध झालेल्या आहेत. त्याकरिता विविध क्षेत्रात कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देणे हा मंडळाचा प्रमुख उद्देश आहे.

शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या तसेच प्राथमिक व उच्च माध्यमिक शिक्षण अर्धवट सोडलेल्या विद्यार्थ्यांना तांत्रिक कौशल्ययुक्त करून रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येतात. या अभ्यासक्रमांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानानुसार बदल होत आहेत. तसेच औद्योगिक व सेवा क्षेत्रामध्ये असलेली तांत्रिक मनुष्यबळाची मागणी पूर्ण करण्यासाठी अभ्यासक्रमांची व्याप्ती वाढत आहे. अधिक माहितीसाठी http://www.msbve.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी.



राज्यातील ४३ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत उपलब्ध आहेत. मालेगाव, नांदगाव (जिल्हा-नाशिक), चोपडा, भुसावळ (जिल्हा-जळगाव), भिवंडी (जिल्हा- ठाणे), धुळे (जिल्हा- धुळे), अंबेजोगाई, परळीवैजनाथ, बीड (जिल्हा- बीड), औरंगाबाद, (जिल्हा-औरंगाबाद) रत्नागिरी (जिल्हा-रत्नागिरी,) कर्जत (जिल्हा- ठाणे), चंद्रपूर, बल्लारपूर (जिल्हा- चंद्रपूर) कराड (जिल्हा- सातारा), संगमनेर, श्रीरामपूर (जिल्हा- अहमदनगर), जालना (जिल्हा- जालना) हिंगोली, बसमतनगर(जिल्हा- हिंगोली), नांदेड (जिल्हा- नांदेड), लातूर, उदगीर (जिल्हा-लातूर), उस्मानाबाद, अकोला, अकोट (जिल्हा-अकोला), वाशिम, कारंजालाड (जिल्हा- वाशिम), यवतमाळ, पुसद (जिल्हा- यवतमाळ), नागपूर, कामठी (जिल्हा- नागपूर), औंध, औंध (मुलींची), पिंपरी चिंचवड (जिल्हा-पुणे), अमरावती, अचलपूर (जिल्हा- अमरावती), अंजनगाव, बुलढाणा, खामगाव (जिल्हा- बुलढाणा), परभणी (जिल्हा- परभणी), मलकापूर, शेगाव (जिल्हा- बुलढाणा).

**चार उच्चस्तर शासकीय संस्था**

अनुसूचित जाती व नवबौद्धांच्या मुलामुलींसाठी राज्यात नाशिक, औरंगाबाद, अमरावती आणि नागपूर या चार ठिकाणी उच्चस्तर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था कार्यरत आहेत.

**- गजानन पाटील**

| व्यवसाय अभ्यासक्रम | व्यवसाय अभ्यासक्रमाचा प्रकार | सत्र कालावधी |
|---|---|---|
| सुतारकाम | बिगर मशीन गट - अभियांत्रिकी व्यवसाय | २ |
| सरफेस ऑरनामेंटेशन टेकनिक्स (पूर्वीचे नाव - एम्ब्रॉयडरी अँण्ड निडल वर्क) | बिगर मशीन गट - अभियांत्रिकी व्यवसाय | २ |
| गवंडी | बिगर मशीन गट - अभियांत्रिकी व्यवसाय | २ |
| नळ कारागीर | बिगर मशीन गट - अभियांत्रिकी व्यवसाय | २ |
| रंगारी | बिगर मशीन गट - अभियांत्रिकी व्यवसाय | ४ |
| एस.सी.व्ही.टी - कॅबिनेट फर्निचर मेकर | बिगर मशीन गट - अभियांत्रिकी व्यवसाय | २ |
| एस.सी.व्ही.टी - जनरल फिटर कम मेकॅनिक | मशीन गट - अभियांत्रिकी व्यवसाय | २ |
| पत्रेकारागीर | मशीन गट - अभियांत्रिकी व्यवसाय | २ |
| संधाता | मशीन गट - अभियांत्रिकी व्यवसाय | २ |
| तारतंत्री | बिगर मशीन गट - अभियांत्रिकी व्यवसाय | ४ |
| सुईंग टेक्नोलॉजी (पूर्वीचे नाव - कटिंग अँण्ड सुईंग) | बिगर अभियांत्रिकी व्यवसाय | २ |

| व्यवसाय अभ्यासक्रम | व्यवसाय अभ्यासक्रमाचा प्रकार | सत्र कालावधी | पात्रता परीक्षेतील विषय |
|---|---|---|---|
| वास्तुशास्त्र सहाय्यक | बिगर मशीन गट - अभियांत्रिकी व्यवसाय | २ | विज्ञान आणि गणित कमीत कमी प्रत्येकी ४०% सह |
| अटेन्डंन्ट ऑपरेटर केमिकल प्लान्ट | बिगर मशीन गट - अभियांत्रिकी व्यवसाय | ४ | विज्ञान आणि गणित |
| बेकरी ॲण्ड कन्फेक्शनर | बिगर अभियांत्रिकी व्यवसाय | २ | लागू नाही |
| बेसिक कॉस्मॉटोलॉजी | बिगर मशीन गट - अभियांत्रिकी व्यवसाय | २ | लागू नाही |
| कॉम्पुटर हार्डवेअर ॲण्ड नेटवर्क मेन्टंनन्स | बिगर मशीन गट - अभियांत्रिकी व्यवसाय | २ | विज्ञान आणि गणित |
| कॉम्प्युटर ऑपरेटर ॲण्ड प्रोग्रॅमिंग असिस्टंट | बिगर मशीन गट - अभियांत्रिकी व्यवसाय | २ | लागू नाही |
| डेस्कटॉप पब्लिशिंग ऑपरेटर | बिगर अभियांत्रिकी व्यवसाय | २ | लागू नाही |
| डिजिटल फोटोग्राफर | बिगर अभियांत्रिकी व्यवसाय | २ | लागू नाही |
| ड्राफ्टस्मन सिव्हिल | बिगर मशीन गट - अभियांत्रिकी व्यवसाय | ४ | विज्ञान आणि गणित |
| ड्राफ्टस्मन मेकॅनिक | बिगर मशीन गट - अभियांत्रिकी व्यवसाय | ४ | विज्ञान आणि गणित |
| ड्रेस मेकिंग | बिगर अभियांत्रिकी व्यवसाय | २ | लागू नाही |
| विजतंत्री | बिगर मशीन गट - अभियांत्रिकी व्यवसाय | ४ | विज्ञान आणि गणित |
| इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक | बिगर मशीन गट - अभियांत्रिकी व्यवसाय | ४ | विज्ञान आणि गणित |
| इलेक्ट्रॉप्लेटर | बिगर मशीन गट - अभियांत्रिकी व्यवसाय | ४ | विज्ञान आणि गणित |
| फॅशन टेक्नोलॉजी | बिगर अभियांत्रिकी व्यवसाय | २ | लागू नाही |
| जोडारी (फिटर) | मशीन गट - अभियांत्रिकी व्यवसाय | ४ | विज्ञान आणि गणित |
| फूड ॲण्ड बेव्हरेज गेस्ट सर्व्हिस असिस्टंट | बिगर अभियांत्रिकी व्यवसाय | २ | लागू नाही |
| फूड प्रोडक्शन (जनरल) | बिगर अभियांत्रिकी व्यवसाय | २ | लागू नाही |
| फ्रंन्ट ऑफिस असिस्टंट | बिगर अभियांत्रिकी व्यवसाय | २ | लागू नाही |
| फ्रुट ॲण्ड व्हेजिटेबल प्रोसेसिंग | बिगर अभियांत्रिकी व्यवसाय | २ | विज्ञान आणि गणित |
| हेल्थ सॅनेटरी इन्सपेक्टर | बिगर अभियांत्रिकी व्यवसाय | २ | लागू नाही |
| हॉस्पिटल हाऊस कीपिंग | बिगर अभियांत्रिकी व्यवसाय | २ | लागू नाही |
| इन्फॉर्मेशन ॲण्ड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी सिस्टिम मेन्टेनंन्स | बिगर मशीन गट - अभियांत्रिकी व्यवसाय | ४ | विज्ञान आणि गणित |
| इन्स्ट्रूमेन्ट मेकॅनिक | बिगर मशीन गट - अभियांत्रिकी व्यवसाय | ४ | विज्ञान आणि गणित |
| इन्स्ट्रूमेन्ट मेकॅनिक केमिकल प्लान्ट | बिगर मशीन गट - अभियांत्रिकी व्यवसाय | ४ | विज्ञान आणि गणित |
| इंटेरिअर डेकोरेशन ॲण्ड डिझायनिंग | बिगर मशीन गट - अभियांत्रिकी व्यवसाय | २ | विज्ञान व गणित ४०% सह |
| यंत्रकारागीर | मशीन गट - अभियांत्रिकी व्यवसाय | ४ | विज्ञान आणि गणित |
| यंत्रकारागीर घर्षक | मशीन गट - अभियांत्रिकी व्यवसाय | ४ | विज्ञान आणि गणित |
| मेन्टेनन्स मेकॅनिक केमिकल प्लांन्ट | बिगर मशीन गट - अभियांत्रिकी व्यवसाय | ४ | विज्ञान आणि गणित |
| क्राफ्समन फूड प्रॉडक्शन (व्हेजेटेरियन) | बिगर मशीन गट - अभियांत्रिकी व्यवसाय | २ | लागू नाही |
| फाँड्रीमॅन | बिगर मशीन गट - अभियांत्रिकी व्यवसाय | २ | विज्ञान आणि गणित |
| मेकॅनिक ऑटो इलेक्ट्रिकल ॲण्ड इलेक्ट्रोनिक्स | बिगर मशीन गट - अभियांत्रिकी व्यवसाय | २ | विज्ञान आणि गणित |





| | | | |
|---|---|---|---|
| मेकॅनिक कंझुमर इलेक्ट्रॉनिक्स अप्लायन्स | बिगर मशीन गट – अभियांत्रिकी व्यवसाय | ४ | विज्ञान आणि गणित |
| मेकॅनिक डिझेल इंजिन | बिगर मशीन गट – अभियांत्रिकी व्यवसाय | २ | विज्ञान आणि गणित |
| मेकॅनिक मॅकेक्ट्रॉनिक्स | बिगर मशीन गट – अभियांत्रिकी व्यवसाय | ४ | विज्ञान आणि गणित |
| मेकॅनिक मशिन टुल मेंटनन्स | मशीन गट – अभियांत्रिकी व्यवसाय | ४ | विज्ञान आणि गणित |
| मेकॅनिक मेडीकल इलेक्ट्रॉनिक्स | बिगर मशीन गट – अभियांत्रिकी व्यवसाय | ४ | विज्ञान आणि गणित |
| मेकॅनिक मोटर वेहिकल | बिगर मशीन गट – अभियांत्रिकी व्यवसाय | ४ | विज्ञान आणि गणित |
| यांत्रिक प्रशितन व वातानुकुलित | बिगर मशीन गट – अभियांत्रिकी व्यवसाय | ४ | विज्ञान आणि गणित |
| मल्टीमीडीया ॲनिमेशन ॲण्ड स्पेशल इफेक्ट | बिगर अभियांत्रिकी व्यवसाय | २ | विज्ञान आणि गणित |
| ऑपरेटर ॲडव्हान्स मशिन टूल्स | मशीन गट – अभियांत्रिकी व्यवसाय | ४ | विज्ञान आणि गणित |
| फोटोग्राफर | बिगर अभियांत्रिकी व्यवसाय | २ | लागू नाही |
| फिजिकल टेक्निशियन | बिगर मशीन गट – अभियांत्रिकी व्यवसाय | २ | लागू नाही |
| प्लास्टिक प्रोसेसिंग ऑपरेटर | बिगर मशीन गट – अभियांत्रिकी व्यवसाय | २ | लागू नाही |
| मेकॅनिक कॉम्प्युटर हार्डवेअर | बिगर मशीन गट – अभियांत्रिकी व्यवसाय | ४ | विज्ञान आणि गणित |
| मेकॅनिक रिपेअर ॲण्ड मेंन्टेनन्स ऑफ लाइट वेहिकल | बिगर अभियांत्रिकी व्यवसाय | २ | लागू नाही |
| पम्प ऑपरेटर कम मेकॅनिक | बिगर मशीन गट – अभियांत्रिकी व्यवसाय | २ | विज्ञान आणि गणित |
| रबर टेक्निशियन | बिगर मशीन गट – अभियांत्रिकी व्यवसाय | २ | विज्ञान आणि गणित |
| एस.सी.व्ही.टी – आर्किटेक्चरल ड्रॉफ्समनशिप | बिगर मशीन गट – अभियांत्रिकी व्यवसाय | २ | विज्ञान आणि गणित |
| एस.सी.व्ही.टी – लघुलेखक (मराठी) | बिगर अभियांत्रिकी व्यवसाय | २ | मराठी |
| एस.सी.व्ही.टी – (पूर्वीचे नाव – स्टुवर्ड) | बिगर अभियांत्रिकी व्यवसाय | २ | लागू नाही |
| सेक्रेटरियल प्रॅक्टीस (इंग्रजी) | बिगर अभियांत्रिकी व्यवसाय | २ | इंग्रजी |
| मेकॅनिक रेडिओ ॲण्ड टेलेव्हिजन | बिगर मशीन गट – अभियांत्रिकी व्यवसाय | ४ | विज्ञान |
| स्टेनोग्राफी आणि सेक्रेटरियल असिस्टंट (इंग्रजी) | बिगर अभियांत्रिकी व्यवसाय | २ | इंग्रजी |
| सर्व्हेअर | बिगर मशीन गट – अभियांत्रिकी व्यवसाय | २ | विज्ञान आणि गणित |
| टेक्निशियन पॉवर इलेक्ट्रॉनिक्स सिस्टिम्स | बिगर मशीन गट – अभियांत्रिकी व्यवसाय | ४ | विज्ञान आणि गणित |
| टेक्सटाईल्स वेट प्रोसेसिंग टेक्निशियन | बिगर मशीन गट – अभियांत्रिकी व्यवसाय | ४ | विज्ञान आणि गणित |
| टूल ॲण्ड डाय मेकर (डाइझ ॲण्ड मोल्ड) | मशीन गट – अभियांत्रिकी व्यवसाय | ४ | विज्ञान आणि गणित |
| टूल ॲण्ड डाय मेकर (प्रेस टुल्स, जिग्ज आणि फिक्चर) | मशीन गट – अभियांत्रिकी व्यवसाय | ४ | विज्ञान आणि गणित |
| कातारी | मशीन गट – अभियांत्रिकी व्यवसाय | ४ | विज्ञान आणि गणित |
| विव्हिंग टेक्निशियन | बिगर मशीन गट – अभियांत्रिकी व्यवसाय | ४ | विज्ञान आणि गणित |
| प्री–प्रीपरेटर स्कूल मॅनेजमेन्ट असिस्टंट | बिगर अभियांत्रिकी व्यवसाय | २ | लागू नाही |
| मरिन फिटर | मशीन गट – अभियांत्रिकी व्यवसाय | ४ | विज्ञान आणि गणित |
| मेकॅनिक ॲग्रिकल्चरल मशिनरी | बिगर मशीन गट – अभियांत्रिकी व्यवसाय | ४ | विज्ञान आणि गणित |
| मेकॅनिक रिपेअर ॲण्ड मेन्टेनन्स ऑफ हेवी वेहिकल | बिगर मशीन गट – अभियांत्रिकी व्यवसाय | २ | विज्ञान आणि गणित |
| ट्रॅक्टर मेकॅनिक | बिगर मशीन गट – अभियांत्रिकी व्यवसाय | २ | विज्ञान आणि गणित |
| ऑफिस असिस्टंट कम कॉम्प्युटर ऑपरेटर | बिगर अभियांत्रिकी व्यवसाय | २ | लागू नाही |
| स्पिनिंग टेक्निशियन | बिगर मशीन गट – अभियांत्रिकी व्यवसाय | ४ | विज्ञान आणि गणित |

प्रेरणा

# आत्मविश्वास महत्त्वाचा...

ज्या विद्यार्थ्याला नागरी सेवेत प्रवेश करावयाचा आहे, त्याला विविध क्षेत्रातील घटनांची आवड असावी. त्याच्यासभोवती घडणाऱ्या घटनांबाबत तो जागरूक असावा. त्याच्याकडे देश आणि देशातील जनता याबाबत पुरेशी माहिती असावी. हे लक्षात घेऊनच मुलाखत मंडळ या प्रक्रियेत उमेदवाराच्या व्यक्तिमत्त्वातील विविध गुणवैशिष्ट्यांवर भर देते...

प्रशासकीय क्षेत्रात काम करण्यासाठी संबंधित उमेदवाराची वैयक्तिक पात्रता - मुलाखतीमध्ये उमेदवाराने पॅनल मेंबरना तो किंवा ती या पदासाठी अत्यंत योग्य उमेदवार आहे हे पटवून देणे आवश्यक असते. यावेळी उमेदवाराने आपण शिस्तबद्ध असून कोणतेही कार्य संघटितपणे करून घेऊ शकतो हे दर्शवणे आवश्यक असते.

उमेदवाराची मानसिक जागरूकता - उमेदवाराची समाजात घडणाऱ्या विविध घटनांबाबतची जागरूकता, जाणीव, इच्छाशक्ती, दृष्टिकोन आणि अभिक्षमता तपासली जाते. उमेदवाराची अभिक्षमता म्हणजे त्याला दिलेले उद्दिष्ट तो उपलब्ध साधनांच्या साहाय्याने वेळेच्या मर्यादेत राहून पूर्ण करू शकतो की नाही हे तपासले जाते.

आकलन क्षमता - उमेदवाराची आकलन क्षमता म्हणजे त्याला विचारलेला प्रश्न त्याला पूर्णपणे समजला आहे की नाही, त्या पाठीमागचा हेतू लक्षात घेऊन प्रतिसाद देणे आवश्यक असते. येथे प्रश्न म्हणजे परिस्थिती आणि उत्तर म्हणजे प्रतिसाद अशा पद्धतीने मुलाखतीला सामोरे गेल्यास आपली आकलन क्षमता योग्य असल्याचे दर्शविता येते. त्यामुळे मुलाखतीस सामोरे जाताना उमेदवाराने प्रश्न काळजीपूर्वक आणि नीट ऐकला पाहिजे.

स्पष्ट आणि तार्किक सादरीकरण - येथे स्पष्ट सादरीकरण म्हणजे एखादा विचार किंवा मुद्दा अतिशय सोप्या साध्या भाषेत प्रभावीपणे मांडताना मी एखाद्या घटनेचे परिणामकारक विश्लेषण करू शकतो हे उमेदवाराला कोठेतरी दर्शवायचे असते. प्रामाणिकपणा, स्पष्टवक्तेपणा आणि मी कोणाचे अनुकरण न करता स्वतः विचार करू शकतो. माझ्याकडे सर्जनशीलता आहे हे दर्शविणे येथे आवश्यक असते.

संतुलित विचार पद्धती - मुलाखतीमध्ये उमेदवाराला कोणतीही माहिती विचारण्याची शक्यता असते. कोणतेही उत्तर हे पूर्वग्रहदूषित असू नये. ते नेहमीच संतुलित, सकारात्मक आणि उपयुक्त स्वरूपाचे असावे. त्यातून उमेदवाराची सर्वांना बरोबर घेऊन जाण्याची वृत्ती स्पष्ट होते.

माहितीची सखोलता व विस्तार - उमेदवाराची ही क्षमता तपासण्यासाठी मुलाखत मंडळ उमेदवाराने त्याच्या अर्जात लिहिलेल्या विविध मुद्यावर प्रश्न विचारते. विशेषतः छंद, पदवीचे विषय, एक्स्ट्रा




करिक्युलर ॲक्टिव्हिटी यावरील प्रश्न हे उमेदवाराच्या ज्ञानाचा विस्तार तपासण्यासाठी असतात. उमेदवार बदलत्या समाज प्रवाहाशी जुळवून घेणारा आहे की नाही, अलीकडच्या काळातील घटनांबाबत तो पुरेसा सजग आहे की नाही हे पॅनेल तपासते.

सामाजिक सौहार्द आणि नेतृत्वक्षमता - अधिकाऱ्याला सामाजिक सौहार्दाचे भान ठेवून निर्णय घ्यावे लागतात. तसेच सामाजिक न्यायासाठी उपेक्षित घटकांचा विचार करावा लागतो. उमेदवार याबाबतीत जागरूक आहे हे त्याच्या उत्तरात कुठेतरी दिसणे आवश्यक असते.

बौद्धिक आणि नैतिक सत्यनिष्ठा - सत्यनिष्ठा ही उमेदवाराच्या सामाजिक आणि मानसिक जडणघडणीचे प्रतिबिंब असते. प्रशासनात काम करताना उमेदवार समाजासाठी कितपत योगदान देऊ शकतो हे तपासताना सत्यनिष्ठा महत्त्वाची ठरते. येथे उमेदवाराचा बौद्धिक निर्देशांक, सामाजिक कौशल्य, वैचारिक क्षमता आणि भावनिक स्थैर्य महत्त्वाचे ठरते.

देहबोली - उमेदवाराचा पोषाख, बैठक, नजर, चेहऱ्यावरील भाव आदी बाबींचा विचार करून संबंधित उमेदवार चांगला प्रशासकीय अधिकारी होऊ शकेल की नाही हे ओळखले जाते. मुलाखतीच्या विविध घटकांचा यशातील वाटा विचारात घेतल्यास देहबोलीचा त्यातील वाटा सुमारे ६० टक्के असतो, २० टक्के ज्ञान, तर २०टक्के संवादकौशल्य अशी सर्वसाधारण विभागणी असते. त्यामुळे देहबोलीद्वारे सकारात्मक दृष्टिकोन प्रदर्शित करण्यावर उमेदवाराने भर देणे महत्त्वाचे आहे.

संवाद कौशल्य - मुलाखतीत अत्यंत प्राथमिक व साधारण प्रश्न विचारले जातात. उमेदवारास उत्तर देण्यास पूर्ण वेळ देण्यात येतो. या मुलाखतीत कोणत्याही प्रश्नाचा क्रम पूर्व-निर्धारीत नसतो. उमेदवाराला स्वतः विषयी किंवा सामाजिक-आर्थिक-राजनैतिक-सांस्कृतिक विषयांवर विचार व्यक्त करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य दिली जाते.

### मुलाखतीची स्वयंतयारी

मुलाखत कोणत्या जागेसाठी आहे, त्या जागेचा तपशील काय, अपेक्षेप्रमाणे उमेदवाराची प्रतिमा काय असायला हवी, उमेदवार म्हणून आपण निश्चितपणे त्यामध्ये बसू शकतो का याचा विचार उमेदवाराने करावा.

- डॉ. आनंद पाटील



# सेवा आणि समाधान

नर्सिंग ही एका व्यावसायिक अभ्यासक्रमाची दिशा आहे. हा एक सेवाभावी व्यवसाय आहे. आपण करत असलेल्या कामाचे समाधान या क्षेत्रात समोरच्या व्यक्तीच्या (रुग्णाच्या) चेहऱ्यावर लगेच प्रकट होत असते.

विद्यार्थी १० वी किंवा १२ वीला असतानाच पुढील आयुष्याची गणिते सुरू होतात. मग कोणता अभ्यासक्रम निवडायचा हे ठरवावे लागते. अभ्यासक्रम निवडल्यानंतर फक्त तो पूर्ण करणे किंवा पदवी/पदविका घेणे एवढेच अपेक्षित नसते तर आयुष्यामधील व्यवसायाची कारकिर्द त्या कामात घालवायची असते. हा सर्व विचार करूनच नर्सिंग अभ्यासक्रम निवडणे ही बाब महत्त्वाची ठरते.

नर्सिंग क्षेत्रात करिअर करण्यासाठी एएनएम (एएनएम- ऑक्झिलरी नर्सिंग मिडवाईफरी) आणि जीएनएम (जीएनएम- जनरल नर्सिंग ॲण्ड मिडवाईफरी) असा अभ्यासक्रम उपलब्ध आहे.

एएनएम

हा अभ्यासक्रम दोन वर्षाचा असून महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलकडून या परीक्षा घेतली जाते.

वयोमर्यादा : प्रवेश घेण्याच्या वर्षी दिनांक ३१ डिसेंबर रोजी किमान वय वर्षे १७ पूर्ण आणि कमाल वय वर्षे ३५ पेक्षा जास्त नसावे.

शैक्षणिक अर्हता : कोणत्याही शाखेतील किमान बारावी उत्तीर्ण

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाची उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा १२ वी (१०+२) अथवा समतूल्य परीक्षा मंडळाची शासनमान्य संस्थेमधून कमीत कमी ४० टक्के गुणांनी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. मात्र मागासवर्गीय गटातील उमेदवारांच्या बाबतीत किमान ३५ टक्के गुणांनी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे .

वरीलप्रमाणे अर्हता परीक्षा जास्तीत जास्त तीन प्रयत्नात उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचा प्रवेशासाठी विचार केला जाईल परंतु अशा उमेदवारांच्या बाबतीत त्यांच्या प्रत्येक प्रयत्नांचे ५ गुण १२ वी (१०+२) अथवा समतूल्य परीक्षेच्या एकूण गुणातून कमी करण्यात येतील जे उमेदवार शासनमान्य विद्यापीठातून बीएस्सी पदवी किंवा एमएस्सी पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण असतील त्यांच्या बाबतीत १२ वी अथवा समतूल्य परीक्षेच्या एकूण गुणात ५ गुण वाढविण्यात येतील.

शासनाच्या प्रचलित नियमांनुसार मागासवर्गीयांचे आरक्षण लागू राहील. हा अभ्यासक्रम शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे राज्यातील १५ जिल्ह्यांमधील जिल्हा रुग्णालयामध्ये चालविला जातो. पंधरा जिल्ह्यातील प्रत्येक रुग्णालयातील नर्सिंग अभ्यासक्रमासाठी २० उमेदवारांना प्रवेश मिळू शकतो. शासकीय संस्थेमध्ये प्रवेश मिळालेल्या उमेदवारांना या अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर ( शासनास गरज भासेल तेव्हा) दोन वर्षे बंधपत्रित कालावधीसाठी शासन सेवा करण्याची संधी प्राप्त होते. शासकीय नियमानुसार आणि निधी उपलब्ध असल्यास प्रशिक्षणार्थींना विद्यावेतनही दिले जाते.

इच्छुक उमेदवारांनी जाहिरात आल्यानंतर विहित नमुन्यातील अर्ज भरावेत. अर्ज भरताना उमेदवारांनी १२ वीचे गुणपत्रक, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला, जातीचा दाखला, जात वैधता प्रमाणपत्र व रहिवासी प्रमाणपत्र (सक्षम प्राधिकाऱ्याकडून प्राप्त झालेले) ही प्रमाणपत्रे सोबत जोडावित. गुणवत्तेनुसार २० स्त्री उमेदवारांची निवड करण्यात येते. २० पैकी २

जागा या आशा स्वयंसेविकांसाठी राखीव ठेवण्यात येतात. मात्र अंगणवाडी कार्यकर्तीस प्राधान्य दिले जाते. आशा स्वयंसेविका उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्यारिक्त जागी खुल्या प्रर्वगातून गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येतो. उमेदवारांनी जिल्हानिहाय नेमून दिलेल्या कोट्याचा फायदा घेण्यासाठी आपापल्या जिल्ह्यातूनच प्रवेशासाठी अर्ज करावा.


**जीएनएम**

हा अभ्यासक्रम एकूण तीन वर्षाचा असून महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल कडून परीक्षा घेतली जाते.

वयोमर्यादा :- किमान वय वर्षे १७ पूर्ण व कमाल वय वर्षे ३५ पेक्षा जास्त नसावे एएनएम आणि एलएचव्ही उमेदवारांकरिता उच्च वयोमर्यादा लागू नाही.

विभागातर्फे राज्यातील २९ जिल्ह्यांमधील जिल्हा रुग्णालयामध्ये चालविला जातो. प्रत्येकी ५ उमेदवारांना प्रवेश मिळू शकतो. शासकीय संस्थेमध्ये प्रवेश मिळालेल्या उमेदवारांना हे प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर (शासनास गरज भासेल तेव्हा) दोन वर्षे बंधपत्रित कालावधीसाठी शासन सेवा करण्याची संधी प्राप्त होते शासकीय नियमानुसार आणि निधी उपलब्ध असल्यास प्रशिक्षणार्थींना विद्यावेतन दिले जाईल.

इच्छुक उमेदवारांनी जाहिरात आल्यानंतर विहित नमुन्यातील अर्ज भरावेत. अर्ज करताना उमेदवारांनी १२ वीची गुणपत्रक, शाळा/ कॉलेज सोडल्याचा दाखला, जातीचा दाखला, जात वैधता प्रमाणपत्र व रहिवासी प्रमाणपत्र (सक्षम प्राधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेले) ही प्रमाणपत्रे सोबत जोडावी.




शैक्षणिक अर्हता :- किमान बारावी उत्तीर्ण विज्ञान शाखेतील (भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र) उमेदवारांना प्राधान्य राहील. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाची उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा १२ वी (१०+२) अथवा समतूल्य परीक्षा मंडळाची शासनमान्य संस्थेमधून कमीत कमी ४० टक्के गुणांनी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. मात्र मागासवर्गीय गटातील उमेदवारांच्या बाबतीत किमान ३५ टक्के गुणांनी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे .

शासनाच्या प्रचलित नियमांनुसार मागासवर्गीयांचे आरक्षण लागू राहील . हा अभ्यासक्रम शासनाच्या सार्वजनिक आरोग्य

गुणवत्तेनुसार ५ स्त्री उमेदवारांची निवड करण्यात येते. यापैकी १ जागा आशा स्वयंसेविका व १ जागा एएनएम उत्तीर्ण उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात येतात.

आशा स्वयंसेविका उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या रिक्त जागी इमाव प्रर्वगातून व एएनएम उत्तीर्ण उमेदवार उपलब्ध न झाल्यास अनुसूचित जमाती प्रवर्गातून शैक्षणिक गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येतो.

**- भावना चौधरी**
(मुख्य प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा, सार्वजनिक आरोग्य विभाग)

## बीएसस्सी (नर्सिंग)

हा अभ्यासक्रम एकूण ४ वर्षाचा असून तो विद्यापीठांमार्फत चालवला जातो.

वयोमर्यादा :- किमान वय वर्षे १७ पूर्ण

शैक्षणिक अर्हता :- विज्ञान शाखेतील (भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र) मध्ये किमान बारावी ४५ टक्के गुणांनी उत्तीर्ण उमेदवारांना प्राधान्य राहील. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाची उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा १२ वी (१०+२) अथवा समतूल्य परीक्षा मंडळाची शासनमान्य संस्थेमधून कमीत कमी ४५ टक्के गुणांनी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यास शासकीय रुग्णालयात तसेच खाजगी रुग्णालयामध्ये साहाय्यक परिचारिका, परिचारिका, परिचारिका प्रशिक्षक अशा विविध पदांवर नोकरीची संधी हमखास उपलब्ध आहे.

अधिक माहितीसाठी http://www.maharashtranursingcouncil.org या संकेतस्थळाला भेट द्यावी.

# व्हा 'माध्यम'कार

सध्याचे युग हे माहितीयुग आहे. आल्विन टॉफलर या विचारवंताने म्हटल्याप्रमाणे कृषी, औद्योगिक या दोन युगानंतर आलेल्या 'माहिती युगात' ज्ञान हीच खरी संपत्ती बनली आहे. त्यामुळे माहितीचे ज्ञानात रुपांतर करणारी माध्यमे व त्यातील पत्रकार हे माहिती युगातील अत्यंत महत्त्वाचे घटक बनले आहेत. त्यामुळे माध्यम क्षेत्रात करिअरच्या अनेक संधी आहेत.

मागील तीन दशकात माध्यमांच्या क्षेत्राचा अफाट विस्तार झाला. भारतात झपाट्याने विकसित होत असलेल्या क्षेत्रात माध्यम आणि रंजन क्षेत्राचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. वार्षिक १३.९ टक्के विकासदराने या क्षेत्राची वाढ होत असल्याने माध्यम व रंजन उद्योग क्षेत्रातील उलाढाल २०१९ सालापर्यंत २००० अब्ज रुपयापर्यंत जाईल असे अपेक्षित आहे. यावरून या क्षेत्रातील वाढीचा धडाका आपल्या लक्षात येऊ शकेल.

### माध्यमांचा अफाट विस्तार

भारतात आजच्या घडीला ७० हजार वृत्तपत्रे आणि ८०० टेलिव्हिजन चॅनल्स आहेत. याशिवाय रेडिओ, सिनेमा, वेबपोर्टल, ऑनलाइन वृत्तपत्रे, मोबाइल न्यूज, इव्हेंट मॅनेजमेंट, सोशल मीडिया, जाहिरात, जनसंपर्क इत्यादी क्षेत्रेही विस्तारत आहेतच. त्याचबरोबर माध्यम संशोधन क्षेत्र, बाह्य प्रसिद्धी माध्यमे, प्रकाशन क्षेत्र, माहितीपट व चित्रपट क्षेत्र, जनसंपर्क क्षेत्र, शैक्षणिक क्षेत्र, भारत सरकार व विविध राज्य सरकारांच्या माहिती व जनसंपर्क यंत्रणा, कॉर्पोरेट क्षेत्र, शासकीय कार्यालये यात पत्रकारितेचे शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत.

### आवश्यक बाबी

पूर्वी केवळ हस्ताक्षर चांगले असले तरी पत्रकार होण्यासाठी पुरेसे असायचे. आता मात्र पत्रकारितेचा अभ्यासक्रम पूर्ण असणे, किमान दोन भाषांवर चांगले प्रभुत्व असणे, संगणक हाताळण्याचे चांगले ज्ञान असणे या तीन बाबी पत्रकारितेच्या क्षेत्रातील नोकरीसाठी अत्यावश्यक आहेत. पत्रकारितेच्या क्षेत्रात नोकरीच्या संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत आहेत. त्यामुळे पत्रकारितेचे शिक्षण देणारी महाविद्यालयेही वाढत आहेत. एकट्या मुंबई शहरात पत्रकारितेचे शिक्षण देणारी ८० पेक्षा अधिक महाविद्यालये आहेत. इतर शहरातील महाविद्यालयांची संख्याही वाढली आहे.



### जनसंपर्क

जनसंपर्क क्षेत्रात शासकीय, सहकार, शिक्षण, बँकिंग, कार्पोरेट क्षेत्र यासह सर्वच क्षेत्रात जनसंपर्क अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी, माहिती अधिकारी, जनसंपर्क सल्लागार यासारख्या पदांवर कार्य करण्याची संधी उपलब्ध होऊ शकते. केंद्र शासनाच्या प्रसार यंत्रणेत प्रवेश करण्यासाठी इंडियन इन्फॉर्मेशन सर्विसेस (आय.आय. एस.) ही स्पर्धा परीक्षा आहे. ही परीक्षा उत्तीर्ण झाल्यास प्रेस इफॉर्मेशन ब्युरो, रजिस्ट्रार ऑफ न्यूजपेपर्स, क्षेत्रीय प्रचार कार्यालय यासह विविध कार्यालयात महत्त्वाच्या पदांवर कार्य करता येते.

### व्यापक संधी

वृत्तपत्रांच्या खपाच्या बाबतीत भारत जगातील दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे. भारतात दररोज वृत्तपत्राचे १२ कोटींपेक्षा अधिक अंकांची दररोज विक्री होते, अशी आकडेवारी आहे. आपल्या महाराष्ट्रातही नव-नवी वृत्तपत्रे येत आहेत. पूर्वीपासून सुरू असलेल्या वृत्तपत्राच्या आवृत्ती वाढत आहेत. त्यामुळे वृत्तपत्र क्षेत्रात मोठ्या प्रमाणात करिअर संधी आहेत. या क्षेत्रात बातमीदार, उपसंपादक, विशेष प्रतिनिधी, ब्यूरो चीफ यासारखी पदे उपलब्ध असतात. स्वतःचे वृत्तपत्र सुरू करणे हेदेखील शक्य आहे. प्रत्येक वृत्तपत्राच्या ऑनलाइन आवृत्ती निघू लागल्या आहेत, त्यातही कंटेट एडिटर होता येते. वृत्तपत्रात इव्हेंट मॅनेजमेंट हा स्वतंत्र विभाग सुरू झालेला आहे. त्यातही इव्हेंन्ट मॅनेजर व इतर पदावर काम करण्याची संधी मिळू शकते. छायाचित्र पत्रकार हे पदही उपलब्ध असते. मॅगझिन जर्नालिजमचे क्षेत्रही नव्याने भरारी घेत आहे. या क्षेत्रातही उपसंपादक व इतर पदावर काम करता येते. प्रकाशन व्यवसाय क्षेत्रातही उपसंपादक, संपादक, लेखक, चरित्र लेखक म्हणून कार्य करता येते.

### आकाशवाणी

रेडिओच्या क्षेत्रात एफ.एम.च्या विस्ताराचा तिसरा टप्पा सुरू आहे. त्यामुळे एक लाखापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या प्रत्येक शहरात एफ.एम. रेडिओचे केंद्र असणार आहे. त्यामुळे या क्षेत्रातील नोकरीच्या संधी मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. रेडिओ जॉकी, निवेदक, वृत्त निवेदक, वृत्त संपादक, ड्युटी ऑफिसर, कार्यक्रम अधिकारी, केंद्र संचालक यासारख्या पदांवर काम करण्याची संधी प्राप्त होऊ शकते.

### दूरचित्रवाहिन्यांतील संधी

टेलिविजन क्षेत्रातही नोकरीच्या भरपूर संधी आहेत. यात स्ट्रींजर, अँकर, कंटेंट एडिटर, जिल्हा प्रतिनिधी यासह विविध पदावर नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत. चित्रपट क्षेत्रात चित्रपट समीक्षक, पटकथा लेखक, चित्रपट प्रसिद्धी अधिकारी, चित्रपट दिग्दर्शक, लघुपट व माहितीपट तयार करणे यासारखी कामे करण्याची संधी मिळू शकते.

### जाहिरात क्षेत्र

जाहिरात क्षेत्रात जाहिरात लेखक,जाहिरात प्रतिनिधी, जाहिरात व्यवस्थापक, जाहिरात सल्लागार, माध्यम खरेदी व्यवस्थापक,इत्यादी पदांवर कार्य करण्याची संधी लाभू शकते. स्वतःची जाहिरात संस्था सुरू करणेही सहज शक्य आहे. रेडिओसाठी, टेलिव्हिजनसाठी, इंटरनेटसाठी, होर्डिंगसारख्या बाह्य प्रसिद्धी माध्यमासाठीही जाहिराती तयार करण्याची संधी मिळू शकते.

### वेब मीडियातील संधी

स्मार्टफोन युजर्सची संख्या झपाट्याने वाढत असल्याने वेब मीडियामध्ये करिअरच्या अनेक संधी उपलब्ध होत आहेत. आज जवळपास सर्वच राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील दैनिके वेबपोर्टल आणि अॅपद्वारे वाचकांपर्यंत पोहोचवण्यात येत आहेत. त्यामुळे कमी खर्चात जास्तीत जास्त लोकांपर्यंत ही माध्यमे पोहोचत आहेत. त्यातूनच वेबपोर्टल आणि न्यूज अॅपमध्ये करिअरच्या अनेक संधी उपलब्ध होत आहेत. न्यूज अॅप, न्यूज साईट, युट्यूब चॅनेल, सोशल मीडिया, डिजिटल मार्केटींग, ऑनलाइन ऍडव्हरटायजिंग, गुगल अॅडव्हर्टायजिंग, युट्यूब अॅडव्हर्टायजिंग, बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये कंटेट एडिटर म्हणून अनेक रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. सोशल मीडिया मार्केटिंगसाठी कंटेंट एडिटर हवे असतात. त्यामध्ये फेसबूक पेज, ट्विटर अकाऊंटन्ट, सोशल इमेज बिल्डींग करण्यासाठी माध्यम क्षेत्रातील पदवीधरांना प्राधान्याने संधी दिली जाते. अॅप क्षेत्रात सध्या, डेली हंट, न्यूज हंट, वे टू ऑनलाइन यांसारखे बहुभाषिक अॅप आहेत. यामध्ये कंटेंट एडिटर म्हणून संधी उपलब्ध आहेत. तर शॉर्टन्यूज अॅप क्षेत्रात रिलायन्ससारखा ग्रुपही उतरत असल्याने नोकरीच्या संधी वाढणार आहेत.

माध्यमाचे शिक्षण व संशोधन क्षेत्रातही नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत. बॅचलर ऑफ जर्नालिझम, बॅचलर ऑफ मीडिया मॅनेजमेंट, एम.ए.मास कम्युनिकेशन यासारखे अभ्यासक्रम प्रत्येक शहरात उपलब्ध आहेत. माध्यमाच्या क्षेत्रात चांगले करिअर करू इच्छिणाऱ्यांनी एम.ए. मास कम्युनिकेशन हा अभ्यासक्रम पूर्ण करणे हितावह ठरते.




### विशेषीकरणाचे युग

आजच्या काळात वृत्तपत्राचा वाचक, रेडिओचा श्रोता, टीव्हीचा दर्शक बदललेला आहे. त्यामुळे त्यांच्या अपेक्षांची व गरजांची पूर्तता करणारी पत्रकारिता करणे अवघड बनले आहे. आता बातमी देताना अत्यंत कमी वेळात, सखोल, अचूक, इतरांपेक्षा वेगळी बातमी द्यावी लागते. त्यासाठी त्या क्षमतेचे पत्रकार निर्माण होणे गरजेचे असते. नेमके प्रश्न विचारता येणे, शोधक दृष्टी असणे, तर्क लढवता येणे व विश्लेषण करता येणे आवश्यक असते. आता विशेषीकरणाचे युग आहे, त्यामुळे पर्यावरण, शेती, उद्योग, उर्जा, शिक्षण, राजकारण, सहकार, गुन्हेगारी वृत्त, न्यायालयीन वृत्त, आंतरराष्ट्रीय राजकारण, वित्त, संरक्षण अशा कोणत्यातरी एका विषयात सखोल अभ्यास असणाऱ्या पत्रकाराला सर्वत्र मागणी असते. पी. साईनाथ यांना केवळ भारतातच नव्हे, तर जगभरात महत्त्व दिले जाते कारण ग्रामीण भारताशी संबंधित समस्यांचा पूर्ण अभ्यास त्यांनी केला आहे. पत्रकारितेत करिअर करणाऱ्याने कुठल्या तरी एका विषयाबाबत सखोल ज्ञान मिळवणे उपयुक्त ठरते. हे क्षेत्र आव्हानात्मक आणि तेजोवलय लाभलेले आहे. उच्चपदस्थ राजकारणी, समाजकारणी, अधिकारी, चित्रपट कलावंत, साहित्यिक, शास्त्रज्ञ इत्यादींच्या सतत संपर्कात राहण्याची संधी पत्रकारांना मिळते.


**– डॉ.रवींद्र चिंचोलकर**

(सोलापूर विद्यापीठमध्ये पत्रकारिता विभागाचे प्रमुख.)
संपर्क: ०९८६००९१८५५

# फाइन आर्ट : फाइन करिअर



फाइन आर्ट अर्थात ललितकला क्षेत्रात ज्यांच्याकडे कौशल्य आहे त्यांना यशाची सर्व शिखरे पार पाडायला वयाची आणि काळाची गरज भासत नाही. संपूर्ण भारतात केवळ महाराष्ट्रात मुंबई येथे शासनाचे कला संचालनालय आहे. या कला विभागांतर्गत ललितकला प्रकारातील बहुविध अभ्यासक्रम हे व्यक्तीला स्वावलंबी बनवणारे आहेत.

कला विभागांतर्गत ललितकला प्रकारांतील बहुविध अभ्यासक्रम हे व्यक्तीला स्वावलंबी बनवणारे आहेत. या अभ्यासक्रमांची माहिती संक्षेपाने देण्यापूर्वी, इच्छुक उमेदवार, काय काय पदनामाने ओळख निर्माण करू शकतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

**फ्री-लान्स**

एमबीबीएस होणाऱ्या उमेदवारास डॉक्टर ही उपाधी लागते वा एमई तसेच तत्सम शिक्षण घेणाऱ्या उमेदवारास 'इंजिनियर' म्हणून ओळख मिळते. कला क्षेत्रात असं नाहिए. जीएआर्ट, बीएफए, एमएफए या पदविका, पदव्या वा पदव्युत्तर पदव्या धारण करणाऱ्या उमेदवारास केवळ आर्टिस्टट म्हणूनच ओळख निर्माण होत नाही तर त्या उमेदवारास पेंटर, इलस्ट्रेटर (रेखांकनकार); फोटोग्राफर; स्टील फोटोग्राफर (स्थीर चित्रण छायाचित्रकार); मुव्ही फोटोग्राफर; मॉडेल फोटोग्राफर; प्रोडक्डिझायनर; कॅरक्टर आर्टिस्ट; कला समिक्षक; कॉपीरायटर; पोर्ट्रेट आर्टिस्ट; मेटल आर्टिस्ट; शिल्पकार; मूर्तीकार; प्रिंट मेकर; कार्टुनिस्ट (व्यंगचित्रकार); अर्कचित्रकार (कॅरिकेचर आर्टिस्ट); कॅलेंडर आर्टिस्ट; कव्हरपेज आर्टिस्ट (मुखपृष्ठकार); स्टेज डिझायनर; पेपर स्कल्प्टर; फॅशन डिझायनर; कटिंग-पेस्टिंग आर्टिस्ट; ज्वेलरी डिझायनर; डायमंड कटिंग आर्टिस्ट; फिल्म फोटो डिझायनर; सेट डिझायनर; मशिन डिझायनर; बुक डिझायनर; पेज डिझायनर; वेब आर्टिस्ट हुश्श..!! अशा विविध नामाभिदानाने व्यक्तीस स्वतःची ओळख निर्माण करता येते. हे झालं स्वतंत्र ओळख निर्माण झालेलं फ्री-लान्स काम. आता या कला शिक्षण झालेल्या उमेदवारास कॉर्पोरेट क्षेत्रात कुठे-कुठे संधी आहेत ते पाहणंही इच्छुकांस मार्गदर्शक ठरेल अशी खात्री आहे.

**कॉर्पोरेट क्षेत्रातील संधी**

विविध कला महाविद्यालयांमध्ये कला अध्यापक, जाहिरात संस्थांमध्ये कॉपी एक्झिक्युटिव्ह, क्रिएटिव्ह व्हिज्युलायझर, आर्टिस्ट, कॉम्प्युटर आर्टिस्ट, ले-आऊट आर्टिस्ट, सिम्बॉल डिझाईनर, आऊट डोअर आर्टिस्ट. विविध टिव्ही चॅनल्ससाठीचे ग्राफिक आर्टिस्ट्स, विविध कंपनी-इंडस्ट्रिजमध्ये, फिल्म इंडस्ट्रिज, स्टुडिओज, विविध प्रेस, दैनिके, निमेशन एजन्सीज-स्टुडिओज, हॉस्पिटल्समधील आर्ट डिपार्टमेंट्स-एक्स-रे विभाग, इंटेरिअर डिझायनर्स, टेक्सटाइल इंडस्ट्रिज, आऊट डोअर ॲडव्हर्टायझर्स, बदांशी शासकीय, निमशासकीय कार्यालये, विविध उत्पादक कंपन्या, पॅकेजिंग इंडस्ट्रिज अशा विविध क्षेत्रात कला पदवीधारकांस नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत.

**विविध कला अभ्यासक्रम**

अशा या बहुविध कला अभ्यासक्रमांमध्ये किती आणि कोणकोणते कोर्सेस आहेत? या प्रश्नाचे उत्तरदेखील उत्सुकता आणि उत्साह वाढविणारे आहे. जी.डी.आर्ट नावाने परिचित असलेली पदविका १० वी नंतर पाच वर्षात पूर्ण करता येते. बी.एफ.ए. (बॅचलर ऑफ फाइन आर्ट) हा पदवी अभ्यासक्रम १२ वी (कुठलीही शाखा) उत्तीर्णास चार वर्षात पूर्ण करता येतो. याशिवाय आर्ट टीचर डिप्लोमा





(ए.टि.डी.), डी.ए.एड. (डिप्लोमा इन.आर्ट एज्युकेशन), ए.एम.(आर्ट मास्टर) असे एक आणि दोन वर्षाचे तसेच अंशकालीन अभ्यासक्रम या क्षेत्रात शिकवले जातात. या सर्व अभ्यासक्रमांची सविस्तर माहिती कलासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई येथे ०२२-२२६२०२३१/२ या दूरध्वनीवर संपर्क साधून मिळवता येईल.

या अभ्यासक्रमांमध्ये प्लाईड आर्ट (उपयोजित कला); पेंटिंग ड्रॅईंग; स्कल्पचर (मूर्ती-शिल्पकला); फोटोग्राफी (छायाचित्रण) ; दृश्यकला; आर्किटेक्चर (वास्तु रचना); टेक्सटाइल वेविंग; फॅब्रिक; निमेशन; निमेशन फिल्म मेकींग; डिजिटल निमेशन; डिजिटल फोटोग्राफी; निमेशन थ्रीडी; फॅशन डिझाईन; इंटेरिअर डिझाईन; ॲडव्हर्टायझिंग; मार्केटिंग; कम्युनिकेशन आर्ट; कॉपी रायटिंग; एडिटिंग अशा अनेक विषयांसह ऐच्छिक विषय किंवा स्वतंत्र विषय घेऊन कलाशिक्षण पूर्ण करून स्वावलंबी होता येते. कॉर्पोरेट जगताच्या गरजेप्रमाणे या क्षेत्रात वाट शोधता येते.

**कलासंस्था**

कलासंचालनालयांतर्गत ४ शासकीय, ३१ शासनमान्य अनुदानित आणि सुमारे दीडशे शासनमान्य विनाअनुदानित कलासंस्था कार्यरत असून इतर शिक्षणाच्या शैक्षणिक शुल्काच्या तुलनेत या कला शिक्षणासाठी खुल्या प्रवर्गास रु.७००० तर आरक्षित प्रवर्गास रु.४५००च्या दरम्यान वार्षिक शैक्षणिक शुल्क आहे. या संस्थांव्यतिरिक्त खाजगी, अभिमत विद्यापीठांतर्गत असलेली आणि विश्वस्तांमार्फत चालवण्यात येणारी महाराष्ट्रात सुमारे २० ते २५ कला महाविद्यालये आहेत. त्यांची माहिती ही वरील दूरध्वनीवरून सी.ई.टी. (कॉमन एन्ट्रन्स टेस्ट) विभागाकडे एक्स्टेशन मागून चौकशी करता येते. कारण चार शासकीय आणि उर्वरित वर उल्लेखलेल्या कॉलेजमध्ये प्रवेश घेण्यासाठी सदर सी.ई.टी. परीक्षा दरवर्षाच्या मे मध्ये राज्यातील सर्व विभागांमध्ये घेण्यात येते. ती माहिती ०२२-२२६३२०६३ या दूरध्वनी नंबरवर उपलब्ध होऊ शकेल.

**यशस्वी चेहरे**

या क्षेत्रातून पुढे आलेल्या नामवंत व्यक्तिमत्त्वांमध्ये ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर, ज्येष्ठ गायक सुदेश भोसले, व्यंगचित्रकार राज ठाकरे, छायाचित्रकार उद्धव ठाकरे, सतिश पुळेकर, पुरुषोत्तम बेर्डे, राज कांबळे अशा एक नव्हे हजारो डायमंड-आयकॉन्सस ची नावे लिहिण्याचे ठरवले, तर पेनाची शाई कमी पडेल.

एकूणच हे क्षेत्र आकाशाहून विशाल आणि हिमालयाहून उंच आहे. काम करण्याची जिद्द नावीन्य शोधण्याची कला, अथक परिश्रमाची मानसिक तयारी आणि आवडनिवड बाजूला ठेवून निरीक्षण या चतु:सूत्रींवर व्यक्तिमत्त्वातील सुप्त कलाकारास मूर्त स्वरूपात साकारायला लावणारी ही कला आहे.

आय.टी. आणि डिजिटलायझेशनच्या युगात अनेक गोष्टी एकसारख्या बनवता येतील. मात्र कलाकाराची कल्पनाशक्ती आणि प्रतिभाशक्ती मात्र एकमेवच राहतील. त्यांचं डिजिटलायझेशन नाही करता येणार म्हणून या कलासाधकांना युनिकच म्हणावे लागेल!!

**- गजानन सिताराम शेपाळ**

(वरिष्ठ अधिव्याख्याता सर ज.जी.उपयोजिक कला महाविद्यालय, फोर्ट, मुंबई.)

संपर्क: ०८१०८०४०२१३



# कृषी कौशल्य

ग्रामीण भागातील कृषी संबंधित रोजगार निर्मितीसाठी कौशल्य विकास व रोजगाराच्या संधी यासाठी तांत्रिक प्रशिक्षण ही काळाची गरज आहे. राज्यातील चारही कृषी विद्यापीठांमार्फत कृषिसंबंधित स्वयं रोजगार निर्मितीसाठी विविध प्रकारचे व्यवसाय अभ्यासक्रम राबवले जातात.

भारत हा कृषिप्रधान देश असून, भारतातील ६५ टक्के लोकसंख्या कृषी व कृषी संबंधित क्षेत्रावर अवलंबून आहे. राज्यातील चारही कृषी विद्यापीठांमार्फत अशिक्षित आणि शिक्षित सर्वच प्रकारच्या ग्रामीण युवकांसाठी व्यावसायिक अभ्यासक्रमांची रचना केली आहे. या अभ्यासक्रमांचा लाभ घेऊन ग्रामीण भागातील युवक स्वयं रोजगाराच्या दिशेने वाटचाल करू शकतात. कृषी क्षेत्रात काम करू इच्छिणाऱ्या सर्वच प्रकारच्या युवकांना देखील या व्यावसायिक अभ्यासक्रमांचा लाभ घेता येतो.



विद्यापीठनिहाय कोणकोणते अभ्यासक्रम राबवले जातात.

याबाबतची थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे:

**कृषी पदवी अभ्यासक्रम**

राज्यात चार कृषी विद्यापीठांमध्ये दहा विद्याशाखांमध्ये पदवी अभ्यासक्रम शिकविण्यात येतो. या अभ्यासक्रमाची १८९ महाविद्यालये सध्या कार्यरत आहेत.

**कौशल्यावर आधारित कृषी व्यवसाय अभ्यासक्रम**

**डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला**

| अभ्यासक्रमाचे नाव | कालावधी | प्रवेश क्षमता | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| कृषी तंत्रज्ञान पदविका (२८ विद्यालये/ ६० विद्यार्थी प्रती विद्यालय) | ३ वर्षे | १६८० | १० वी उत्तीर्ण<br>१२ वी असल्यास थेट दुसरे वर्षात प्रवेश |
| कृषी पदविका (१५ विद्यालये/ ६० विद्यार्थी प्रती विद्यालय) | २ वर्षे | ९०० | १० वी उत्तीर्ण |
| सेंद्रीय शेती प्रमाणपत्र अभ्यासक्रम (२०१० पासून सुरू) | ६ महिने | 30 | कोणत्याही शाखेतील १२ वी पास किंवा कृषी पदविका |

**महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी**

| अभ्यासक्रमाचे नाव | कालावधी | प्रवेश क्षमता | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| कृषी तंत्रज्ञान पदविका (५१ विद्यालये/ ६० विद्यार्थी प्रती विद्यालय) | ३ वर्षे | ३०६० | १० वी उत्तीर्ण १२ वी असल्यास थेट दुसऱ्या वर्षात प्रवेश |
| कृषी पदविका (४० विद्यालये/ ६० विद्यार्थी प्रती विद्यालय) | २ वर्षे | २४०० | १० वी उत्तीर्ण |
| कल्टीव्हेशन ऑफ व्हेजिटेबल अँड फ्लॉवर विंड पॉलिहाऊस | ६ महिने | ६० | कृषी पदविका |
| मशरूम प्रॉडक्शन टेक्नॉलॉजी (प्रत्येक महिन्याचा तिसरा शनिवार) | १ दिवस | 30 | कृषी पदविका |
| बेकरी प्रॉडक्शन | १ महिना | 30 | कृषी पदविका |
| काटेकोर शेती विकास केंद्र | ३ दिवस | 30 | कृषी पदविका |

**वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी**

| अभ्यासक्रमाचे नाव | कालावधी | प्रवेश क्षमता | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| कृषी तंत्रज्ञान पदविका (33 विद्यालये/ ६० विद्यार्थी प्रती विद्यालय) | ३ वर्षे | १९८० | १० वी उत्तीर्ण<br>१२ वी असल्यास थेट दुसऱ्या वर्षात प्रवेश |
| कृषी पदविका (२१ विद्यालये/ ६० विद्यार्थी प्रती विद्यालय) | २ वर्षे | १७४० | १० वी उत्तीर्ण |
| माळी प्रशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम (२ विद्यालये- परभणी-30 व औरंगाबाद-४०) | १ वर्ष | ७० | ९ वी उत्तीर्ण |
| रेशीम उद्योग | ७ दिवस | ६० | १० वी उत्तीर्ण |
| शेळी पालन | ३ दिवस | 30 | १० वी उत्तीर्ण |
| सोयाबीन प्रक्रिया उद्योग | ४ दिवस | 30 | १० वी उत्तीर्ण |
| दालमिल व्यवस्थापन | ४ दिवस | ५० | १० वी उत्तीर्ण |

प्रेरणा

महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत ७२, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत ३५, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत ५४ आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली अंतर्गत २८ अशी विद्यापीठनिहाय महाविद्यालये आहेत. पदवी अभ्यासक्रम चार वर्षे कालावधीचा असून या महाविद्यालयांमध्ये प्रथम वर्षात १४१२७ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो. कृषी, उद्यानविद्या, वनशास्त्र, मत्स्यशास्त्र, कृषी अभियांत्रिकी, अन्नतंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान, पशुसंवर्धन, कृषी व्यवसाय व्यवस्थापन, गृहविज्ञान अशा दहा विद्याशाखा आहेत.

कृषी विद्याशाखेची १५, उद्यानविद्या शाखेची १५, वनशास्त्र विद्याशाखेची २, मत्स्यशास्त्र विद्याशाखेचे १, अन्नतंत्रज्ञान विद्याशाखेची २७, जैवतंत्रज्ञान विद्याशाखेची १८, पशुसंवर्धन विद्याशाखेचे १, कृषी अभियांत्रिकी विद्याशाखेची ११, गृहविज्ञान विद्याशाखेचे १ , कृषी व्यवसाय व्यवस्थापन विद्याशाखेची १३ महाविद्यालये कार्यरत आहेत.

**अभ्यासक्रमास आवश्यक पात्रता**

कृषी, उद्यानविद्या, वनशास्त्र, मत्स्यशास्त्र, अन्नतंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान, पशुसंवर्धन या पदवी अभ्यासक्रमांमध्ये प्रवेशाकरिता इयत्ता १२ वी (विज्ञान) उत्तीर्ण (भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र आणि इंग्रजीसह) अशी पात्रता आहे.

- कृषी अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता इयत्ता १२ वी (विज्ञान) उत्तीर्ण (भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित आणि इंग्रजीसह) अशी पात्रता आहे.



- कृषी व्यवसाय व्यवस्थापन पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता इयत्ता १२ वी (विज्ञान) उत्तीर्ण (भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि इंग्रजीसह) अशी पात्रता आहे.
- पात्रता – गृहविज्ञान पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता इयत्ता १२ वी उत्तीर्ण (कला / वाणिज्य/विज्ञान इंग्रजीसह)

अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्यासाठी महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी (http://dbskkv.org), डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली (http://mpkv.ac.in), डॉ. पंजाबराव देशमुख कृषर विद्यापीठ, अकोला (https://www.pdkv.ac.in), वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ, परभणी ( http://www.vnmkv.ac.in) संकेतस्थळाला भेट द्यावी. तसेच विद्यापीठाकडून वेळोवेळी स्थानिक वृत्तपत्रातून जाहिरात देण्यात येतात.

**– डॉ. हरिहर कृ.कौसडीकर**

(लेखक पुणे येथील महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेत संचालक आहेत.)

| डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली | | | |
|---|---|---|---|
| अभ्यासक्रमाचे नाव | कालावधी | प्रवेश क्षमता | शैक्षणिक पात्रता |
| कृषी तंत्रज्ञान पदविका (२८ विद्यालये/ ६० विद्यार्थी प्रती विद्यालय) | ३ वर्षे | १६८० | १० वी उत्तीर्ण १२ वी असल्यास थेट दुसऱ्या वर्षात प्रवेश |
| कृषी पदविका (७ विद्यालये/ ६० विद्यार्थी प्रती विद्यालय) | २ वर्षे | २४० | १० वी उत्तीर्ण |
| मत्स्य अभियांत्रिकी पदविका | ३ वर्षे | ३० | १० वी उत्तीर्ण |
| फळझाडे कलम निर्मिती | ५ दिवस | २० | लागू नाही |
| शोभिवंत झाडांची निर्मिती | ५ दिवस | २० | लागू नाही |
| पुष्परचना व बोनसाय निर्मिती | २ दिवस | २० | लागू नाही |
| भाजीपाला रोपवाटिका निर्मिती | ४ दिवस | २० | लागू नाही |
| हरितगृहातील शेती | ७ दिवस | २० | लागू नाही |
| गांडूळखत निर्मिती | ४ दिवस | २० | लागू नाही |
| अळिंबी उत्पादन | ४ दिवस | २० | लागू नाही |
| कुक्कुटपालन | ५ दिवस | २० | लागू नाही |
| शेळी व मेंढी संगोपन | ५ दिवस | २० | लागू नाही |
| दुग्धजन्य पदार्थ निर्मिती | ५ दिवस | २० | लागू नाही |
| फळप्रक्रिया | ८ दिवस | २० | लागू नाही |
| नारळ प्रक्रिया | ३ दिवस | २० | लागू नाही |
| काजू प्रक्रिया | ४ दिवस | २० | लागू नाही |
| बेकरी उत्पादन | ५ दिवस | १५ | लागू नाही |
| कृषी अवजारांची देखभाल व दुरुस्ती | ४ दिवस | २० | लागू नाही |
| गोडया पाण्यातील मत्स्यसंवर्धन | ६ दिवस | २० | लागू नाही |
| शोभिवंत माशांचे उत्पादन व मत्स्यालय व्यवस्थापन | ६ दिवस | २० | लागू नाही |
| मूल्यवर्धित मत्स्य निर्मिती | ६ दिवस | २० | लागू नाही |




# माध्यमं संवादाची : जनतेच्या विश्वासाची




**जीवनामध्ये यशस्वी होण्यासाठी योग्य करिअरची निवड अत्यंत महत्त्वाची असते. योग्य करिअरची निवड करण्याचे ठरवल्यानंतर या दृष्टीने आवश्यक पात्रता काय, कोणता अभ्यास करायचा, तो कसा करावा या बाबी जाणून घेणे आवश्यक ठरते. यासाठी योग्य मार्गदर्शन, अचूक व परिपूर्ण माहिती मिळणे गरजेचे असते. अशा अचूक व परिपूर्ण माहितीचा खजिना माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने विविध माध्यमांतून उपलब्ध करून दिला आहे.**

योग्य वेळी आवश्यक माहिती मिळाल्यास ती निश्चितच उपयुक्त आणि वेळ वाचवणारी ठरते. करिअरविषयक माहितीबरोबरच शासनाचे महत्त्वाचे निर्णय, योजना, कार्यक्रम, उपक्रम, ध्येयधोरणे यांचीही माहिती वेळोवेळी करून घेत स्वतःला अद्ययावत ठेवणे गरजेचे असते. त्यादृष्टीने माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या वतीने दरमहा प्रकाशित होणाऱ्या मराठी लोकराज्य, ऊर्दू लोकराज्य, महाराष्ट्र अहेड (इंग्रजी) या मासिकांची आपल्याला निश्चितच मदत होईल. या मासिकांमधून 'प्रेरणा'' या सदराअंतर्गत प्रसिद्ध होणाऱ्या यशस्वी उमेदवारांच्या मुलाखती प्रेरणा देणाऱ्या असतात. याशिवाय विविध सदरांमधून मिळणारी माहिती स्पर्धा परीक्षेसाठी अत्यंत पूरक असते. ही मासिके बूक स्टॉल किंवा जिल्हा माहिती अधिकारी कार्यालयात उपलब्ध असतात. शिवाय ऑनलाइनद्वारेही (http://dgipr.maharashtra.gov.in) वर्गणीदार होता येते. या नियतकालिकांची वार्षिक वर्गणी पुढीलप्रमाणे: मराठी लोकराज्य १०० रुपये, उर्दू लोकराज्य ५० रुपये व महाराष्ट्र अहेड ५०० रुपये.

## दिलखुलास – जय महाराष्ट्र




महाराष्ट्रातील आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरून सोमवार ते शनिवार सकाळी ७.१५ ते ७.३० या वेळेत प्रसारित होणारा 'दिलखुलास' कार्यक्रम, दूरदर्शनवरून दर मंगळवारी आणि शुक्रवारी संध्याकाळी ७.३० वा. प्रसारित होणारा 'जय महाराष्ट्र' हा कार्यक्रम लोकप्रिय झाला आहे. सर्वांनी हे कार्यक्रम आवर्जून पाहायला हवे. वेगवेगळ्या विषयांची माहिती देणारे उद्‌बोधक असे विषय, मुलाखती या कार्यक्रमांमधून प्रसारित होत असतात.

### करिअरनामा

महासंचालनालयाचा दुसरा उपक्रम म्हणजे महान्यूज वेबपोर्टल होय. www.mahanews.gov.in या वेबपोर्टल मधील करिअरनामा आणि नोकरी शोधा, यशकथा, नेटभेट, योजना ही सर्व सदरं प्रत्यकाने वाचावी अशी आहेत आणि मोठ्या प्रमाणावर वाचली जातात. करिअरनामा सदरात गेल्या वर्षी विविध अभ्यासक्रम, शिष्यवृत्त्या आणि नोकरी विषयक जवळपास ११० लेख प्रसिद्ध करण्यात आले. हे लेख महान्यूजमध्ये प्रसिद्ध झाल्यानंतर महाराष्ट्रातील विविध वृत्तपत्रांमधूनही प्रसिद्ध झाले आहेत. तसेच ते समाज माध्यमातूनही आपल्यापर्यंत पोहोचले असतीलच. याबरोबरच महान्यूजमधील यशकथा हे सुद्धा अत्यंत उद्‌बोधक आणि प्रेरणादायी सदर आहे. नेटभेट या सदरामधूनही विविध मान्यवर व्यक्तींच्या मुलाखती, मनोगत प्रसिद्ध होत असतात, जी आपणास निश्चितच मार्गदर्शक, प्रेरक ठरतील.

### समाज माध्यमे

विविध समाजमाध्यमांद्वारे महासंचालनालयाकडून महत्त्वाचे निर्णय, उपक्रम नागरिकांपर्यंत पोहोचवले जातात. https://www.twitter.com/MahaDGIPR हे ट्विटर हँडल व https://www.facebook.com/dgipr या फेसबूक पेजवरूनही उपयुक्त माहिती प्राप्त करता येते. व्यक्तिमत्व विकासासाठी महासंचालनालयाची माध्यमे विश्वासार्ह आणि उपयुक्त आहेत.

**– देवेंद्र भुजबळ**
संचालक (माहिती/वृत्त)




# वैश्विक मराठी

कुसुमाग्रजांचा जन्मदिवस आपण 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा करतो. या दिनानिमित्त मराठी भाषा संवर्धन पंधरवडा व विविध उपक्रमांतर्गत मराठी भाषा विकास व संवर्धनाच्या दृष्टीने विविधांगी उपक्रम राबवले जात आहेत. यंदाच्या मराठी भाषा गौरव दिनी आपण 'संगणकावरील आणि महाजालावरील मराठी' या विषयाला प्राधान्य दिले आहे.

आधुनिक काळात कोणतीही भाषा टिकवण्यासाठी आणि विस्तारण्यासाठी त्या भाषेचा सर्वांगीण विकास होणे आवश्यक आहे. शिक्षणाचे माध्यम, बोली, प्रकाशित साहित्य, कोश, व्याक्रण, सार्वजनिक वापर इत्यादी घटक भाषेसंदर्भात महत्त्वाचे आहेतच, त्याचबरोबर 'भाषेचा संगणकावर आणि महाजालावर (इंटरनेटवर) होणारा वापर', हा आजच्या युगात सर्वाधिक महत्त्वाचा घटक ठरतो आहे. यावरच भाषेचा विस्तार आणि विकास मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. म्हणूनच महाराष्ट्रातील प्रत्येकाने महाजालावर मराठीचा वापर वाढवण्याचा आणि प्रत्येक संगणकावर युनिकोड-प्रणित मराठी कार्यान्वित करण्याचा संकल्प करणे गरजेचे आहे. अलीकडच्या काळात, समाजमाध्यमांवर (सोशल मीडियावर) ई-मेल, ब्लॉगलेखन, फेसबुक, ट्विटर, व्हॉट्सअॅप इत्यादी माध्यमांतून मराठीचा वापर वाढतो आहे. परंतु, या वापराचा वेग आणि व्याप्ती वाढणे गरजेचे आहे.

विकिपीडिया हे जगभरातील असंख्य भाषांमध्ये कार्यरत असलेले लोकप्रिय संकेतस्थळ आहे. एखाद्या भाषेतील मजकुराची पृष्ठसंख्या किंवा शब्दसंख्या हा भाषेच्या मोठेपणाचा आणि श्रेष्ठत्वाचा आजच्या काळातील निकष ठरतो आहे. हे लक्षात घेऊनच, मराठी भाषा गौरव दिनी, केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे, तर जगभरातील मराठी जनांनी, मराठी देवनागरी लिपीतील किमान १ परिच्छेद मजकूर 'मराठी विकिपीडियावर' टंकलिखित (टाइप) केले पाहिजे. लोकराज्यच्या या अंकात युनिकोडप्रणीत मराठी संगणकावर कसे कार्यान्वित करावे आणि मराठी विकिपीडियावर मजकूर कसा लिहावा, यांची कृती दिली आहे.

विविध क्षेत्रांतील मान्यवरांसह हजारो शाळा-महाविद्यालयांतील लाखो विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, सर्व शासकीय, निमशासकीय अधिकारी व कर्मचारी दि. २७ फेब्रुवारी रोजी विकिपीडियावर लेखन करणार आहेत. आपणही या 'महाजालावरील मराठी लेखनाला' कृतिशील प्रतिसाद द्यावा, ही आग्रहाची विनंती. मी स्वतःही विकिपीडियावर मजकूर लिहिणार आहे,

चला, विकिपीडियावर लिहू या !
मराठीचा विस्तार करू या !
युनिकोड-मराठी वापरू या !
मराठीचा विकास साधू या !

२७ फेब्रुवारी या एकाच दिवशी केवळ प्रतीकात्मक कृती न करता, पुढील काळात आपण सर्व जण, संगणकावर आणि महाजालावर मराठीचा सातत्याने वापर करू या.

**भाषा गौरव दिनानिमित्त विविध कार्यक्रम**


- मराठी भाषेसंबंधित विषयांवर व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा, सादरीकरणे. तज्ज्ञ, विचारवंत व साहित्यिकांच्या मुलाखती. तसेच साहित्यिक, भाषातज्ज्ञ, भाषा चळवळीतील कार्यकर्ते यांच्या सन्मान सोहळ्यांचे आयोजन.

ज्येष्ठ कवी वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा २७ फेब्रुवारी हा जन्म दिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करण्यात येतो. कुसुमाग्रज हे मराठी भाषेतील अग्रगण्य कवी, लेखक, नाटककार व समीक्षक होते. वि.स. खांडेकर यांच्यानंतर मराठी साहित्यात ज्ञानपीठ पुरस्काराने सन्मानित होणारे ते दुसरे साहित्यिक होते.



- न्यायव्यवहार, शासन-प्रशासन, प्रसारमाध्यमे, केंद्र तथा राज्य शासनाची कार्यालये, इतर अशासकीय कार्यालये इत्यादी ठिकाणी होणारा मराठी भाषेचा वापर याबाबत व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद व कार्यशाळेचे आयोजन.
- मातृभाषेची महती आणि माहिती, तसेच मातृभाषेचे व्यक्तिगत व समाजजीवनातील स्थान आणि मातृभाषेचे मानसशास्त्रीय व शिक्षणशास्त्राच्या दृष्टीने महत्त्व या विषयांवर विचारमंथनात्मक कार्यक्रम.
- युनिकोडप्रणीत मराठी आणि इन्स्क्रिप्ट मराठी कळफलक संबंधित विषयांवरील प्रशिक्षण कार्यशाळांचे आयोजन.
- समाजप्रसार माध्यमांतील मराठी, माहिती तंत्रज्ञान व मराठी, महाजालावरील (इंटरनेट) मराठी या क्षेत्रांतील तज्ज्ञांची व्याख्याने व सादरीकरणे.
- कुसुमाग्रज व इतर सुप्रसिद्ध थोर मराठी साहित्यिकांच्या साहित्यावर आधारित कार्यक्रमांचे आयोजन.
- मराठी वर्णमालेबाबत सादरीकरण किंवा व्याख्याने यांचे आयोजन.
- मराठीतील कोश वाङ्:मयाबाबत माहितीपर व्याख्याने किंवा सादरीकरणे. तसेच, कोश वाचण्याबाबत प्रशिक्षण.
- बोली भाषांवरील कार्यक्रमांचे आयोजन. (व्याख्याने, चर्चासत्रे, सादरीकरणे... इ.)
- शब्दभांडार आणि नवीन पर्यायी शब्दनिर्मिती यांबाबतच्या स्पर्धा.
- म्हणी, वाक्प्रचार, प्राचीन शब्द यांची व्युत्पत्ती - या विषयांवर व्याख्याने / सादरीकरण करणे.
- दिवंगत साहित्यिकांच्या जन्मगावी / कर्मभूमी शाळांच्या / ग्रंथालयांच्या मदतीने शाळा / ग्रंथालय / वाचनालय येथे स्थानिक शिक्षण संस्था / महाविद्यालये यांच्यामार्फत दिवंगत साहित्यिकांचे स्मरण करून त्यांच्या गौरवार्थ कार्यक्रमांचे आयोजन करावे. जेणेकरून नवीन पिढीला नामवंत साहित्यिकांच्या साहित्याचा परिचय होईल.
- मराठी सुलेखन, सुंदर मराठी हस्ताक्षर स्पर्धा व संबंधित कार्यशाळांचे आयोजन.
- मराठी कविता, प्रसिद्ध उतारे, मराठीसंबंधित घोषवाक्ये यांचे भित्तिचित्र प्रदर्शन किंवा स्पर्धेचे आयोजन.
- मोडी लिपी चे प्रशिक्षण, व्याख्यान किंवा परिसंवादाचे आयोजन
- मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासासाठी अत्युच्च त्यागासह कार्य करणाऱ्या अभ्यासक कार्यकर्त्यांनी निर्माण केलेल्या संस्थाना किंवा प्रकल्पांना भेट देणे.
- इयत्ता १० वी व १२ वी च्या परीक्षेत मराठी विषयात सर्वाधिक गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा व त्यांना शिकवणाऱ्या शिक्षकांचा सत्कार तसेच मराठीविषयक पदवी आणि पदव्युत्तर पदवी परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा व त्यांना शिकवणाऱ्या प्राध्यापकांच्या सत्काराचे आयोजन.

**- अपर्णा अ.गावडे**
(उप सचिव, मराठी भाषा विभाग)



# मराठीचा विस्तार युनिकोडद्वारे

संगणकावर मराठी भाषेतून काम करताना निरनिराळे फॉण्ट उपलब्ध आहेत. आपल्या संगणकावर विशिष्ट फॉण्ट नसेल तर लिहिलेला मजकूर वाचनीय राहत नाही. ई-मेलद्वारे पत्रव्यवहार करताना मुख्यत्वे हे जास्त त्रासदायक होते. यासाठी युनिकोड या संकेत प्रणालीमुळे संगणकीय महाजालावर मराठी भाषेतून व्यवहार करणं सहजसुलभ झालेले आहे.

युनिकोड ही लिपिचिन्हांची एक प्रमाणित संकेत प्रणाली आहे. ती वापरून आपण संगणकावर मराठीच्या देवनागरी लिपीत सहज लिहू शकतो. टंकलेखनासाठी ISM सारख्या आज्ञावलींची आवश्यकता रहात नाही. ही संकेत प्रणाली प्रमाणित असल्याने कुठेही वापर करणे सोयीचे आहे.

जाणून घेऊ.. या विविध ऑपरेटिंग सिस्टिम्समध्ये युनिकोडप्रणीत मराठी कार्यरत करण्याची कृती...

**कार्यकारी प्रणाली (ऑपरेटिंग सिस्टिम )**

**विंडोज ७**

Start > Settings > Control panel > Regional and Language options या पर्यायावर जा.

Region and Language options मध्ये Keyboards and Language मधील Change Keyboard ह्या खुणेवर क्लिक करा.

Text services and Input Languages नावाच्या चौकटीतल्या Add ह्या खुणेवर क्लिक करा.

Add Input Language खूण असलेली लहान चौकट उघडेल. त्यातील Input Language मधील भाषांच्या सूचीतून Marathi निवडा, OK या खुणेवर क्लिक

करा.

आता Text services and Input Language च्या तळाशी असलेल्या Apply आणि OK या बटणांवर क्रमाने क्लिक करा.

संगणकाच्या उजव्या बाजूला कोपऱ्यात EN अशी खूण येईल.

EN ह्या खुणेवर क्लिक केल्यावर English असे लिहिलेले दिसेल. त्याखालीच M- Marathi असेही लिहिलेले दिसेल.

MA ही खूण म्हणजेच मराठी वापरण्याचा पर्याय. तो क्लिक करून निवडल्यावर मराठीतून काम करता येते. तो बदलून इंग्रजी वापरायचे असेल, तर पुन्हा EN चा पर्याय निवडा. लक्षात ठेवा Alt व Shift या कीज एकाच वेळी दाबून MA व EN चे पर्याय बदलतात. कृती पूर्ण झाल्यावर इन्स्क्रिप्ट कळफलक आपोआप (बाय डिफॉल्ट) लागू होतो.



## विंडोज ८

Start > Control panel > All control Panel > Item > Language

Add a Language खूण असलेली लहान चौकटीवर क्लिक करा. त्यातील भाषांच्या सूचीतून Marathi वर जाऊन Add या खुणेवर क्लिक करा.

यानंतर कळफलक मराठी होईल. Alt व Shift या कीज एकाच वेळी दाबून MA व EN चे पर्याय बदलतात. कृती पूर्ण झाल्यावर इन्स्क्रिप्ट कळफलक आपोआप (बाय डिफॉल्ट) लागू होतो.

इन्स्क्रिप्टव्यतिरिक्त इतर कळफलक वापरण्यासाठीची कृती सोबत दिली आहे.

## विंडोज एक्सपी

विशेष टीप– विंडोज् XP मध्ये युनिकोड क्रियाशील करण्यासाठी XP ची Installation CD लागते.

XP Professional साठी -Start > Control panel > Region and Language options

XP Home Edition साठी– Start > Control panel > Date, Time, Language and Regional Option > Region and Language options नंतर Languages यावर क्लिक करा.

Regional Options या चौकटीत Standards and formats ही चौकट बरचेदा छोट्या चौकटीत English (United States) असे लिहलेले दिसते.

चौकटीतील Supplemental language support या भागातील Install files for complex scripts and right-to-left languages (including Thai) हा पर्याय निवडा. Apply आणि OK वर टिक करा. यानंतर Install Supplemental Language Support या वर OK करा.

Files needed असे शब्द असलेली चौकट दिसेल. संगणकाकडून विंडोज् XP च्या i386 या फोल्डरसाठी Installation CD ची मागणी होईल. ती सीडी टाका

Regional and Language OptionsCopying Files अशी प्रक्रिया सुरु होईल.

यानंतर संगणक पुनर्स्थित / रिस्टार्ट करावा.

Start Control panel Regional and Language options चौकट उघडले . त्यातील व Languages या खुणेवर टिक करा.

दुसरी चौकट उघडले. त्यात Details या खुणेवर टिक करा.

Text services and input languages नावाची नवी चौकट उघडेल.

या चौकटीत Add या खुणेवर टिक करा.

Add Input Language खूण असलेली लहान चौकट उघडेल.

यातील Input language खालील भाषांच्या यादीतून Marathi निवडा.

OK या खुणेवर टिक करा.

संगणकाच्या उजव्या बाजूला कोपऱ्यात EN अशी खूण येईल.

EN ह्या खुणेवर क्लिक केल्यावर English असे लिहिलेले दिसेल. त्याखालीच MA Marathi असेही लिहिलेले दिसेल. MA ही खूण म्हणजेच मराठी वापरण्याचा पर्याय. तो क्लिक करून निवडल्यावर मराठीतून काम करता येते. तो बदलून इंग्रजी वापरायचे असेल, तर पुन्हा EN चा पर्याय निवडा.




Alt व Shift या कीज एकाच वेळी दाबून MA व EN चे पर्याय बदलतात. कृती पूर्ण झाल्यावर इन्स्क्रिप्ट कळफलक आपोआप (बाय डिफॉल्ट) लागू होतो.

## इतर कळफलक

http://www.bhashaindia.com या संकेतस्थळावरील Marathi_IME_setup.zip ही कळफलकांचे विविध पर्याय देणारी धारिका आपल्या संगणकावर उतरवून घ्या. ती संगणकावर संग्रहित (Save) करा.

त्यातील Setup.exe ही धारिका दोनदा क्लिक करून कार्यरत करून घ्या.

Marathi IMEA कळफलक कार्यरत करण्यासाठी पुढील एकेका खुणेवर बाण नेऊन क्रमाने क्लिक करा – Start > Settings > Control panel > Regional and Language options >Details > Add

Add Input Language अशी खूण असलेली एक चौकट उघडेल. त्यात Keyboard layout / IME ह्या चौकटीत क्लिक करा.

त्यातील सूचीतून Marathi Indic IME 1 V 5.0 हा पर्याय निवडा व OK म्हणा. आता IME 1 V 6.0 ही उपलब्ध झाला आहे.

Text Services and input languages - या आधीच्या चौकटीतील Installed services या लहान चौकटीत पाहा. M- Marathi खाली Keyboard मध्ये Marathi Indic IME 1 V 5.0 हा पर्याय दिसेल. त्यावर क्लिक करून Apply व OK म्हणा.

तळपट्टीच्या उजवीकडे पाच चौकोनांची पट्टी दिसेल. त्यातील दुसऱ्या चौकोनात क्लिक केल्यावर अनेक कळफलकांची नावे दिसतील. आपल्या संगणकावर वरीलपैकी कोणत्याही एका कृतीद्वारे युनिकोड कार्यान्वित करून घेता येईल.

– नंदा राऊत
(अवर सचिव, मराठी भाषा विभाग.)

# चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था

## येथे घडतात अधिकारी



### संस्थेचा उद्देश/ध्येय/कार्य

केंद्रीय लोकसेवा आयोग (यु.पी.एस.सी.)मार्फत घेतल्या जाणाऱ्या स्पर्धा परीक्षेकरिता बसणाऱ्या विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळणे/देणे यासाठी.


### प्रवेश क्षमता

■५० विद्यार्थी/वर्ष (विद्यार्थ्यांची निवड दरवर्षी प्रवेश परीक्षा घेऊन, उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची फेरनिवड, गट चर्चा व मुलाखतीद्वारे केली जाते.) ■ प्रवेश प्रक्रियेची जाहिरात साधारणत: मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात प्रसिद्ध करण्यात येते. ■ प्रवेश परीक्षा ही प्रत्येक वर्षाच्या जून महिन्यातील शेवटच्या आठवड्यात होते. ■ व्यक्तीमत्व विकास प्रशिक्षण वर्गात १२वी पास झालेल्या २५ विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. महिन्याच्या पहिल्या, दुसऱ्या व पाचव्या शनिवारी यु.पी.एस.सी.ची तयारी करणेबाबत प्रशिक्षण दिले जाते. ■ या अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया साधारणत: प्रत्येक वर्षी जुलै महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात होते.

**येथे संपर्क साधा**

**चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था, तळ मजला, नानासाहेब धर्माधिकारी ग्रंथालय इमारत, वेदांत कॉम्प्लेक्स समोर, कोरस रोड, वर्तकनगर, ठाणे (पश्चिम). जि. ठाणे – ४०० ६०६.**
**दूरध्वनी : ०२२–२५८८१४२१, संकेतस्थळ :** www.cdinstitute.in






*M-powering thru knowledge..*

## Schedule of Mains-cum-Pre UPSC Batch for 2017-18

### General Studies

| Batches | Dates | Time | Days |
|---|---|---|---|
| **Batch (I)** English Medium | 1 June | 8 am to 10 am | Wednesday ,Thursday, Friday, Saturday |
| Marathi Medium | | 3.00 pm to 5.00 pm | |
| **Batch (II)** English Medium | 10 Jul | 5.30 pm to 7.30 pm | Wednesday, Thursday, Friday, Saturday |
| Marathi Medium | | 10.30 am to 12.30 pm | |
| **Batch (III)** English Medium | 24 Jul | 5.30 pm to 7.30 pm | Wednesday, Thursday, Friday, Saturday |
| Marathi Medium | | 10.30 am to 12.30 pm | |
| **Batch (IV)** English Medium | 1 Sept | 8.00 am to 10.00 am | Wednesday, Thursday, Friday, Saturday |
| Marathi Medium | | 3.00 pm to 5.00 pm | |
| **Batch (V)** Eng. | 4 Dec | 8.00 am to 10.00 am | Monday to Friday |
| **Batch (VI)** Eng. | 15 Jan | 5.00 am to 7.00 am | Monday to Friday |
| **Weekend Batches** | **10 Jun / 22 July / 23 Sept / 23 Dec 2017** | 4 - 7 pm / 9 - 1 pm | Saturday / Sunday |

All Optional Batches will start from **25 Sept.**

## MPSC राज्यसेवा परीक्षा

### इंटिग्रेटेड बॅच

पूर्व + मुख्य + मुलाखत एकत्रित तयारी

- कालावधी १ वर्ष

बॅचेस वेळापत्रक मराठी माध्यम

| बॅच | बॅचेस सुरुवात | वार | वेळ |
|---|---|---|---|
| इंटिग्रेटेड बॅच – I | २ मे २०१७ | सोमवार ते शुक्रवार | स. ८ ते १० |
| इंटिग्रेटेड बॅच – II | १५ जून २०१७ | सोमवार ते शुक्रवार | स. ८ ते १०/सायं. ५ ते ७ |
| इंटिग्रेटेड बॅच – III | ३ जुलै २०१७ | सोमवार ते शुक्रवार | स. ८ ते १० |
| इंटिग्रेटेड बॅच – IV | १७ जुलै २०१७ | सोमवार ते शुक्रवार | सायं. ५ ते ७ |
| इंटिग्रेटेड बॅच – V | १ ऑगस्ट २०१७ | सोमवार ते शुक्रवार | दु. ३ ते ५ |
| इंटिग्रेटेड बॅच – VI | १६ ऑगस्ट २०१७ | सोमवार ते शुक्रवार | सायं. ५ ते ७ |
| इंटिग्रेटेड बॅच – VII | ४ सप्टेंबर २०१७ | सोमवार ते शुक्रवार | सकाळी १०:३० ते १२:३० |
| इंटिग्रेटेड बॅच – VIII | १८ सप्टेंबर २०१७ | सोमवार ते शुक्रवार | स. ८ ते १० |
| इंटिग्रेटेड बॅच – IX | १ नोव्हेंबर २०१७ | सोमवार ते शुक्रवार | सायं. ५ ते ७ |
| इंटिग्रेटेड बॅच – X | ४ डिसेंबर २०१७ | सोमवार ते शुक्रवार | सकाळी १०:३० ते १२:३० |

Schedule English medium

| Morning Batch | – 8-10 am | Evening Batch | – 5-7 pm |
|---|---|---|---|
| 24 April 2017 | – Mon-Fri | 08 May 2017 | – Mon-Fri |
| 05 June 2017 | – Mon-Fri | 19 June 2017 | – Mon-Fri |
| 17 July 2017 | – Mon-Fri | 24 July 2017 | – Mon-Fri |
| 28 August 2017 | – Mon-Fri | 11 September 2017 | – Mon-Fri |
| 02 October 2017 | – Mon-Fri | 13 November 2017 | – Mon-Fri |
| 04 Dec 2017 | – Mon-Fri | | |

**उन्हाळी वर्ग (Prelim)**
५ मे ते ५ जून २०१७
(शिक्षक व नोकरदारांसाठी)

**बाणेर येथे**
निवासी बॅच उपलब्ध (६ महिने)
५ जाने, ५ जुलै आणि ५ सप्टेंबर २०१७

**Weekend Batch**
१५ जुलै २०१७
(शनिवार २-७/रविवार ९-५)

The UNIQUE® academy
www.theuniqueacademy.com
UNIQUE INSTITUTE OF HIGHER LEARNING PVT. LTD.

पुणे : (ऑफिस-1) बँक ऑफ इंडियाच्या वर, फर्ग्युसन कॉलेजसमोर, पुणे 411 004
020 2553 0335 / 98901 92929 / 83800 88775

पुणे : (ऑफिस-2) फर्ग्युसन कॉलेज मेनगेट समोर, शिरोळे रोड, पुणे 411 004
020 2553 0950 / 98509 69947 / 98233 31197

पुणे कॅम्प : E-विंग, परमार ट्रेड सेंटर, साधुवासवानी चौक, पुणे 411 001
020 2605 2396 / 98227 72482 / 90750 12482

disha/Pn/JAN '17

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2015-17
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 18th to 24th February 2017
Date of Publication : 10th of every Month




प्रति / **TO**

**O.I.G.S.** भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य **LOKRAJYA**

*If undelivered, please return to:*

प्रेषक / **From**

प्रवीण टाके
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक प्रवीण टाके, वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी प्री मीडिया सर्व्हिसेस प्रा.लि. प्लॉट नं. ईएल /२०१, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, महापे, नवी मुंबई - ४०० ७०४ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.

मुख्य संपादक: ब्रिजेश सिंह